वर्ष ११ वें अंक ४ था

२४ एप्रिल १९६०

# संजीवन

जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक



संजीवन कार्यालय, श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी – २

# 4 APRIL 1960

The eye that visualised the viewless planes
Exposed the depths muffled by Nature's front—
Till all was known

Sri Aurobindo

ज्या चक्षूनें अदृश्य जगतें स्पष्ट पाहिलीं, त्यानें
निशेनें आच्छादिलेलीं गूढ क्षेत्रें प्रकाशमान् केलीं –
इतकीं कीं सर्व कांहीं ज्ञात वाटूं लागलें.

–– श्रीअरविंद

वर्ष ११ अंक ४ था

२४ एप्रिल १९६०

# संजीवन

## जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक

संपादक:

भालचंद्र लिमये

संजीवन कार्यालय

श्रीअरविन्द आश्रम, पाँडीचेरी

(श्रीमाताजी आणि शारीरिक-शिक्षण-संघनायक 'मोना' यांजमधील संवाद)

**संघनायक:-** माताजी, पावसामुळें काल आमची शेवटची प्रॅक्टिस (समारंभाची पूर्वतयारी) होऊं शकली नाहीं. खरोखर हा पाऊस सर्व बिघडवून टाकतोय.

**श्रीमाताजी:-** बाळा, त्यांच्यामधील सर्व वरपांगीपणा ( insincerity ) धुवून काढण्यासाठीं या गोष्टी आवश्यक आहेत--नाहीं कां ? तुम्हांला संपूर्ण धुवून काढून शुद्ध करण्यासाठींच जणुं कांहीं धो धो पाऊस पडतो.

**संघनायक:-** पावसाचे चांगलेहि परिणाम असतात हें खरें आहे, पण नेमकें १ आणि २ डिसेंबरच्या महत्त्वाच्या समारंभापूर्वीं ओलेचिंब भिजून आजारी पडावयाचें ?

**श्रीमाताजी:-** बाळ, आजारीपण हें प्रतिरोधामुळें येतें. येथें कार्य करीत असलेल्या उच्च प्रकृतीच्या शक्तीला प्रतिरोध न करतां, तिचा स्वीकार करून, ती पेलण्यास तुम्ही शिकलें पाहिजे. उच्चतर प्रकृतीची संवर्धनाची एक स्वतःची अशी वेगळीच पद्धति असते, तिच्याशी जुळवून कसें घ्यावयाचें हें जर तुम्ही शिकलांत, तर अनेक नवीन व डोळे दिपविणाऱ्या अद्‌भुत घटना घडून येतील आणि आजारी पडण्याऐवजीं त्याच्या अगदीं उलट अनुभव तुम्हांला येईल.

जेव्हां पाऊस पडतो, तेव्हां लोक भांबावून धांवपळ करूं लागतात, स्वतःला कशाखालीं तरी लपवून घेण्याचा प्रयत्न करतात किंवा कुठेंतरी आसरा शोधतात. त्यांच्यामध्यें सुप्त असलेल्या दृढमूल भीतिमुळें ते असें वागतात आणि आजारी पडतात. ते हें विसरतात कीं, आजारीपण हें स्वतःमधील कांहीं आंतरिक कारणांमुळें, कांहीं अयोग्य आंतरिक-प्रतिक्रियांमुळें आलेलें असतें. हें एक सार्वत्रिक सत्य आहे असेंहि म्हणतां येईल.

रूपांतरकारी शक्तीला विरोध करूं नका म्हणजे मग तुम्हीं कधींच आजारी पडणार नाहीं

३०-११-१९५९.

संपादक--भालचंद्र लिमये.
प्रकाशक--'संजीवन कार्यालय', श्रीअरविंद आश्रम, पांडीचेरी.
मुद्रक--श्रीअरविंद आश्रम प्रेस, पांडीचेरी.
242/3/60/700

# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| १ प्रार्थना आणि ध्यान | श्रीमाताजी | ५ |
| २ गीतेचा संदेश | श्रीअरविंद | ८ |
| ३ श्रीमाताजींचीं प्रवचनें | श्रीमाताजी | ११ |
| १ खरें कारण | | |
| २ प्रगतीचा आनंद | | |
| ३ सामूहिक साधना | | |
| ४ सर्वनिर्माता दिव्यानंद | | |
| ४ श्रीअरविंद वाङ्मय (६) | मा. पुं. पंडित | २२ |
| ५ मॅझिनी आणि काव्हूर | श्रीअरविंद | २६ |
| ६ प्रश्नावलि | श्रीअरविंद | ३१ |
| ७ अडचणी आणि प्रगति | श्रीअरविंद | ३५ |
| विद्यार्थी विभाग :— | | |
| ८ शिकंदर-पुरू | नलिनीकांत गुप्त | ४० |
| ९ प्रेरक पत्रें | नलिनीकांत गुप्त | ४३ |
| १० आरोग्य रक्षणासाठीं | | ४५ |
| ११ साहित्य-सत्कार | | ४८ |
| १२ आश्रम-वृत्त | | ५४ |

# २४ एप्रिल १९६०

निराकार आणि साकार तिच्यामध्यें एकत्र झाले होते.
असीमतेच्या पलीकडे तिची दृष्टि पोहोंचली,
ओतप्रोत अनंतता तिच्या मुखमंडलावर प्रकट झाली.
अंध विश्वशक्ती ज्या निस्सीम आनंदाचा शोध घेत असतात,
तो आनंद तिच्या रोमांरोमांतून अवर्णनीय रीतीनें मूर्तिमान् झाला.
तिच्या सौंदर्यदेहचंद्रामुळें आनंदसागरांना भरती आली.
उत्पत्ति स्थिति आणि प्रारब्ध यांच्या शिरोभागीं ती उभी आहे,
तिच्याच आदेशानें युगचक्रें हळुहळु फिरत राहिलेलीं आहेत;
केवळ तिचेच हस्त कालरूपी शेषाचा आधार परिवर्तित करूं शकतात.
महानिशेनें दडविलेलें गुप्त रहस्य तिला ज्ञात आहे;
आत्म्याची किमयाकारी शक्ति तिचीच आहे,
ती आहे हिरण्मय सेतु, अद्भुत अग्नि.
अज्ञाताचें ज्योतिर्मय हृदय आहे ती,
परमेशाच्या अंतर्गुहेंतील नीरवतेची शक्ति आहे ती.
तीच आहे परमाशक्ति, अमोघ नादब्रम्ह,
आमच्या दुर्गम आरोहणाचा लोहचुंबक
आमचे सर्व सूर्य ज्यापासून आम्ही प्रज्वलित करतों, तो महान् आदित्य,
अमूर्त विशालतेंतून झेपावणारी महान् ज्योति,
अशक्यतेंतून आम्हांला आमंत्रण देणारा परमानंद,
अद्याप कधींहि खालीं न अवतरलेलें जें जें कांहीं आहे त्याचें महाबल.
तिच्या चरणस्पर्शानें दुःखपूर्ण जीवनस्पंदाच्या वेदना दूर व्हाव्या,
मानवाच्या मंद आत्मज्योतीवरील आवरण तिनें भेदावें,
आणि भूतमात्राच्या मिटलेल्या हृदयामध्यें तिचा अग्नि तिनें प्रज्वलित करावा म्हणून
समस्त प्रकृति मुग्धभावानें केवळ तिलाच आवाहन करीत असते.
एकदिवस येथील सर्वकांहीं तिच्याच माधुर्याचें धाम होऊन जाईल,
सर्व विसंवाद तिच्याच सुसंवादाची पूर्वतयारी ठरतील;
केवळ तिच्याकडे आमचें ज्ञान आरोहण करतें, आमच्या कामना चांचपडतात,
एक दिवस तिच्याच अद्भुत आनंदाश्चर्यांत आम्ही निवास करूं,
आणि तिच्या बाहूंमध्यें आमचें दुःख आनंदातिशयतेमध्यें परिवर्तित होऊन जाईल.

सावित्री ३ : २ —श्रीअरविन्द



THE MOTHER

वर्ष ११ अंक ४ था

२४ एप्रिल १९६०

# संजीवन

तमसापलीकडील उच्चतर ज्योति पहात,
देवतांमधील दिव्य सूर्याप्रत, सर्वोच्च ज्योतिप्रत आम्ही आलो.

ऋग्वेद–१. ५०. १०

## प्रार्थना आणि ध्यान

२१ मार्च १९१४

प्रतिदिनीं सकाळीं माझी अभीप्सा तुजप्रत उन्नत होते आणि तृप्त हृदयांतील शांतीमध्यें मी तुला प्रार्थना करते कीं, तुझ्या प्रेमाचें नियमन सर्वत्र प्रकट होऊं दे. तुझीच इच्छा सर्वत्र अभिव्यक्त होऊं दे. ज्या परिस्थितीमध्यें तुझ्या नियमनाची आणि इच्छेची अभिव्यक्ती व्हावयाची आहे त्या परिस्थितीचा आनंदानें व शांतचित्तानें मी आधींच स्वीकार केलेला आहे.

जेव्हां गोष्टी स्वतःशी संबंधित असतात, तेव्हां अमुकच रीतीनें गोष्टी घडाव्या आणि वेगळ्या रीतीनें न घडाव्या अशी मागणी वा हट्ट आपण कां बरें करावा? त्यामुळें अस्वस्थ कां व्हावें? अमुक एक रीतीनें गोष्टी घडल्या म्हणजेच त्यांतून अधिकांत अधिक योग्य असें ईशेच्छेचें प्रकटीकरण होईल असें तरी आपण आधींच काय म्हणून ठरवून टाकावें? आणि त्याप्रमाणेंच घडलें पाहिजे या हट्टानें स्वतःला झगडयांत आणि संघर्षांत कां लोटून द्यावें? त्यापेक्षां केवळ तुझेंच नियमन सर्व अंधःकारावर, सर्व अडचणींवर आणि अहंकारावर पूर्णतः विजयी होवो अशी इच्छा, आपली सर्व शक्ती लावून, आंतरिक विश्वासपूर्ण नीरवतेमध्यें आपण कां करूं नये? ही भूमिका घ्यायला शिकतांच मनाचें क्षितीज कसें शाल विहोऊं लागतें, सर्व प्रकारच्या चिंता कशा विराम पावतात आणि त्याजागीं अविचल उज्ज्वलता व निर्लिप्ततेंतून निर्माण होणारी सर्व-समर्थता विराजमान होते. हे स्वामिन्, तुझी जी इच्छा असेल, तसेंच आम्हीहि इच्छिणें म्हणजेच सतत अविभक्तभावानें तुजशीं एकरूप होऊन राहणें आहे; सर्व प्रकारच्या घटनां-

पासून मुक्त होणें आहे; सर्व तऱ्हेच्या संकुचितपणाच्या दोषापासून स्वतःचा बचाव करण्यासारखें तें आहे; फुप्फुसें विशुद्ध आणि निरामय अशा वातावरणानें भरून टाकणें आहे; निरर्थक शीण घालवून टाकणें आहे; अंगावरील बोझा हलका होण्यासारखें आहे. त्यामुळेंच, प्राप्त करून घेण्यास अति योग्य अशा एकमात्र ध्येयाच्या दिशेनें, म्हणजेच तुझ्या दिव्य नियमनाच्या विजयप्राप्तीच्या दिशेनें, व्यक्ति जलद गतीनें दौड करूं शकते.

हे प्रभो, किती आनंदपूर्ण अशा विश्वासानें मी या प्रातःसमयीं तुला अभिवादन करीत आहे!

★

२२ मार्च १९१४.

हे प्रभो, प्रेममय दिव्य स्वामिन्, सर्वांचीं अंतःकरणें व जाणीव उद्भासित कर. तुझ्याकडे वळण्याचा त्यांनीं यत्न केलेला आहे. पण त्यांच्या अज्ञानदोषामुळें असें घडून आलें आहे कीं, त्यांच्या प्रार्थना तुजप्रत पोहोंचूं शकलेल्या नाहींत आणि त्यांनीं तुजविषयीं बांधलेल्या चुकीच्या कल्पनांमुळें त्यांची अभीप्सा पूर्णतेस जाण्याचा मार्ग रुद्ध होऊन गेलेला आहे. कांहीं असलें तरी कृपाळुपणानें तूं सर्व प्रकारच्या सद्भावना जाणतोस आणि त्यांचा विकास करतोस. एकाद्याच्या ठिकाणीं मनःपूर्वकतेचा अंशमात्र स्फुलिंग दिसतांच, त्या संधीचा उपयोग करून घेऊन, तुझा दिव्य प्रकाश त्या व्यक्तीची बुद्धि प्रकाशित केल्याशिवाय रहात नाहीं. तुझ्या उच्चतर दिव्य प्रेमाचा प्रवेश त्यांच्या अंतःकरणांत करवून, तुझ्या दिव्य नियमनाच्या अनेक उत्कृष्ट अभिव्यक्तींपैकीं एक, जी उच्चतर आणि विशुद्ध परोपकारनिष्ठ वृत्ति, तिनें त्यांचें जीवन तू. प्रकाशित करून भरवून टाकतोस. ज्या ज्या क्षणीं मी तुझ्याशीं खरोखरी एकरूप होऊं शकले होते, तेव्हां तुझ्या संकल्पास अनुरूप अशी मीं एवढीच इच्छा केली आहे कीं, जे जे कोणी जेव्हां जेव्हां बाहेरच्या शक्याशक्यतेच्या विचारांचें ओझें दूर टाकून, मन अधिक उदात्त विचाराकडे व अधिक विशुद्ध भावनांकडे वळवितात, तेव्हां तेव्हां त्यांना तुझ्या दिव्य प्रकाशाचा लाभ व्हावा. तरी माझी ही प्रार्थना तूं मान्य कर.

तुझ्या उच्चतर उपस्थितीची परम शांति त्यांच्याठिकाणीं जागृत होऊं दे.

★

२३ मार्च १९१४

माझ्या दृष्टीनें तीच अवस्था आदर्श, ज्यावेळीं तुझ्या दिव्य चेतनेचें सतत भान रहातें; व कांहीं विचार न करतांहि, आपोआपच आम्हांला दरक्षणीं हें समजतें कीं, तुझ्या सत्तेची अधिकांत अधिक उत्तम अभिव्यक्ति व्हावी म्हणून आम्हीं काय करायला पाहिजे. विशिष्ट क्षणीं अशा अवस्थेचा अनुभव मीं घेतलेला असल्यामुळें, ती स्थिति मला ठाऊक आहे. पण पुष्कळवेळां काय होतें, कशारीतीनें वागावयाचें याविषयींचें ज्ञान अज्ञानाच्या धुक्यानें झांकून जातें; आणि विचारशक्तीचा आश्रय घेणें भाग पडतें. अर्थात् विचार हा नेहमींच योग्य मार्गदर्शक असतो असें नाहींच. विचार करायला फुरसतहि नसतांना, त्या त्या क्षणाला

जें सुचेल त्याप्रमाणें आम्ही जेव्हां वागतो, त्यासंबंधीं तर बोलायलाच नको. तें आमचें वागणें किती प्रमाणांत तुझ्या नियमनाला धरून असते आणि कितपत विरोधी असते, तें सर्व कांहीं आमच्या अर्धजागृत-जाणिवेवर, (subconscient) त्यामधील त्या त्या क्षणाच्या वृत्तींवर अवलंबून असतें; घडून गेलेल्या एकाद्या महत्त्वाच्या कृतीकडे त्रयस्थ म्हणून पाहून जर आपण तिचें पृथक्करण करूं शकलों, त्या कृतीमागील प्रेरणा ओळखूं शकलों; तिला चांगल्या रीतीनें जाणूं शकलों, तर त्या कृतीपासून आपणांस कांहीं धडाहि घेतां येतो.

ज्या अर्ध-जागृत जाणिवेचें आपणावर अजूनहि प्रभुत्व आहे, पण ज्यावर आपणांस प्रभुत्व मिळवावयाचें आहे, अशा जाणिवेचें अंशमात्र तरी ज्ञान आपणांस होतें. भौतिक विश्वांतील कोणत्याहि कृतीमध्यें बरी आणि वाईट दोन्ही बाजू असणारच. तसें नसणें ही गोष्ट अशक्य आहे. एवढेंच कशाला, ज्या कृतीच्याद्वारां परमेश्वराचा, दिव्यप्रेमाचा कायदा उत्तमरीतीनें आविष्कृत होतो, अशा कृतींतहि कांहीं ना कांहींतरी अंधःकारमय व अव्यवस्थारूप असें असतेंच. कारण आज जग ज्या अवस्थेंत आहे, त्या अवस्थेंत या गोष्टी त्याच्या स्वभावगत असल्या-सारख्या आहेत.

ज्यांना निराशावादी म्हणतात अशीं माणसें बहुतेक वेळां प्रत्येक गोष्टीची केवळ काळी बाजूच बघतात. उलट जे आशावादी असतात, ते सौंदर्य व सुसंवादच फक्त पाहतात. नाइलाजानें आशावादाचा स्वीकार करणें, हें हास्यास्पद व अज्ञानाचें दर्शक आहे. तेव्हां स्वखुशीनें खरोखरीचे आशावादी बनण्यासाठीं प्रयत्नांची शिकस्त करणें ही गोष्ट किती आनंददायी आहे, नव्हे कां? निराशावादी माणसाच्या दृष्टीनें पाहिलें, तर मनुष्य जें जें कांहीं करतो तें तें वाईटच असणार, अज्ञानपूर्ण व अहंमन्यतेचे असणार; अशा दृष्टीच्या माणसांचें कोण आणि कसें समाधान करूं शकेल? तें अशक्यप्राय आहे.

याला केवळ एकच उपाय आहे. आजच्या आपल्या कल्पनेनुसार जो शुद्धतम व उच्चतम प्रकाश आपणांस उपलब्ध असेल, त्याच्याशीं शक्य तितक्या सर्वांगीणतेनें एकरूप होऊन रहावयाचें. परात्पर चेतनेशीं आपली स्वतःची चेतना अधिकांत अधिक पुरतेपणीं एकतान, एकप्रवाही करावयाची. या पृथ्वीवर त्या चेतनेचा आविष्कार होण्यास आपण जास्तींत जास्त साहाय्यकारी व्हावें म्हणून त्या चेतनेंतूनच केवळ, सर्व प्रकारच्या प्रेरणा स्वीकारण्याचा प्रयत्न ठेवावयाचा; आणि तिच्या सामर्थ्यावर दृढ विश्वास ठेवून, सर्व घटनां-मध्यें शांतचित्त रहावयाचें. वर्तमानकालीन आविष्कारामध्यें सर्वच गोष्टी संमिश्र स्वरूपाच्या आहेत. म्हणून आज जरी संपूर्ण पूर्णतेची सिद्धी शक्य नसली, तरी उच्चतर प्रकाशाकडे जाण्याचा उद्देश ठेवून आपणाकडून पराकाष्ठा करणें यांतच खरा शहाणपणा आहे.

तरीसुद्धां त्या अप्राप्य अशा पूर्णत्वाप्रत जाण्यासाठीं आपण नेहमींच उत्कट उत्साहानें व तीव्रतेनें हृदयीं अविरत आकांक्षा बाळगून असलें पाहिजे. नाहीं कां?

**-श्रीमाताजी.**

# गीतेचा संदेश

(मागील अंकावरून पुढें)

आमचें मन, प्राण व शरीर हें आमचें बाह्य यंत्रवत् व्यवहार-साधन असून या साधनाच्या हालचालींत आमचा क्रियाशील आत्मा सर्वथा बुडून जातो, त्याच्याशीं कारण नसतां एकरूप होऊन जातो, म्हणून त्याला आंतील गोष्टींचें यथावत् ज्ञान होत नाहीं---आमचा खरा आत्मा यामुळें आमच्या बुद्धीला (व क्रियाशील आत्म्याला) प्रतीत होत नाहीं. हें एकरूप होणें, आपल्या प्राकृतिक साधनांशीं मीपणाच्या भावनेनें एकरूप होणें, आमच्या क्रियाशील आत्म्यानें टाकून दिलें आणि त्यायोगें आंतरिक अस्तित्वाचें सत्य त्याला प्रतीत होऊन, या अस्तित्वांत तो पूर्ण श्रद्धेनें राहूं लागला म्हणजे जीवन आणि अस्तित्व त्याला अगदीं वेगळ्या स्वरूपाचें दिसूं लागेल, व्यवहार त्याला वेगळ्या अर्थानें भरलेला, वेगळ्या स्वरूपाचा दिसूं लागेल. आमचें अस्तित्व म्हणजे सध्यां आम्हांला प्रकृतीची अहम्वादी क्षुद्र रचना वाटते, ती आम्ही आंतरिक अस्तित्वांत राहूं लागल्यावर तशी वाटणार नाहीं; आमचें अस्तित्व म्हणजे विशाल ईश्वरी अमर आत्मशक्ति आहे, असा प्रत्यय आम्ही आंतरिक आस्तित्वांत राहूं लागल्यावर आम्हांला येईल. आमची जाणीव आज मर्यादित, संघर्षमग्न प्राणिक, मानसिक जीवाची जाणीव आहे, ती मग अनंत ईश्वरी आध्यात्मिक जाणीव होईल. तसेंच मग आमची इच्छा आणि क्रिया ही मर्यादित व्यक्तीची आणि त्या व्यक्तीच्या अहम्भावाची इच्छा आणि क्रिया रहाणार नाहीं, तर ती ईश्वराची--आत्म्याची--इच्छा आणि क्रिया होईल. मानवी मूर्तीच्या द्वारां पूर्ण स्वतंत्रतेनें काम करणाऱ्या विश्वव्यापी, सर्वश्रेष्ठ, सर्वरूप सर्वांतर्यामी आत्म्याची ती इच्छा आणि क्रिया होईल.

मानवांत हें महान् रूपान्तर, हें महान् परिवर्तन घडून यावें हें गीतेचें उद्दिष्ट आहे: मानवांतील ईश्वर, अवतार, गुरुरूप भगवान् गीतेंत सांगतात, 'हें महान् रूपान्तर स्वतांमध्यें घडवून आणा' असें मी निवडक सुपात्र मानवांना आवाहन करतो: निवडक, निवडीस योग्य असें सुपात्र मानव या बाबतींत कोणते? मन, प्राण व शरीर हीं प्रकृतीचीं साधनें अज्ञान-व्याप्त असल्याचें ओळखून, या अज्ञानाच्या तंत्रानें जे आपली इच्छाशक्ति राबवीत नाहींत, जे या अज्ञानाच्या गुलामगिरीपासून तिला परावृत्त करून, आत्म्याच्या खोलांत खोल अशा अनुभवाकडे, तिच्यासह वळतात: आंतरात्म्याचें, विश्वात्म्याचें ज्ञान करून घेतात, आंतील ईश्वराशीं संबंध जोडतात, ईश्वरांत प्रवेश करण्याची आपल्या बाह्य आत्म्याची शक्ति जागृत व कार्यक्षम करतात, ते सर्व सुपात्र मानव होत. मानवाच्या आंतरिक अस्तित्वांतील उपरिनिर्दिष्ट गोष्टींवर श्रद्धा ठेवणारे, आंतरिक अस्तित्वाचा श्रेष्ठ व्यवहारधर्म मान्य करणारे, ते सर्व सुपात्र मानव होत. ही श्रद्धा, ही मान्यता आत्मसात् करणें मानवी बुद्धीला जड जाते: तिच्या संबंधीचें झालेलें अज्ञान तिला गोड वाटतें. या अज्ञानाच्या अधिष्ठानावर ती स्वत: ज्या नानाढंगी अंधुक मेघाकृती चितारीत असते, जे लुकलुकणारे, अंधकार दाखविणारे दिवे लावीत असते, त्यांची ओढ तिला असते; मनाच्या, नाडीसंघाच्या, शरीराच्या

संवयी तिला अगम्य असल्या तरी सोईच्या व आकर्षक असतात; या विविध आकर्षणांमुळें, आसक्तींमुळें मानवाच्या बुद्धीला नवी श्रद्धा, नवे व्यवहार-नियम, त्यांचें श्रेष्ठत्व मान्य करून-हि आत्मसात् करणें फार जड जातें. परंतु एकदां ही नवी श्रद्धा, हा नवा व्यवहार-धर्म आत्मसात् केला गेला, म्हणजे तो मानवाचा महान् तारक ठरतो. कारण मानवाच्या अस्तित्वाच्या वास्तविक सत्यांचें स्वरूप आंतरिक आहे, आणि त्याचा अत्यंत आंतरिक, सर्वश्रेष्ठ स्वभावधर्म हा, आंतरिक चैतन्याचें, ईश्वराचें ज्ञान करून घेऊन, त्याच्याशीं संबंध जोडून त्यांत प्रवेश करण्याचा आहे.

पण हें रूपान्तर, हें परिवर्तन फार फार मोठें, फार असामान्य आहे: तुमचें अस्तित्व तुमची प्रकृति सर्वच्या सर्व पूर्णपणें सामान्यत्व टाकून इकडे वळली पाहिजे, पूर्णपणें या नव्या पंथाची झाली पाहिजे; असें झालें तरच हें महान् परिवर्तन शक्य आहे, एरव्हीं नाहीं. हें परिवर्तन घडून येण्यासाठीं तुमचा आत्मा, तुमचें जीवन, तुमची प्रकृति सर्वोत्तमाला पूर्णपणें समर्पित व्हावयास हवी; सर्वोत्तमाखेरीज कांहींहि तिला व त्यांना इष्ट वाटतां कामा नये; कारण त्यांनीं कोणतीहि गोष्ट धारण करावयाची, ती त्या सर्वोत्तमासाठींच केवळ धारण करावयास हवी; त्यांनीं कोणतीहि गोष्ट मान्य करावयाची, ती ती ईश्वरस्थ आहे, ईश्वराचें रूप आहे, ईश्वराला इष्ट आहे म्हणून मान्य करावयाची आहे—या वर्गांत पडत नसेल अशी कोणतीहि गोष्ट त्यांनीं मान्य करावयाची नाहीं. हें महान् परिवर्तन घडून येण्यासाठीं तुम्हांला नवें सत्य मान्य करावें लागेल; तुमच्या मनाला पूर्णपणें नवें वळण द्यावें लागेल, नव्या ज्ञानाकडे तुमचें मन आस्थेनें वळेल असें करावें लागेल. तुम्ही स्वतः दुसरे जीव, जग, जगदीश, आत्मा, प्रकृति यासंबंधींच्या नव्या ज्ञानाकडे, एकतेच्या-अद्वैताच्या ज्ञानाकडे, विश्व-व्यापी ईश्वराच्या ज्ञानाकडे तुमचें मन आस्थेनें वळेल असें करावें लागेल; —मनाला या-प्रमाणें वळण लागल्यावर हें नवें ज्ञान प्रथम तुमची बुद्धि पडताळून पाहून मान्य करील; पण एवढ्यानें आपणांस इष्ट असलेलें महान् परिवर्तन घडून येणार नाहीं—त्यासाठीं अखे-रीस तुमच्या आत्म्याला, वरील ज्ञानविषयभूत गोष्टींचें दर्शन घडावयास हवें, आत्म्याच्या जाणिवेंत या गोष्टी अंतर्भूत व्हावयास हव्या व हें नवें दर्शन आत्म्याचें नित्य दर्शन, नित्य अवस्था होऊन त्याच्या सर्व हालचाली या दर्शनाच्या चौकटींत घडून यावयास हव्या.

" या नव्या ज्ञानाबरोबर, हें नवें ज्ञान, हें नवें दर्शन, ही नवी जाणीव आपल्या कृतीची एकमेव प्रेरणा बनवील अशी इच्छा सुद्धां या नव्या महान् परिवर्तनासाठीं अवश्य आहे; या प्रेरणेनें घडणारी कृति कुरकुरत केलेली, मर्यादित स्वरूपाची रहाणार नाहीं; प्रकृतीच्या थोड्याशा आवश्यक क्रियांपुरतीच ही प्रेरणा नसेल; व्यावहारिक दर्शनी पूर्णतेला उपकारक अशा थोड्याशा गोष्टी, धार्मिक वृत्तीला उपकारक, वैयक्तिक मुक्तीला उपकारक अशा थोड्याशा गोष्टी करून घेण्यापुरतीच ही नव्या ज्ञानाची प्रेरणा नसेल; तर, समदृष्टीनें युक्त असा आत्मा मानवी जीवनांत जें कोणतेंहि कार्य (जीवन व्यवहार) ईश्वरा-करितां, सर्व जीवांच्या कल्याणासाठीं करतो—त्या कार्यामागें (त्या व्यवहारामागें) या नव्या ज्ञानाची, दर्शनाची प्रेरणा असेल. तेव्हां मानवी अस्तित्वाच्या महान् परिवर्तनासाठीं ज्याप्रमाणें उपरिनिर्दिष्ट नवें ज्ञान व दर्शन हवें, त्याचप्रमाणेंच हें नवें ज्ञान आणि दर्शन आपल्या कृतीची एकमेव प्रेरणा बनवील अशी इच्छाहि मानवाचे ठिकाणीं जागृत झाली

पाहिजे. या महान् परिवर्तनांत आणाखी कांहीं गोष्टींचा पूर्वतयारी म्हणून अनिवार्यपणें अंतर्भाव होतो. हृदयाला सर्वोत्तमाची अनन्यभावानें ओढ लागावी लागते, त्या दिव्य पुरुषाचें प्रेम, त्या परमेश्वराची भक्ति, अनन्यभावाचें प्रेम आणि भक्ति हृदयांत भरून जावी लागते. तसेंच शांत आणि प्रकाशमय झालेलें हृदय विस्तारानें व्यापक होऊन, सर्व भूतांत असणाऱ्या परमेश्वराला त्यानें आलिंगन द्यावें लागतें; मानवाचा सध्यां जो संवयीचा सामान्य स्वभाव आहे, तो बदलून त्याची जागा सर्वश्रेष्ठ ईश्वरी आध्यात्मिक प्रकृतीनें घ्यावी लागते. थोडक्यांत, उपरिनिर्दिष्ट महान् परिवर्तनासाठीं एका महान् योगाची (पूर्णयोगाची) आवश्यकता आहे. या महान् पूर्णयोगांत, पूर्णज्ञानाचा योग, पूर्ण संकल्पाचा आणि तज्जन्य कर्मांचा योग, पूर्ण प्रेमाचा व भक्तीचा योग, आणि सर्व अस्तित्वाच्या आणि त्याच्या सर्व अंगांच्या, अवस्थांच्या, शक्तींच्या व गतींच्या पूर्ण आध्यात्मिक पूर्णतेचा योग—या सर्व योगांचा अंतर्भाव एकाच वेळीं अभिप्रेत आहे.

"आतां, या महान् वा पूर्ण योगांतील पूर्ण ज्ञान म्हणजे काय तें पाहूं : हें ज्ञान बुद्धीनें मान्य करावयाचें असतें, आत्म्याच्या श्रद्धेचा आधार या ज्ञानाला मिळावा लागतो; मन, हृदय आणि जीवन या ज्ञानाला सत्य आणि जिवंत वस्तु म्हणून स्वीकारतील असें करावें लागतें. या ज्ञानाचा विषय परात्पर आत्मा, परात्पर चैतन्य हा असतो. हा आत्मा एकच एक आहे, अखंड अविभाज्य आहे; हा आत्मा सनातन आहे; तो कालस्थल, नामरूप, अवघें विश्व यांच्या पलीकडे आहे, व्यक्तित्व आणि अव्यक्तित्व दोन्ही अवस्था या आत्म्याच्या असून, तो या अवस्थांच्या पलीकडे आहे—कालस्थलादि सर्व या आत्म्यापासून उदयास येतें; या एकमेव आत्म्याचीच अभिव्यक्ति बहुरुपी प्रकृति करते, तिच्या बहुविध मूर्तींचा सर्व पसारा या एकमेव आत्म्याचीच अभिव्यक्ति करतो. हा आत्मा निर्व्यक्तिक, सनातन, अक्षर आहे, शांत अनंत आहे, सम एकरस आहे—या सर्व सारख्या बदलणाऱ्या पसाऱ्यांत, व्यक्तींच्या आत्मशक्तींच्या, प्राकृतिक शक्तींच्या बदलणाऱ्या या पसाऱ्यांत, या क्षणिक बाह्य अस्तित्वगत अगण्य आकारांच्या, शक्तींच्या, घटनांच्या बदलणाऱ्या पसाऱ्यांत हा एकरस आत्मा बदलत नाहीं; विकार पावत नाहीं; हा आत्मा वस्तुतः अविकार्य असला तरी प्रकृतीच्या क्षेत्रांत नित्य विकार पावणारा, नित्य बदलणारा दिसतो. प्रकृतीच्या क्षेत्रांत हा देही—देहाचें अर्थात् आकाराचें घर करून राहणारा—होतो, होतोसा दिसतो, प्रकृतिनिर्मित प्रत्येक आकाराला अनुरूप असा आकार हा निराकार देही घेतो; हा देही त्याच्या शक्तीच्या प्रत्येक अवस्थेला व क्रियेला अनुरूप असें रूप धारण करतो—हा एकमेव परात्पर आत्मा सर्वकांहीं होतो, आणि त्याचवेळीं या सर्व कांहींहून सर्वकाळ अनंतपटीनें व्यापक असतो; हा मानवांत, पशूंत, वस्तूंत राहतो; हा विषय आहे आणि विषयी पण आहे; हा आत्मा आहे; मन, प्राण, जडत्व आहे; प्रत्येक वस्तु, प्रत्येक शक्ती, प्रत्येक जीव हा एकमेव परात्पर आत्माच होतो; उपरिनिर्दिष्ट महान् योगांतील पूर्ण ज्ञान हें असें आहे."

—श्रीअरविन्द.

अनुवादक- सेनापति पां.म.बापट.

# श्रीमाताजींचीं प्रवचनें

## १

## खरें कारण

ज्यांना खरा मार्ग अवलंबावयाचा असतो, त्यांच्यावर साहजिकच असद्भावयुक्त विरोधी शक्तींचे हल्ले होण्याचा नेहमींच संभव असतो. ह्या शक्ती कांहींहि जाणून घेण्यास असमर्थ असतात, एवढेंच नव्हे तर जें कांहीं त्यांना समजत नाहीं त्याचा त्या बहुशः द्वेषच करतात.

लोक तुम्हांविषयीं कांहीं उपरोधिक बोलतात किंवा तुम्हांला मूर्खांत काढतात म्हणून जर तुम्ही त्रासलांत, कष्टी झालांत किंवा नुसतें नाउमेद जरी झालांत, तर त्यामुळें तुमच्या मार्गावर तुम्हांला प्रगति करतां येऊं शकणार नाहीं. परंतु या गोष्टी तुमच्या वांट्याला येतात याचें कारण तुमचें नशीबच खोटें असतें अथवा तुमच्या नशिबांत दुःखच ठेवलेलें आहे असें मुळींच नाहीं. उलट याचें कारण अगदींच वेगळें असतें. दिव्य चैतन्य आणि परम कृपाशक्ति यांनीं, तुमचा या मार्गावर प्रगत होण्याचा निश्चय खरोखरीचा आहे असें धरलेलें असतें व तुमचा निश्चय किती अंतःकरणपूर्वक आहे व वाटेवरील संकटांना तोंड देण्यास तुम्ही कितपत समर्थ आहांत हें पाहण्यासाठीं तुमच्या परिस्थितीला योग्य असें वळण त्यांच्याकडून दिलें जात असतें.

म्हणून असें करा. कोणी तुम्हांला हंसलें किंवा कांहीं मनाला लागेलसें असें अथवा टाकून बोललें, तर पहिली गोष्ट ही करा: स्वतःच्या आंत पहा आणि आपल्या कोणत्या दौर्बल्यामुळें अथवा अपूर्णतेमुळें असा प्रसंग आला हें शोधा. इतर लोक तुमचें महत्त्व ओळखत नाहींत किंवा तुम्हांला वाटतें तितकें तुमच्या गुणांचें चीज करीत नाहींत म्हणून असंतुष्ट, निराश किंवा दुःखी होऊं नका. उलट तुमच्या ठिकाणची कोणती कमतरता, विकृति वा दौर्बल्य तुम्हीं ओलांडलें पाहिजे हें तुमच्या ध्यानांत आणून दिल्याबद्दल तुम्हीं भगवंताचे उपकारच माना.

शिवाय तुम्हांला खरोखरीच जर हा मार्ग आक्रमावयाचा असेल आणि योगाभ्यास करावयाचा असेल, तर लोक आपलें कौतुक करतील वा मान देतील किंवा त्यांनी तसें करावें म्हणून हें सर्व तुम्हीं करतां कामा नये. तुमचें जीवन त्यावाचून निरर्थक आहे किंवा तुमच्या जीवनाची ती अनिवार्य अशी गरज आहे किंवा अन्य कोणत्याहि मार्गानें तुम्हांस संतोष लाभणार नाहीं म्हणून हें सर्व तुम्हीं करीत आहां असें असलें पाहिजे. लोक तुमचें गुणग्रहण वा कौतुक करतात किंवा नाहीं, या गोष्टीला वास्तविक मुळींच महत्त्व नाहीं. ही गोष्ट तुम्ही स्वतःला आधींच सांगू शकाल, कीं सामान्य माणसापासून तुम्ही जसजसे अधिकाधिक दूर जाल, त्यांच्या जीवनरहाटीपेक्षां तुमची जीवनपद्धति त्यांना जसजशी वेगळी वाटूं लागेल, तसतसें तुमचें गुणग्रहण करणें साहजिकच त्यांना अवघड जाईल. कारण तुमची

भूमिका त्यांना समजूंच शकणार नाहीं. अर्थात् मी पुन्हां सांगते कीं, वास्तविक या गोष्टीं-ना कांहींहि महत्त्व नाहीं.

वेगळ्या तऱ्हेचें जीवन तुम्हांला जगतांच येणार नाहीं म्हणून या मार्गाचा अवलंब करणें, दिव्यजीवनार्थ स्वतःला वाहून घेतल्याशिवाय रहावतच नाहीं म्हणून त्या साधनेस वाहून घेणें, स्वतःचें स्वभावपरिवर्तन व्हावें व आपलें जीवन अंधारांतून प्रकाशांत परिणत व्हावें यासाठीं खटपट केल्यावांचून रहावतच नाहीं म्हणून तसा प्रयत्न करणें, तेंच तुमच्या जीवनाचें सारसर्वस्व असणें हेंच खऱ्या श्रद्धेचें, खऱ्या मनःपूर्वकतेचें लक्षण आहे. याप्रमाणें तुमची स्थिति असेल तर खात्री बाळगा कीं, तुमचीं पावलें योग्य मार्गावर, योग्य रीतीनें पडत आहेत.

## २

## प्रगतीचा आनंद

तुम्ही जेव्हां एखादा प्रयत्न करतां, तेव्हां तुम्हांला त्याचें ताबडतोब फळ हवें असतें. तुम्हीं नेहमींच घाईत असतां. सर्व कांहीं शक्य तितक्या लवकर उरकून टाकण्याच्या तुम्हीं मागें असतां.

हें असें कां असतें ? यास कारण, मुळांतच तुमच्याठिकाणीं हा प्रगतीचा आनंद नसतो. कारण जर तुम्हांमध्यें प्रगतीचा आनंद असेल, तर तुमची भूमिका अगदीं वेगळी बनून जाईल. पृथ्वीवरील अतिमानसाचें ध्येय ज्यानें समोर ठेवलेलें आहे, तो त्याची प्राप्ति झाल्यावरहि निश्चित असाच विचार करील, कीं आज प्राप्त झालेली ही अवस्था अनंत कालप्रवाहांतील केवळ एक मधली पायरी आहे. त्यानंतर आणखी दुसरी अवस्था येईल आणि त्यानंतरहि पुन्हां आणखी दुसरी कांहीं गोष्ट येईल आणि पुन्हां तिसरी आणि पुन्हां आणखी पुढची .....असें अनंत काल चालणार; नेहमीं पुढें पुढेंच गति चालत राहणार. अर्थात या जाणिवेनेंच तुम्हीं आनंदानें भरून जाल.

या उलट, "आपलें जें उद्दिष्ट होतें, तें हातीं आलें; झालें, आतां स्वस्थ बसून, मिळ-विलेल्याचा उपभोग घ्यायचा" असा विचार तुम्ही करूं लागलांत, तर ती कल्पनाच तुमचें जीवन कंटाळवाणें करून टाकील. त्याक्षणींच, तुम्ही म्हातारे होऊन जाल; तुमची वाढ थांबेल.

आपण असेंहि म्हणूं शकूं, कीं अविरतपणें विकसत राहणें, वाढत राहणें हेंच वास्तविक खरेंखुरें शाश्वत तारुण्य आहे. क्षमता वाढत रहावयाच्या, अनेक संभाव्यता एकसारख्या फुलत रहावयाच्या, कर्मक्षेत्राचा सतत विकास होत रहावयाचा, जाणिवेचेंहि क्षेत्र विस्तृत होत जावयाचें आणि बारीक बारीक तपशिलाच्या गोष्टींतहि सतत प्रगति करत रहावयाचें, याचेंच नांव निरंतरचें तारुण्य.

एकामागून एक चढत्या वाढत्या, पुढच्या पुढच्या पायऱ्यांवर चढत चढतच मानवी जीवन हें प्रगत होत असतें. एका दृष्टीनें पाहतां, जसजसें तुम्ही प्रगत होत जातां, तसतशा एकदां जुन्यापुराण्या वाटूं लागलेल्या कांहीं गोष्टीच अगदीं नवीन स्वरूप धारण करतात.

एकदां शिडी चढत चढत शेवटच्या पायरीवर पोंचलें, म्हणजे साहजिकच मनुष्य उतरून खालीं येणारच. अर्थात् असें अधःपतन होणें ही गोष्ट दुर्दैवाचीच म्हणावी लागेल. कारण ही संवय वाईटच आहे. उदाहरणार्थ असें पहा. समजा विशिष्ट मर्यादेनंतर वाढ होण्याचें थांबेल, तर काय करतां येईल ? प्रगतीस उपयोगी पडणारी शक्ति आपणांस दुसऱ्या कामीं लावतां येईल. तिच्या साहाय्यानें आपल्या शरीरास पूर्णता आणण्याच्या बाबतींत प्रयत्न करतां येईल. त्यायोगें शरीर अधिकाधिक मजबूत व भक्कम होईल. त्याच्या ठिकाणीं भरपूर प्रतिकारशक्ति उत्पन्न होईल. प्रकृति निकोप राहील. तुमचें शरीर म्हणजे आदर्श, निकोप व सर्वांगसुंदर शरीराचा एक आदर्श ठरेल. त्याचबरोबर निर्दोष चारित्र्य, उच्चतर जाणीव, दिव्य भान, ज्ञानपूर्णता, सामर्थ्यसंपन्नता या गोष्टींचाहि तुम्हांस लाभ होईल आणि शिवाय शेवटी जें जें कांहीं शुभ, मंगलमय, सत्याधिष्ठित व सर्वांगपूर्ण आणि शुद्धप्रेम-मय असेल, त्या त्या सर्वांमधून परमेश्वराचा साक्षात्कार करून घेण्याची पात्रता तुम्हांला येईल.

जगाच्या आजच्या परिस्थितींत जेवढी अधिकांत अधिक प्रगतीची उंची गांठतां येणें शक्य आहे, तितक्या उंचीवर तुम्ही आलांत, म्हणजे आणखी एका नवीन अशा अधिक महान् शक्तीला खालीं आणून, त्या शक्तीच्या स्वरूपाला अनुरुप असें तुम्ही या जगास स्वरूप प्राप्त करून द्याल.

हें काम आलस्यपूर्ण व तमोमय स्वभावाच्या व्यक्तींकडून होणारें नाहीं हें उघडच आहे. ज्यांना प्रगति करण्यांत आनंद वाटतो, त्यांसाठीं हें काम आहे. जे कोणी मजकडे येऊन म्हणतात, कीं "मी या उभ्या आयुष्यांत कितीतरी काम केलें आहे, आतां मला जरा विसांवा हवा आहे. मला आश्रमांत जागा देतां कां ?" माझें त्यांना असें उत्तर असतें, "तें येथें होण्यासारखें नाहीं. विश्रांति घेत बसण्याचें हें स्थळ नाहीं. तुम्हीं पूर्वीं फार काम केलेलें असेल, पण पूर्वीं कधींहि केलें नसेल इतकें काम करण्यासाठीं हें ठिकाण आहे."

अशा लोकांना मी पूर्वीं श्रीरमणाश्रमांत जाऊन रहाण्याचा सल्ला देत असे. "तेथें जा आणि ध्यानस्थ रहा म्हणजे तुम्हांला शांति व विश्रांति मिळेल" असें मी त्यांना सांगत असे. आतां कांहीं तें शक्य नाहीं, म्हणून मी त्यांना हिमालयांत जाण्याचा सल्ला देऊन म्हणते "अनंत व शांश्वत अशा हिमशिखरांसमोर जाऊन बसा. त्यांतच तुमचें कल्याण आहे."

३

## सामूहिक साधना

**साधना ही जर केवळ वैयक्तिक नसून, सामूहिक असेल तर व्यक्तीनें साधनेच्या मार्गानें पुढें पुढें कसें जावें ?**

प्रत्येकानें स्वतः व्यापक, विशाल बनलें पाहिजे.

हें काम मोठें गुंतागुंतीचें आणि अनेकांगी आहे. त्यासाठीं पाहिजे अधिक सामर्थ्य, अधिक विशालता, व्यापकता, अधिक धीर, अधिक सहिष्णुता आणि अधिक चिकाटी व सहनशीलता.

तरीपण जें जें करणें आवश्यक आहे, तें तें जर प्रत्येकजण निर्दोषपणें करील, तर जणुं सर्वांची मिळून एक महान् विशाल व्यक्ति बनेल व ती जणु सर्वांसाठीं म्हणून साधना करीत असल्यासारखें होईल. समजा या सर्वांगपूर्ण योगाची साधना करणाऱ्या पन्नास व्यक्ती आहेत; त्यांतील एकच व्यक्ति जर कर्म करीत असेल, तर ती तें कर्म सर्वांसाठीं करीत आहे असें म्हणावें लागेल. पण जर कां त्या पन्नासांपैकीं प्रत्येक व्यक्ति सर्वांसाठीं कर्म करूं लागेल, तर परिणामतः प्रत्येकजण जणु एकाच महान् व्यक्तीसाठीं कर्म करीत असल्यासारखें तें होईल. कारण प्रत्येकजण हा प्रत्येकासाठीं कर्म करीत असेल. अर्थात् त्याठिकाणीं सर्वांमध्यें अशी एकता निर्माण व्हावयास पाहिजे, कीं एक दुसऱ्यापासून वेगळा असा ओळखताच न आला पाहिजे. खरी काम करण्याची आदर्श रीति हीच कीं, ज्यायोगें सर्वांचें मिळून जणुं एकच शरीर बनून जातें; सर्व मिळून एकच व्यक्ति बनून जाते, जी एकाच वेळीं स्वतःकरितां व सर्वांकरितां कार्यरत असते. आपलें व दुसऱ्याचें असा मुळीं भेदच तेथें नसतो.

खरें सांगायचें तर, जेव्हां मी श्रीअरविंदांना भेटले, तेव्हांहि प्रथम हाच प्रश्न आम्हां-समोर उभा राहिला होता. जगापासून स्वतःस दूर तोडून घेऊन, दुसऱ्याशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध न ठेवतां, दोघांनीं तीव्र अशी व्यक्तिगत साधना करून, आपलें अंतिम उद्दिष्ट गांठावयाचें व नंतर दुसऱ्यांशीं मिसळावयाचें, कीं सर्वांना बरोबर घेऊन हें सर्व करावयाचें?— ज्यांचीं समान अभीप्सा असेल. त्यांना त्यांना आपणाकडे येऊं देऊन, त्यांतून आपोआप स्वाभाविकपणें एक घनिष्ट संघात उत्पन्न होऊं द्यावयाचा आणि सर्वांनीं मिळून आपल्या ध्येयाकडे पुढें कूच करीत जावयाचें ? हे दोन संभाव्य मार्ग त्यावेळीं आम्हांपुढें होते.

त्यांतून जो निर्णय आम्हीं घेतला, तो मानसिक निर्णय नव्हता; अगदीं स्वाभाविकपणें आणि अभावितपणें एक समूह निर्माण झाला आणि जणु एक अटळ आणि निकडीची गोष्ट म्हणूनच ती निर्मिति झाली. एकप्रकारें पाहतां त्यांतून कांहीं निवड करण्याचा तेथें प्रश्नच राहिलेला नव्हता.

वास्तविक असेंच आहे. तुम्हीं त्या मार्गाचा अवलंब करून सुरुवात करण्याचीच खोटी असते. एकदां मार्गावर पावलें टाकण्यास प्रारंभ केला, कीं मग शेवटपर्यंत जावेंच लागतें.

जर हें काम तुम्हांला एकट्यानें, एकाकी राहून करावयाचें असेल तर तें कधींहि सर्वांग-पूर्णतेनें व निर्दोषपणें करतां येणें शक्य नाहीं. कारण आपलें भौतिक जीवन, मग तें किती कां उच्च दर्जाचें असेना, किती कां पूर्णत्वसंपन्न असेना, जरी तें एकाद्या विशिष्ट कार्याकरितां निर्माण झालेलें असलें, तरीहि त्यामध्यें घडलेलें कार्य केव्हांहि अंशभाग व मर्यादितच असणार. भौतिकवन हें केवळ सत्य जीच्या एकाच अंगाचें आपणांस दर्शन घडवूं शकतें; विश्वांतील एखादाच कायदा अथवा नियम तें व्यक्त करूं शकतें. अर्थात् कदाचित् हा कायदा अनेक अंगांनीं युक्त असूं शकेल; नाहीं असें नाहीं. पण असें असलें तरी, तो अनेक कायद्यांपैकीं एकच कायदा. अशाच अनेकांगी कायद्यास भारतानें 'धर्म' असें नांव दिलें. अर्थात् हें तर उघडच आहे, कीं अशा अनेकांगी पण मर्यादित स्वरूपाच्या नियमनानें आपादमस्तक वा सर्वांगपरिपूर्ण स्वरूपाचें परिवर्तन होणें ही गोष्ट अशक्यप्राय आहे.

केवळ याच कारणाकरितां येथें एक समष्टि निर्माण झाली.

तुम्ही स्वतः एकटे एकट्यापुरतें पूर्णत्व कदाचित् प्राप्त करून घेऊं शकाल. तुमची चेतना

अमर्याद व परिपूर्णहि होऊं शकेल. कारण आंतरिक अनुभूती या अमर्याद अनंत असतात. पण उलटपक्षीं भौतिक पातळीवरील सिद्धीविषयीं बोलावयाचें तर, तिला कांहींना कांहींतरी मर्यादा ही पडणारच; आणि म्हणूनच जर तुम्हांला सार्वत्रिक अशा स्वरूपाचें कार्य अथवा यश हवें असेल, तर त्यासाठीं सामूहिक स्वरूपांत साधना करणाऱ्या साधकांची एक विशिष्ट संख्या तरी एकत्र आणण्याची नितांत आवश्यकता असते.

फार प्राचीन अशा एका परंपरेनें १२ ही संख्या दिलेली आहे. पण आधुनिक काळांतील संकीर्णता लक्षांत घेतां ही संख्या पुरेशी नाहीं. एक प्रातिनिधिक समूह असणें अवश्य आहे. याच कारणामुळें, तुम्हांला त्याची कल्पना नसली तरी, तुमच्यापैकीं प्रत्येकजणच कोणत्या ना कोणत्यातरी स्वरूपाच्या अशक्यतेचें प्रतिनिधित्व करीत आहे असें मीं सांगितलें. सर्वांगपूर्ण परिवर्तनाच्या आड येणाऱ्या ज्या अडचणी आहेत, त्यांपैकीं एकेका अडचणीचें जणुं तुम्ही प्रत्येक-जण प्रतिनिधित्व करीत आहांत. अर्थात् त्यामुळें अनेक स्वरूपाच्या अडचणी उत्पन्न होतात. प्रत्येकाला स्वतःच्या असंभाव्यतेस संभवनीय कोटींत आणण्याचें काम मोठ्या मेहनतीनें करा-वयाचें असतें. अशा रीतीनें जेव्हां सर्व असंभाव्यतांचें, अशक्यतांचें निरसन होईल, तेव्हांच आपणासमोरील अतिमहान् कार्य तडीस गेलें, असें म्हणतां येईल.

आतां काळ बदलला असल्यामुळें मी जरा अधिक सहानुभूतीच्या भाषेंत म्हणूं शकेन, कीं, असंभाव्यता नव्हे, तर आतां फक्त तुम्हांला जराशा अडचणींना तोंड देण्याची जरुरी आहे. कारण असेंहि असणें शक्य आहे कीं, पूर्वी ज्यांना आपण असंभाव्यता म्हणत होतो, त्या आतां असंभाव्य गोष्टी राहिलेल्या नसतील.

आपल्या साधनेचें स्वरूप अशाप्रकारें सामूहिक असल्यामुळें, कोणी मजकडे येऊन सांगूं लागला कीं, 'बाहेर मला अतिशय अडचणी येत आहेत, त्या मी ओलांडूं शकत नाहीं, तरी मी येथें येऊं कां ? येथें येऊन मला अडचणींना तोंड देण्याच्या कामीं चांगली मदत होऊं शकेल', तर मी त्याला सांगते—पूर्वींहि सांगत असे आणि आतां तर साधकांची संख्या विशेष-च वाढली असल्यामुळें विशेष जोर देऊन सांगते—कीं, "तसें तर मुळींच नाहीं. तूं येथें आलास तर तुला तें अधिकच कठीण जाईल. येथें अडचणी तर अधिकच वाढतील. कारण येथें आल्यानंतर तुला केवळ स्वतःच्याच नव्हे तर इतरांच्याहि अडचणी स्वतःमध्यें सामावून घेऊन त्यांना तोंड देत रहावें लागेल. सर्व प्रकारचे संघर्ष, अनुकूल-प्रतिकूल संबंध, नानाविध क्रियाप्रतिक्रिया असें जें कांहीं बाहेरच्या वातावरणांतून तुमच्याकडे येईल, तें तें सर्व जणुं कांहीं तुमचा अंतच पाहण्यासाठीं किंवा तुमचें सत्वच घेण्यासाठीं, तुमच्या मर्माला हात घालून तुमची परीक्षा घेण्यासाठीं येईल. येथें कोणी तुम्हांला एकादाच शब्द बोलेल, तुमच्या संबंधीं असा कांहीं अभिप्राय तुम्हांला ऐकावा लागेल, कीं तो ऐकणें तुम्हांला आवडणार नाहीं. कोणी सहजच एकादी कृति करील आणि त्यायोगें तुम्ही दुखावले जाल. वरचेवर तुम्ही अशा कांहीं प्रसंगांत अथवा अशा कांहीं परिस्थितींत अडकाल, एकादी अशी कांहीं घटना घडून जाईल—अमुकच एक प्रकारें हें घडेल असें नव्हे—पण या सर्व गोष्टी तुम्हांला होऊं नयेत अशा वाटणाऱ्या असतील आणि नेमक्या त्याच तुमच्या बाबतींत घडत राहतील. बहुतेकांचे बाबतींत असेंच घडतें, घडत आलेलें आहे आणि अधिकाधिक घडत आहे. कारण तुमची योगसाधना प्रत्येकासाठीं म्हणजेच सर्वांसाठीं चाललेली असते."

जेव्हां कोणी मजकडे येऊन सांगतात, कीं "माझ्या योगसाधनेस पोषक अशी शांति, स्वस्थता व मोकळेपणा येथें मिळेल म्हणून मी येथें आलो आहे", तेव्हां मी त्याला सांगतें कीं, "येथें तसें कांहींहि नाहीं. ताबडतोब येथून कोठेंतरी दुसरीकडे तूं जा. येथल्यापेक्षां दुसरीकडेच तुला अधिक शांति व स्वास्थ्य यांचा लाभ होईल". पण जर कां कोणी मजकडे येऊन सांगेल कीं, "दिव्य कर्मास माझें जीवन वाहिलें पाहिजे अशी माझी तीव्र भावना झाली आहे; मला काम करावयाचें आहे. कोणतेंहि काम दिलें तरी तें मी करण्यास तयार आहे", तर सांगणारास मी उत्तर देते कीं, "जर तुझ्या अंगीं सदिच्छा, सोशिकपणा आणि पुरेशी क्षमता वा सामर्थ्य असेल, तर हें तुझें सर्व म्हणणें ठीकच आहे; पण जर कां तुझ्या आंतरिक प्रगतीसाठीं येथील एकांताचा उपयोग होईल अशा कल्पनेनें तूं इकडे येत असशील, तर मात्र त्यासाठीं तूं दुसरीकडे जाणेंच अधिक श्रेयस्कर. स्वतःमध्यें जर शांतता व एकांतता तूं निर्माण करूं शकत नसशील, अंतर्मुख होण्यासाठीं स्वतःस अलिप्त राखूं शकत नसशील, नित्याच्या जीवनाच्या धामधूमींतहि जर हें तूं करूं शकत नसशील, तर येथें तुला तें साधणार नाहीं. उलट सर्व बाजूंनीं, वस्तूंनीं आणि माणसांनीं तूं वेढून गेला आहेस असें तुला वाटेल व त्यांच्यापासून अलिप्त एकांतात राहणें तुला अशक्य होऊन जाईल".

हा अनुभव सर्वांच्याच बाबतींत खरा ठरणारा असा आहे. समजा, एकादा मनुष्य चांगल्या स्वभावाचा नाहीं, म्हणजे समजा तो रागीट आहे; तर बाहेरच्या जगांतल्यापेक्षां कदाचित् येथें तो अधिकच रागीट होईल. कारण बाहेरच्या जगामध्यें परस्परांच्या गरजेच्या भावनेमुळें एक प्रकारचें बंधन असतें––उदाहरणार्थ समजा, एकादा मनुष्य आपल्या मालकावर रागावला, तर त्याला नोकरीवरून कमी केलें जाईल. उलट येथें काय आहे, येथें तशा प्रकारची भीति मुळींच नाहीं. येथें एवढेंच सांगितलें जाईल, कीं "स्वतःवर संयम ठेवण्याचा प्रयत्न करा."

अशा रीतीनें अडचणी वाढण्याचें आणखीहि एक कारण आहे. तें कारण म्हणजे, हें स्थळ आहे भौतिक पातळीवर दिव्य जीवनाचा अनुभव घेण्याचें. या ठिकाणीं प्रत्यक्ष अनुभवास प्राधान्य दिलेलें आहे.

जगांतील नित्य-जीवनांत तुम्ही जणुं अर्ध-जागृतावस्थेंत राहतां. नेणिवेंत जगत असतां. तुम्हीं स्वतःसंबंधी अगदीं अजाण असतां. स्वतःचें अगदीं वरवरचें स्वरूप फक्त तुमच्या ओळखीचें असतें. स्वकर्तव्यपूर्तीच्या बाबतींत तुम्ही नेहमींच असमर्थ व अक्षम असतां आणि तसेच राहतां. अर्थात् त्यामुळें अडचणींना तोंड देण्याचा प्रसंगच तुमच्यासमोर उभा नसतो. तुम्ही अडचणींनी पूर्णपणें वेढून गेलेले नसतां. तुमचें सर्व जीवन, सर्व वागणें अगदीं वरवरच्या थरावरचें असतें. तुमचे दोषहि क्षुल्लक, तुमचे गुणहि सामान्य; तुमची क्षमताहि सर्वसामान्यच आणि तुमच्या अडचणीहि बेताच्याच, अशी तुमची स्थिति असते. सर्वच जीवन सामान्य तऱ्हेनें चाललेलें असतें.

पण जेव्हां तुम्ही दिव्य अनुभवाच्या मार्गास लागतां व मार्गक्रम करूं लागतां, तेव्हां तुमच्या ठिकाणच्या संभाव्यता व्यक्त दशेंत येण्यास प्रारंभ होतो आणि ताबडतोब तुमच्या अडचणीहि अत्यधिक प्रमाणांत वाढतात. सर्वच गोष्टींच्या बाबतींत अति तीव्र गतीनें हालचाल सुरू होते.

**"प्रत्येक व्यक्ति ही कोणत्या ना कोणत्यातरी प्रकारच्या अशक्यतेचें प्रतिनिधित्व करीत असतें असें आपण म्हणतां. असें असेल तर मग प्रत्येकानें आपापल्या अशक्यतेस शक्य कोटींत आणण्याच्या प्रयत्नांत आपल्या सर्व शक्ति प्रथम एकाग्र करणें अगत्याचें नाहीं कां?"**

त्यावर सर्व शक्ती एकाग्र केल्यानेंच केवळ हें साधेल असें नाहीं. तर प्रत्येकानें आपणामधील अशक्यतेस तोंड दिलें पाहिजे. कळत वा नकळत त्याला अशारीतीनें तोंड देणें भागच पडतें. या प्रश्नाकडे पहाण्याची ही एक दृष्टि झाली.

हें मीं तुम्हांस यापूर्वीच सांगितलेलें आहे. जेव्हां एखाद्या विजयाची संभाव्यता तुमच्या-ठिकाणीं असते, त्याचवेळीं तुम्हांमध्यें विजयाच्या अगदीं विरोधी असेंहि कांहींतरी असतें; आणि त्यामुळेंच तुम्हांला अडचणी व त्रास भोगावा लागत असतो.

प्रत्येकाची एक विशिष्ट, स्वतंत्र अडचण असते. एक उदाहरण पहा. समजा, एकाद्याला कोणत्याहि एकाद्या संघर्षात अथवा एकाद्या संकटासमोर धीटपणानें उभें राहून अंगचें शौर्य, धीटपणा व सामर्थ्य दाखविण्याचा आणि कशाचीहि तमा न बाळगतां चिकाटीनें, नेटानें पुढें पुढें जात राहाण्याचा प्रसंग आहे, तर सामान्यतः असें दिसेल कीं, त्याच्या ठिकाणीं असा एकादा भाग असतो कीं, जो अतिशय भ्याड व नामर्द असतो; आणि त्याला त्याविरुद्ध एकसारखा अविश्रांतपणें झगडा करावा लागत असतो. कारण असा एकसारखा झगडा करीत राहूनच तो त्या संभाव्य विजयाचें प्रतिनिधित्व करूं शकतो.

त्याप्रमाणेंच ज्याला सत्प्रवृत्त, दयामय आणि उदार अंतःकरणाचें बनावयाचें आहे, त्याच्याठिकाणीं असें कांहींतरी असतें, जें तुटक, बोंचक, नव्हे कधीं कधीं तर अगदीं दुष्ट असेंहि असतें; आणि म्हणून त्याला सत्प्रवृत्त व सद्‌गुणी होण्यासाठीं त्याच्याविरुद्ध झगडत झगडतच पुढें जाणें भाग असतें. असेंच इतर अनेक गुणसंवर्धनाच्या प्रयत्नासंबंधीं. अगदीं बारीक सारीक तपशिलांत शिरून पाहिलें, तरीसुद्धां हें खरें आहे.

आणि जेव्हां तुमच्यामध्यें, तुम्ही कुठें एकादी अगदीं काळीकुट्ट, खरोखरीच अत्यंत क्लेश-दायक अशी सांवली पाहतां. तेव्हां हेंहि निश्चित समजा, कीं त्याउलट असलेल्या प्रकाशाचीहि तुमच्याठिकाणीं तितकीच उत्कट संभाव्यता आहे.

४

## सर्वनिर्माता दिव्यानंद

"खरेंखुरें आत्मदान होण्यासाठीं बऱ्याच प्रमाणांत आध्यात्मिक प्रगति करून घेतलेली असावयास नको कां? कारण कमीअधिक प्रमाणांत कां होईना, जर व्यक्ति नेणीवव्याप्त जीवन जगत असेल, तर तिचें आत्मदान साहजिकच थोडेंबहुत मानसिक पातळीवरूनच होणार; तें खरेंखुरें आत्मदान होणार नाहीं. खरेंखुरें आत्मदान कसें करावयास पाहिजे? अगदीं प्रारंभापासूनच आत्मदान करतां येणें शक्य आहे काय?"

त्या त्या मनुष्यावर तें अवलंबून राहील. कांहींच्या ठिकाणीं बौद्धिक आकलनशक्तीपेक्षां आंतरात्मिक भावनात्मक वृत्ति अधिक जोरदार असते. त्यांना भगवंताविषयीं अनिवार्य

स्वरूपाचें आकर्षण अनुभवास येतें. तें आकर्षण म्हणजे काय आहे, त्या योगें काय दर्शविलें जातें याविषयीं बौद्धिक दृष्टीनें त्यांना कांहींच ज्ञान नसतें. केवळ एकप्रकारचें आकर्षण, भावना, एकप्रकारची उणीव, अगदीं अनिवार्य स्वरूपाची आवश्यकता त्यांना वाटत असते.

अशीं माणसें फार जलदीनें पुढें जातात. अर्थात् परमेश्वराच्या कृपेनें त्यांचें मन त्यांना त्रास देणारें नसलें पाहिजे. शंकेखोर आणि तर्ककुतर्क करणारें नसलें पाहिजे.

त्यांच्या बाबतींत आपणांस कांहीं अकल्पित चमत्कार पहावयास मिळतो. त्यांचें आत्म-समर्पण एका विशिष्ट मर्यादेपर्यंत होऊन, त्यांच्या आंतरात्म्याच्या द्वारां ते भगवत्सान्निध्याच्या भावनेंत राहूं लागले म्हणजे त्यांच्याठिकाणीं पूर्वीं नसलेली अशी, आंतरिक अनुभूति व्यक्त करण्याची आश्चर्यकारक शक्ति एकाएकी उत्पन्न झालेली दिसून येते.

फार फार पूर्वीं असेंच एक उदाहरण मीं फ्रान्समध्यें पाहिलें. एक अगदीं तरुण मुलगी होती. ती शिकलेली नव्हती; किंवा कसलाहि विशेष अभ्यास तिनें केलेला नव्हता. रंगभूमीवर फक्त ती नर्तन करीत असे. अर्थात् चांगल्या उच्च दर्जाची ती नर्तिका होती, एवढें मात्र खरें. तिकडच्या चालीप्रमाणें अर्थात् अगदीं बालवयांत, म्हणजे वयाच्या आठव्या वर्षींच, तिनें रंगभूमीवर पहिलें पाऊल टाकलें होतें. इतिहास, भूगोल, गणित इत्यादि न शिकतां फक्त नृत्यकलाच ती शिकली. ती अगदीं अजाण होती. स्वतःचे भाव कसे व्यक्त करावे याचें कांहींच ज्ञान तिला नव्हतें. ती तशी चुणचुणीत होती, पण तिची बुद्धि प्रगल्भ झालेली नव्हती. असें असूनहि तिला भगवंताविषयीं आकर्षण व एक प्रकारची अनिवार्य ओढ वाटूं लागली व त्यामुळें तिनें स्वतःस परमेश्वरचरणीं वाहून घेतलें.

भगवंतासाठीं म्हणून ती नृत्य करूं लागली आणि खरोखरीच आतां तिचें नृत्य विशेषच आकर्षक व मनोहारी होऊं लागलें. पुढें काय झालें, आपल्या आंतरिक भावना लेखन-द्वारां व्यक्त करण्याची तिला इच्छा झाली आणि ती काव्यमय भाषेंत पत्रें लिहूं लागली. अगदीं सहज सहज कित्येक पानेच्या पानें, मोठें आश्चर्य वाटेल अशातऱ्हेनें, ती लिहूं लागली.

परंतु पुढें तिच्यामध्यें असें कांहींतरी घडलें, कीं त्यामुळें कुठल्याकुठें नाहींसा झालेला जुना स्वभाव पुन्हां तिच्याठिकाणीं दिसूं लागला. नित्य जीवन व त्यांतील अडीअडचणी, गरजा, विवंचना सुरू झाल्या आणि ती पूर्वींच्या अगदीं सामान्य पातळीवर आली. असामान्य वाटणाऱ्या सर्व गोष्टी तिच्यांतून नाहींशा झाल्या. एक ओळसुद्धां धडपणें तिला तिच्या मातृभाषेंतहि लिहितां येईना. साध्या शुद्धलेखनाच्या सुद्धां असंख्य चुका ती करूं लागली ! अशारीतीनें ती अगदीं सामान्यांतली सामान्य मुलगी बनून गेली.

या उदाहरणावरून एक गोष्ट सिद्ध होते कीं, जेव्हां तुम्ही खऱ्या चेतनेप्रत पोंचतां, तेव्हां कोणतेच प्रश्न उरत नाहींत. जें काय तुम्हीं व्हावयास हवें असतें, तसें तुम्हीं होतां. जें काय तुम्हीं जाणावयास हवें असतें, तें तुम्ही जाणतां आणि जें कांहीं तुम्ही करणें आवश्यक असतें, तें करण्याचें सामर्थ्य तुम्हांस प्राप्त होतें; आणि आतांपर्यंतच्या सर्व अडचणी ताबडतोब नाहींशा होऊन जातात.

ज्या मुलीचें उदाहरण मीं सांगितलें तिच्या बाबतींत काय झालें ? तिच्या स्वतः-मधील उणीवेमुळें ती मागें खेंचली गेली नाहीं; दुसऱ्या एका व्यक्तीमधील कांहींतरी तिच्या-मध्यें शिरलें आणि तिचा असा अधःपात झाला. दुर्दैवाची गोष्ट ही कीं, बहुतेक वेळीं असेंच

घडतें जीवनामध्यें तुम्ही स्वतःवर कांहीं जबाबदाऱ्यांचें ओझें लादून घेतां आणि तेंच ओझें तुमच्या प्रगतीच्या आड येऊं लागतें.

कांहींच्यामध्यें जशी भावना ही प्रधान असते, तसें कांहींच्या बाबतींत बुद्धि प्रधान असते. त्यांची बुद्धि प्रगल्भ असते. त्यांनीं पुष्कळ अभ्यास केलेला असतो. कल्पनांचा व शब्दांचा खेळ कसा खेळावा हें त्यांना चांगलें कळत असतें. तत्त्वज्ञान, धर्म, मानवाच्या निरनिराळ्या समजुती यांविषयीं मोठी चित्ताकर्षक व तेजदार भाषणें ते करूं शकतात आणि असें असूनहि पाऊलभर प्रगति करण्यासहि त्यांना कित्येकदां वर्षानुवर्षे लागतात.

कारण या सर्व गोष्टी त्यांच्या डोक्यामध्यें चाललेल्या असतात. अशाच कितीतरी गोष्टी डोक्यांत घडत असतात. मीं तुम्हांला पुष्कळ वेळां हें सांगितलें आहे कीं, तुमचें डोकें म्हणजे एकादें बाजाराचें ठिकाण असल्यासारखें असतें. तेथें सर्वकांहीं शिरतें, येतें, जातें आणि सावळागोंधळ माजवून सोडतें; आणि जीं माणसें अशारीतीनें कल्पनांशीं खेळ खेळण्यांत मोठी पटाईत असतात त्यांच्याच प्रगतीला विशेषेंकरून फार अडथळे येतात. ही अशी कांहीं सुंदर व आकर्षक क्रीडा आहे, कीं ती केल्यानें तुमची अशी समजूत होते कीं आपण म्हणजे कोणी विशेष आहोंत; सामान्य पातळीवरील, सामान्य जीव आपण नाहीं ! पण वास्तविक ही खोटी समजूतच तुमचे पंख तोडून टाकीत असते.

अंतःकरणाला पंख असतात, डोक्याला नसतात. होय. अशा अंतःकरणाचीच अपरिहार्य जरुरी आहे. दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीची किंमत नाहीं. अंतःकरण म्हणजे सर्वकांहीं आहे. केवळ तेंच. दुसरें कांहीं नाहीं.

शिवाय, हें कांही असलें तरी, तुम्हीं या सर्व अडचणींना व अडथळ्यांना हंसत तोंड दिलें पाहिजे. त्यांनीं तुम्हांला कांहीं बाधा केली तरी त्याची काय खिजगणती ! किती काळ लागतो हेंहि महत्त्वाचें नाहीं. मार्ग दीर्घ असला तरी काय बिघडलें ? त्या दीर्घ मार्गावरून जात असतां, अभीप्सा, समर्पण व आत्मदान यांचा तर सतत दिव्य आनंद तुम्हांला लाभेलच.

कारण असा आनंद हाच केवळ खरा दिव्यानंद.

समजा हा आनंद मावळूं लागला, तर निश्चित समजा कीं, तुमच्या समर्पणामध्यें कांहींतरी—अहंकार, स्वार्थ—शिरलें आहे . . . . ज्याला तुम्ही आवश्यक गोष्ट असें मानतां ती वास्तविक असते हटवादीपणाची मागणी . . . . कारण त्याशिवाय अशारीतीनें तुमचा आनंद कधींच मावळणार नाहीं.

अगदीं पहिल्या प्रथम जर कोणत्या गोष्टींचा लाभ तुम्हांला होत असेल तर तो या दिव्यानंदाचा; आणि सर्वांत शेवटीं जर कोणत्या गोष्टीची जाणीव तुम्हांला होत असेल, तर ती याच गोष्टीची. हा आनंद हीच तर तुमच्या विजयाची खूण असते.

जोंवर सुस्थिर, शांतिपूर्ण, प्रकाशमय आणि अक्षय असा दिव्य आनंद-प्राप्त करून घेण्यास तुम्ही समर्थ झालेले नाहींत, तोंवर निश्चित समजा, कीं तुम्हांला आत्मशुद्धीसाठीं आणखी परिश्रम करण्याची अजून जरुरी आहे. कधीं कधीं ते परिश्रम अतिशय कष्टमय असेहि असतील. तरीपण ती एक खूण आहे एवढें मात्र खरें.

विलगपणाच्या, द्वैताच्या भावनेमुळेंच तर सर्व दुःख, कष्ट, यातनाभोग व अज्ञान आणि

सर्व प्रकारची अक्षमता आणि दुर्बलता या गोष्टीं आपणाकडे येत असतात. आत्मदान व सर्व-समर्पणाच्या भावनेंतून निर्माण होणारी आत्मविस्मृति या योगेंच सर्व प्रकारचें दुःख व भोग हे विलयास जातील आणि त्याजागीं असा दिव्यानंद अवतरेल कीं, जो कशानेंहि कधीं झांकोळला जाणार नाहीं.

हा दिव्यानंद जेव्हां या जगामध्यें सुप्रतिष्ठित होईल, तेव्हांच केवळ या जगाचें खरेखुरें रूपांतर होईल, येथें नवजीवनाचें दर्शन आपणांस होईल, नवसृष्टि दिसेल, नवसाक्षात्कार सर्वांस घडेल. हा दिव्यानंद पहिल्याप्रथम चेतनेमध्यें, जाणिवेमध्यें सुप्रतिष्ठित झाला पाहिजे. तसें झालें म्हणजेच मग भौतिक पातळीवरील रूपांतर होईल. तत्पूर्वी नाहीं.

हें मात्र नीट लक्षांत ठेवा कीं सामान्यतः ज्याला लोक आनंद म्हणतात, त्या आनंदाविषयीं मी हें बोललेली नाहीं. तो आनंद म्हणजे खऱ्याखुऱ्या आनंदाचें व्यंगचित्रहि शोभणार नाहीं. उलट तो आनंद म्हणजे तुम्हांला आडमार्गाला लावणारी अशी तुमच्या कल्पनेनें निर्माण केलेली एक अनिष्ट गोष्ट आहे. ऐंद्रिय सुख, आत्मभानशून्यता आणि तुटकपणा यांपासून उद्‌भूत होणारा तो आनंद वा संतोष असतो. मी ज्या आनंदाविषयीं बोलत आहे, तो आनंद म्हणजे पूर्ण शांति, छायाविरहित प्रकाश आणि सुसंवाद होय. संपूर्ण व सर्वांगीण सुंदरता, अनिरुद्ध सामर्थ्य आणि दिव्यानंद हा तत्त्वतः, व्यवहारतः आणि परमार्थतः भगवंताचें प्रत्यक्ष सान्निध्यच आहे.

प्रतिरोधक शक्तीमुळेंच केवळ, या जगामध्यें दुःख, कष्ट यांचें आगमन झालेलें असून त्यांच्यावर केवळ दिव्य आनंदच विजय मिळवूं शकेल. दुसऱ्या कशानेंहि निश्चितपणें व अंतिम स्वरूपाची अशी विजयप्राप्ति होणें शक्य नाहीं.

दिव्य आनंद हाच सर्वनिर्माता व सर्वप्रकारची परिपूर्ति करणारा आहे.

★

"तुम्ही म्हणतां कीं केवळ दिव्यानंदच फक्त प्रतिस्पर्ध्यास जिंकूं शकतो. पण हा दिव्यानंद प्राप्त करून घेण्यासाठीं तरी प्रथम प्रतिस्पर्ध्यास जिंकावयास नको कां?"

तुम्ही प्रतिस्पर्ध्याच्या अतीत गेलें पाहिजे, त्याच्याकडे दुर्लक्ष केलें पाहिजे.

सर्वांत आधीं एक गोष्ट तुम्हीं केली पाहिजे. ती म्हणजे प्रतिस्पर्ध्याच्या प्रभावापासून तुम्हीं खरोखरी मुक्त झालें पाहिजे. पण त्याच्या प्रभावापासून स्वतःचा बचाव करणें आणि त्याला जिंकणें या दोहोंत पुष्कळच अंतर आहे.

प्रतिपक्षास जिंकणें ही कांहीं लहानसहान गोष्ट नव्हे. प्रतिपक्षास जिंकावयाचें तर आपल्या अंगीं त्याच्यापेक्षां अधिक बळ हवें. परंतु शत्रूस खरोखरी पूर्णपणें जिंकण्याच्या पूर्वी आणि तो नाहींसा होऊन जाण्याच्यापूर्वीहि पुष्कळच आधीं सुद्धां, त्याच्या प्रभावापासून आपण स्वतःस पूर्णपणें मुक्त करून घेऊं शकतो; आणि ज्याक्षणीं तुम्ही त्याच्या प्रभावापासून पूर्णपणें मुक्त होतां, त्याक्षणीं तुमचें आत्मार्पण संपूर्ण होतें व त्या परिपूर्ण आत्मार्पणाबरोबरच दिव्यानंदाची प्राप्तीहि तुम्हांस होऊन जाते.

जगांत आतां प्रतिपक्षाची जरुरी उरली नाहीं असें झाले, म्हणजेच प्रतिपक्ष या जगांतून नाहींसा होऊन जाईल; आणि हेंहि आपणांस माहीत आहे कीं, सोन्याचा खरेखोटेपणा

समजण्यासाठीं जसा निकषाचा दगड असतो, त्याप्रमाणेंच आपल्या जीवनांत आपणांस कसोटी लावून पाहण्यासाठीं प्रतिपक्षाचीहि जरुरी असते.

श्रीअरविन्द ज्याला अंतःकरणपूर्वकता, प्रांजळपणा म्हणतात तो खरोखरीच जर तुमच्या अंगीं आला असेल, म्हणजे जेव्हां तुमच्या अभीप्सेला विरोधी असें कांहींहि तुम्हांमधून वर उठत नसेल, त्यामुळें तुमच्या आत्मसमर्पणाच्या संकल्पास बाध येत नसेल, तुमच्यांतील कांहींहि नाना बुरखे घेऊन त्याखालीं, जीवनावरील स्वतःची हुकमत चालूं ठेवण्याचा यत्न करत नसेल (कारण अशीं फसवीं सोंगें असंख्य असतात. नटवेपणा, धूर्तपणा, लबाडी, अति कपटीपणा यांनीं तीं भरलेलीं असतात. आणि दुर्दैवानें बिचाऱ्या मानवाचे ठिकाणीं, स्वतःला फसविण्याची उपजत जणुं एक विशेष प्रवृत्ति भिनलेली असते. शिवाय गंमत अशी कीं मनुष्य स्वतःला जितका अधिकाधिक फसवीत राहील, तितकी तितकी ही गोष्ट त्याच्या कमी कमी लक्षांत येते.) त्यावेळीं तुमच्या प्रतिस्पर्ध्यास तुमच्यापर्यंत येणें देखील शक्य होणार नाहीं. तसा तो प्रयत्नहि करणार नाहीं; कारण तसा प्रयत्न करणें म्हणजे एकप्रकारें त्यानें स्वतःच्या डोक्यावर कुऱ्हाड घालून घेण्यासारखें आहे.

अशीं कांहीं थोडीं माणसें असतात कीं, जीं जन्मतःच जणुं लढाऊ वृत्तीचीं असतात. आणि प्रतिपक्षाच्या प्रभावापासून स्वतःचा नुसता बचाव करण्यानें ज्यांचें समाधान होत नाहीं. आपण प्रतिस्पर्ध्याशीं दोन हात करून विजयी होऊंच अशी त्यांना खात्री असते. त्यांना स्वसामर्थ्याविषयीं आत्मविश्वास असतो. म्हणून त्यांची सर्व बाजूंनीं चांगली तयारी होईपर्यंत ते बिकट परिस्थितींत रहातात.

अर्थात् असे प्रसंग मोठे कठीण असतात.

अशा लोकांच्या बाबतींत केवळ परमेश्वरी कृपासामर्थ्यावरील त्यांची श्रद्धाच त्यांना तारते. कारण एकादेवेळीं त्यांच्या हांतून कांहीं मूर्खपणाच्या गोष्टी घडल्या, तरी त्यांच्याठिकाणीं असें कांहींतरी सुप्त असतें, कीं जें आयत्यावेळीं त्यांच्या मदतीस येऊन त्यांची संकटांतून मुक्तता करतें. एकादें मांजरीचें पिल्लू, पाण्यावरून आपल्याला चालतां येईल अशा भ्रमानें, पाण्यांत शिरतें आणि बुडूं लागतें, तेव्हां जशी मांजरी आयत्यावेळीं धांवून येऊन आपल्या पिलाला तोंडीं अलगद धरून वांचविते, तसेंच कांहीसें हें असतें.

परंतु अशाप्रकारें देवाची परीक्षा घेणें किंवा त्याच्यावर अयोग्यप्रकारें भार घालणें योग्य नाहीं, असें थोरांनीं अनेकवेळां सांगून ठेवलेलें आहे. तुम्हीं अविचारीपणानें स्वतःवर संकट ओढून घेण्याचें साहस केलें, तरीसुद्धां देव तुम्हांस त्यांतून वांचवावयाला आहेच, अशी समजूत करून घेऊन, तसें साहस करण्याचा वेडेपणा कधींच करूं नका. तसें करणें चांगलें नाहीं. कारण असें करण्यानें, तुम्ही कामांत सोपेपणा आणून कांहीं मदत करण्याऐवजीं त्यांत गुंतागुंतच निर्माण करून ठेवतां. असो.

-श्रीमाताजींच्या प्रवचनाधारें-

# श्रीअरविंद वाङ्मय

(नोव्हेंबर अंकावरून पुढें चालू)

(६)

## पायाभूत आवश्यक गोष्टी

या योगमार्गाचा अवलंब करावयाचा, तर प्रथम त्याची जीवनामध्यें निकड भासूं लागली पाहिजे. उच्चतर जीवनाची हांक कानीं आली पाहिजे. कांहीं महत्त्वाकांक्षा पुऱ्या न झाल्यानें अथवा जीवनांत अत्यंत निराशा पदरीं पडल्यानें मनाच्या अथवा भावनेच्या पातळीवरून जर ही हांक आलेली असेल, तर ती हा योगमार्ग स्वीकारण्याचे दृष्टीनें पुरेशी नाहीं; मग वरून वरून या निराशेनें वा महत्त्वाकांक्षेनें कोणतें कां रूप घेतलेलें असेना. करण तसें असेल तर, पहिली ऊर्मी कमी होतांच, पुन्हां साधनेंत निराशेचा काळ आल्याखेरीज रहात नाहीं. सामान्य पातळी सोडून अधिक उच्च पातळीवरील जीवन जगण्याची खरी आवश्यकता साधकाला स्पष्टपणें जाणवलेली असली पाहिजे. पाण्याबाहेर काढलेला मासा ज्याप्रमाणें पाण्यासाठीं तडफडतो, त्याप्रमाणें दिव्यजीवनार्थ साधकाला तहान लागलेली असली पाहिजे व या उत्कंठेचे मनावर आणि भावनेवर इतकें वाढत्या प्रमाणांत दडपण येत राहिलें पाहिजे, कीं त्यायोगें साधकाचें मन आणि सर्व भाव जणुं या जीवनपरिवर्तनाकरितां सतत उन्मुख व भुकेलेले असले पाहिजेत. दुसरी गोष्टः आध्यात्मिक जीवनाचे प्रकार अनेक असतात. त्यापैकीं कोणत्या प्रकाराविषयीं आपणांस अधिक आवड व ओढ आहे हें साधकानें पाहून त्याविषयीं, आपली नीट खात्री करून घेतलेली असली पाहिजे. कारण या पूर्णयोगाची ज्याला साधना करावयाची असेल, त्याची अभीप्सा ही त्याच्या अस्तित्वाच्या सर्वच्या सर्व स्तरांवरून स्पंदन करीत असणें जरूरीचें आहे. दिव्य चेतनेंत, दिव्य सत्यांत पुनः नवीनतेनें जन्मास येण्यासाठीं व परमेश्वराच्या दिव्य आविष्काराच्या सोहळ्यांत भागीदार होण्यासाठीं केवळ मानसिक किंवा भावनात्मक इच्छा पुरेशी नाहीं, तर शरीरस्थ प्राणशक्ति व शरीरांतील प्रत्यक्ष पेशी न् पेशी ह्याहि उत्सुक असल्या पाहिजेत. आंतून येत असलेली हांक जर केवळ **मुक्तीसाठींच** असेल, तर मग हा सर्वांगीण परिवर्तनाचा कठीण मार्ग निवडण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. मुक्तीची वाट दाखविणाऱ्या प्रचलीत मार्गांपैकीं कोणताहि मार्ग त्यानें स्वीकारावा हेंच योग्य.

आंतरीची हांक असल्यावर, नंतर जर कशाची गरज असेल तर ती **अंतःकरणपूर्वकतेची** अंतःकरणपूर्वकता म्हणजे जीवनाचीं सर्व अंगें, सर्व क्रिया आणि हालचाली यांना आपल्या आध्यात्मिक सत्याशीं सतत संलग्न ठेवण्याच्या दृष्टीनें, उच्च उच्चतर पातळीवर चढविण्याच्या दृष्टीनें, सतत तत्परतापूर्वक यत्नशील असणें. ही अंतःकरणपूर्वकता केवळ केंद्रस्थानीं म्हणजे फक्त मनांत किंवा अंतःकरणांत असली तर तेवढें पुरेसें नाहीं; तर ती जीवनाच्या सर्व थरांवर व पातळींवर व्यापून राहिलेली पाहिजे. तरच त्यायोगें जीवनांतील हरएक हालचाल

व कृति आपोआपच एकमात्र ध्येयाच्या दिशेनें व धोरणानें घडूं लागतील. ज्या उद्दिष्टाच्या सिद्धीसाठीं साधकाचे सर्व यत्न चालणार, त्याच्याशीं त्याचें अखिल अस्तित्वच प्रामाणिक असलें पाहिजे. त्याच्या विचारांतून अथवा कृतींतून ध्येयविसंगत असें कांहींहि व्यक्त होऊं नये, एवढेंच नव्हे तर ध्येयविरोधी अशा कशाचाहि त्यांना स्पर्शहि होतां कामा नये.

त्यानंतर पाहिजे **श्रद्धा.** परमेश्वराच्या सत्यत्वाविषयीं, त्याच्याकडे नेणाऱ्या मार्गाविषयीं आणि ज्या ईशकृपेमुळें आपणांस आपलें उद्दिष्ट साध्य होऊं शकतें तिच्याविषयीं श्रद्धा असणें अत्यंत आवश्यक आहे. येथें सुद्धां, ही श्रद्धा नुसती मनोमय अथवा केवळ बौद्धिक स्वरूपाची असून भागणार नाहीं. तीहि जीवनाची प्रत्येक पातळी व्यापून तेथें स्पंदन करीत राहिलेली असली पाहिजे. श्रीअरविंदांनीं चार प्रकारच्या श्रद्धा वर्णिल्या आहेत. पहिली मानसिकः तिच्यामुळें मनांतील सर्व संशय नाहीसे होऊन, ज्ञानास योग्य अशी पूर्वभूमिका तयार होते. दुसरी भावनात्मकः अपथ्यकारक व विरोधी स्वरूपाच्या शक्तीकडून होणारे हल्ले ही परतविते आणि भगवंताच्या इच्छेस व कार्यास अनुकूल व प्रभावी असें साधन या नात्यानें साधकाची तयारी ती करून देते. तिसरी शरीरगत श्रद्धाः साधना चालू असतां शरीरास तामसिकता, रोग व इतर यातना यांतून पार पडण्याचें ही सामर्थ्य देतें; आणि पार्थिव जडतत्त्वामध्यें दिव्य चेतनेचा प्रवेश होण्याच्या दृष्टीनें शरीराचें माध्यम शक्तिसंपन्न बनविते. शेवटची श्रद्धा आंतरात्मिकः परमेश्वराच्या प्रभावाचा, इतर कोणत्याहि माध्यमावांचून ती स्वीकार करते; आणि त्यायोगें सहाजिकच साधकाचें भगवच्चरणीं आपोआप सानंद समर्पण होतें, परमेश्वराशीं सख्यभाव निर्माण होतो.

अर्थात् हें सर्व असले, तरी मूळ अभीप्सा ही नेहमींच पाहिजे. परमेश्वराविषयींची ही अभीप्सा क्रियाशील, वर्धनशील, आणि जीवनाच्या सर्वांगांमध्यें अभीप्साग्नीची एकेक ज्योत पेटविणारी असली पाहिजे. म्हणजे कालांतरानें त्या सर्व ज्योतींतून एकच एक महान् अग्निज्वाला निर्माण होऊन, ती उच्चतम ध्येयशिखरास स्पर्श करील. ही अभीप्सा प्रभावी व्हावयाची तर तिला संकल्प-शक्तीची जोड पाहिजे. म्हणजे मग तिच्या मदतीनें अभीप्सेचें रूपांतर तदनुकूल अशा प्रत्यक्ष क्रियेमध्यें होईल. अभीप्सा व संकल्पशक्ति यांच्या संयुक्तक्रियेचें दर्शन मनाच्या ठिकाणीं, ज्ञानप्राप्ति व ज्ञानवृद्धीची तृष्णा या रूपांत होतें; भावनेमध्यें तिचें दर्शन अशा उत्कंठेच्या रूपांत होतें, कीं जीमुळें साधक सक्रिय रूपांत आपलें जीवन परमेश्वरचरणी अधिकाधिक समर्पित करूं लागतो. याच संयुक्त क्रियेमुळें अंतःकरणामध्यें भगवंताविषयींच्या प्रेमभावनेचा व भक्तीचा निर्झर वाहूं लागतो. भगवंताचा महिमा अंतःकरणावर ठसला जातो. शरीर सुद्धां सुस्थिर अशा शांतीसाठीं त्यांतील पेशीपेशींतून आवाहन करूं लागतें व त्यामुळें सुस्थिर शांतीचा लाभ होऊन त्यावर अध्यात्मसिद्धीची भक्कम इमारत उभी राहण्याची शक्यता निर्माण होते.

या सर्व गोष्टी साधण्याचें आणखी एक प्रभावी साधन आहे. तें म्हणजे **समर्पण.** स्वखुशीनें आपणहून स्वतःस दुसऱ्याच्या स्वाधीन करून टाकणें याला म्हणावयाचें समर्पण. या मार्गांत हें समर्पण असतें भगवंताचें चरणीं. आपलें संपूर्ण जीवन, त्याच्या अंगोपांगासह भगवंताचें हातीं "सर्वभावेन" देण्याची ही प्रक्रिया पायरी पायरीनें होत जाते. प्रथम जो अंश भगवंताकडे साहजिकपणें वळलेला असेल, तो भगवंताच्या हवालीं करून, पुढें उरलेलींहि

एकेक अंगें भगवंताचे चरणीं अर्पण केलीं जातात; त्याच्या सर्वस्वीं स्वाधीन केलीं जातात. हें समर्पण असतें दोन प्रकारचें. एक निष्क्रिय व दुसरें सक्रिय. प्रत्येक क्षणीं प्रत्येक कृति करतांना आपली इच्छा व भगवंताची इच्छा यांमध्यें सुमेळ राखण्याचा, ज्यावेळीं संकल्पशक्ति यत्न करीत असते व त्याचवेळीं भगवंताच्या इच्छेशीं अनुकूल असलेल्याच गोष्टींचा सहर्ष स्वीकार व विरुद्ध गोष्टींचा निश्चयपूर्वक परित्याग ती सतत जागृत राहून करीत असते, त्या प्रक्रियेला नांव आहे सर्वशरणभाव. हें झालें सक्रिय समर्पण. निष्क्रिय समर्पणांत अशी इच्छा मुळींच कार्यान्वित होत नाहीं. परमेश्वराची जी इच्छा असेल तिचा स्वीकार करण्याच्या तयारींत सबंध अस्तित्व राखणें एवढेंच साधकासमोर त्यांत उद्दिष्ट असतें. हा समर्पणाचा प्रकार आचरणास अतिशय कठीण असतो. कारण त्यांत अतिशय सावधगिरी ठेवावी लागते. कारण तितकी सावधानता राहिली नाहीं, तर साधक तामसिकतेंत बुडून जाण्याची वा हीन प्रकृतीच्या अदिव्य शक्तींच्या हातचें खेळणें होऊन बसण्याची भीति तेथें असते.

नंतरची आवश्यक असलेली गोष्ट म्हणजे **अखंड सावधानता**. साधनाकाळांत अनिष्ट व विरोधी भावतरंग व विचारतरंग आंत शिरून साधनेंत अंतराय आणण्याचा यत्न करीत असतात. तसेंच उर्ध्वतर दिशेनें उच्चतर जीवनाकडे नेणाऱ्याहि तरंगांचा प्रवेश साधकाच्या ठिकाणीं होत असतो. अशावेळीं साधकानें अत्यंत सावध राहून, अनुकूल व साहाय्यकारी लहरींचा स्वीकार करून, त्यांना डोळसपणानें योग्य ती दिशा लावण्यांत तत्पर रहावयास लागते. जोंवर परमेश्वरानें स्वतःच साधकाच्या योगसिद्धीचा सर्व भार स्वतःवर घेतलेला नाहीं व जोंवर वैयक्तिक यत्नांची गरज आहे, तोंवर ही सावधानता असणें अगदींच अपरिहार्य असतें. एकदां का परमेश्वरानें सर्व क्रियाप्रतिक्रियांना दिशा देण्याचें काम हातीं घेतलें म्हणजे मग या मानसिक सावधानतेची गरज उरत नाहीं. सर्व कांहीं आंतरात्म्या-कडून आपोआप केलें जातें.

कोणत्याहि स्वरूपाच्या आध्यात्मिक जीवनांत यशस्वी व्हावयाचें तर, आणि विशेषतः ज्या योगाचें ध्येय भगवंताच्या आविष्करण-कार्यांत सक्रिय भाग घेणें हें आहे, त्यांत व्यक्ती-च्या **'अहं चा' पूर्णतया निरास** होण्याची विशेषच जरुरी आहे. आजचा अहं ही आपल्या खऱ्या व्यक्तिमत्वाची विकृत प्रतिकृति असल्यामुळें, ती दूर केल्यावांचून मानवाच्या खऱ्या आत्मप्रकटीकरणास वाव मिळणें अशक्य आहे. मानवाचा अहंकार नाना सोंगें घेतो, नाना केंद्रांच्याद्वारां आपले हेतू सफल करून घेतो व स्वतःची तृप्ति करून घेतो. आपण अगदीं असहाय्य आहों असा बहाणा करून, आळसांत लोळणारा, दौर्बल्याचें समर्थन करणारा आणि अज्ञानाच्या अंधारांत स्वेच्छेनें जाऊन पडणारा असा एक तामसिक अहंकार असतो. त्याच-प्रमाणें स्वसामर्थ्याची व प्रभुत्वाची जाणीव असलेला राजसिक, स्वतःच्या ज्ञानाची व नीति-मानतेची जाणीव असलेला सात्विक आणि अखेरी स्वतःच्या साधुत्वाविषयीं जागृति असलेला एक आध्यात्मिकहि अहंकार असतो. यांपैकीं कोणतेंहि स्वरूप घेतलेला अहंकार असो, त्याला बरोबर शोधून काढून, त्याला निःशेषतया नाहींसा केलाच पाहिजे. या मार्गावरून जाण्याच्या बाबतींत निश्चितता तेव्हांच येईल, जेव्हां साधक ही अहंकारनिरसनाची पहिलीच परंतु अतिशय महत्त्वाची अशी पायरी प्रथम चढून जाईल. स्वतःच्या मर्यादा पूर्णपणें

ओळखणें, स्वतःमधील अपूर्णतांची जाणीव असणें आणि आविर्भूत होऊं पहात असलेल्या दिव्य-शक्तीच्या विशालतेसमोर साधकाला शोभेशी अशी नम्रता अंगीं असणें या गोष्टी, अहंकाराचा म्हणजेच अध्यात्मसाधनेमधील अजिंक्य शत्रूचा निःपात करण्याच्या कामीं मोठ्या साहाय्यकारी ठरणाऱ्या आहेत.

एक साधक या नात्यानें प्रत्येकाच्या अंगीं वरील गोष्टी असणें आवश्यक आहे. साधकाच्या सर्व प्रयत्नांचा आधार व दिशा हीच असली पाहिजे. कारण सुरुवातीस किंवा सर्वच कृतींची प्रेरणा मार्गदर्शक दिव्यशक्तीकडून येऊं लागेतों व्यक्तिगत प्रयत्न जरूर लागतातच. अर्थात् त्यानंतर सुद्धां त्या शक्तीच्या प्रेरणांचा स्वीकार करून, त्या शक्तीला स्वतःमध्यें कार्य करूं देण्याच्या दृष्टीनें आवश्यक त्या व्यक्तिगत प्रयत्नांची जरुरी असतेच.

व्यक्तिगत प्रयत्नांविषयीची ही केवळ एक बाजू आहे. कारण पुरुष-प्रयत्नास कोणतेंहि स्थान वेदान्ती अथवा बौद्ध सांप्रदायांत दिलेलें असलें, तरी विशेषतः या योगामध्यें ज्या शक्तीला साधक समर्पण करतो, त्या शक्तीवरच मुख्यतः सर्व भार टाकलेला असतो. त्या कृपाशक्तीनें प्रथम त्या समर्पपणाचा स्वीकार करावयाचा असतो; नंतर व्यक्तिगत प्रयत्नांची सर्वप्रकारें साथ आवश्यक असते. साधकानें त्या भगवत्कृपेला आळवून तिच्यावर सर्व भिस्त ठेवून आपल्यामागें तिचें पाठबळ उभें केलें पाहिजे. कारण शेवटीं व्यक्तीच्या प्रयत्नानें नव्हे, तर उन्नयनशील व परिवर्तनकारी दिव्य कृपाशक्तीच्या दिव्य स्पर्शानें व प्रत्यक्ष साहाय्यानेंच केवळ, साधकाच्या सामान्य प्रकृतीचें उच्चतर दिव्य प्रकृतीमध्यें रुपांतर होत असतें व साधक नाना प्रकारच्या अडचणींतून व संकटांतून पार पडतो. अशी कृपाशक्ति सद्‌गुरु श्रीअरविंद व करुणामयी श्रीमाताजी या दोघांच्या रूपानें येथें प्रत्यक्ष प्रकट झालेली असून, इंद्र ज्याप्रमाणें स्वर्गांतून जलधारांचा वर्षाव पृथ्वीवर करतो, त्याप्रमाणें त्यांच्या कृपेचा वर्षाव अखंडपणें चाललेला आहे.

फार पूर्वीपासून हा एक वादाचा विषय बनून राहिलेला आहे, कीं सिद्धी जी मिळते ती व्यक्तिगत प्रयत्नांनीं, तपस्येनें मिळते, कीं भगवत्कृपेनें मिळते? श्रीअरविंदांनी दाखविलेल्या या मार्गांत वादाला स्थानच नाहीं. कारण या दोहोंचीहि जरुरी त्यांनी मान्य केलेली आहे. एका सत्याच्या त्या दोन बाजू आहेत. भगवत्कृपा तर खरीच, पण त्या कृपेचा स्वीकार करण्यासाठीं तरी साधकाची तयारी पाहिजेच ना? साधकाच्या ठिकाणीं पुरेशी शुद्धि, नमनीयता, पुरेशी शक्ति व इतरहि अनेक प्रकारची पूर्वतयारी असली पाहिजेच. ही तयारी असेल तरच तो भगवंताच्या कृपेचें ग्रहण करूं शकेल, तिला स्वतःमध्यें राखूं शकेल आणि तिच्या कार्यास साहाय्यभूत होऊं शकेल. नाहींतर भगवत्कृपा येईल आणि आली तशी जाईल आणि पुन्हां भविष्याकडे नजर लावून बसणें साधकाला भाग पडेल. श्रीमाताजी म्हणतात, "सर्वांगीण परिवर्तनासाठीं भगवत्कृपा आणि अभीप्सा या दोहोंचें सारखेंच महत्त्व आहे. भगवत्कृपाशक्ति साहाय्यासाठीं प्रथम येईल; पण तिला ग्रहण करण्यासाठीं साधकाच्या ठिकाणीं अभीप्सा नसेल, तर कांहींच प्रगति होणें शक्य नाहीं."

—मा. पुं. पंडित.

# मॅझिनी आणि काव्हूर

('कर्मयोगिन्-१९०९ मधून)

इटालीच्या राज्यक्रांतीमध्यें ज्या ज्या व्यक्ती प्रामुख्यानें तळपल्या, त्यांपैकीं मॅझिनी व काव्हूर या दोन व्यक्तींचें स्थान विशेष आहे. इटालीच्या पुनरुत्थापनासाठीं या दोघांची नितांत आवशकता होती. अर्थात् या दोघांत मॅझिनी निःसंशय श्रेष्ठ आहे. काव्हूर हा एक मुत्सद्दी राजकारणी व संघटनाचतुर पुढारी होता, तर मॅझिनी हा एक अग्रदूत होता, एक राष्ट्रनिर्माता होता. देशोदेशींच्या प्रजेला वेळोवेळीं चेतना देणाऱ्या ज्या कांहीं महान् आणि सनातन पुराण कल्पना असतात, त्यांत मॅझिनी सदोदित दंग असे, तर काव्हूरचे सर्व लक्ष इटालीच्या तत्कालीन परिस्थितीवर व त्यावेळच्या निकडीच्या गरजा भागविण्यावर केन्द्रित झालेलें होतें. एक प्रखर प्रज्ञावंत होता, तर दुसरा एक महान् आत्मा होता. काव्हूर इटालीचा तर मॅझिनी हा अखिल मानवजातीचा आहे! काव्हूर हा तत्कालीन पुरुष होता, तर मॅझिनी हा एक सनातन पुरुष आहे. परंतु काव्हूर नसता तर मॅझिनीच्या कार्याला यश आलें नसतें. त्याचप्रमाणें मॅझिनीशिवाय काव्हूरचाहि कार्यभाग झाला नसता. मॅझिनीनें अखिल मानवजातीच्या सारभूत तत्त्वाचा आढावा घेतला. भूतिचा तकाळ व भावी प्रेरणा यांचें इटालियन स्वरूप पाहून, त्यानें मृत आत्म्यांना जीवदान दिलें. त्याच्या श्वासोच्छ्वासानें प्राणहीन सांगाडे सजीव देहधारी बनले. कांटेरी विषारी झुडुपांच्या माळरानाचें नंदनवनांत रूपांतर झालें. मॅझिनीला दिसलेला इटाली हा एक भ्रष्ट, सत्वहीन, दुराचारी, कपटी, स्वार्थी, कलही व एकतेला असमर्थ असा देश होता. त्यानें एक दुर्दम्य आशावाद दिला. एक उच्च आध्यात्मिकता दिली व अशी एक बौद्धिक चेतना दिली, कीं जिनें फालतु तपशिलाला झुगारून देऊन, वस्तूच्या ऐन गाभ्यालाच स्पर्श करण्याची किमया इटालीला प्राप्त करून दिली. लोकांनीं ज्यासाठीं जगावें वा मरावें असें एक ध्येय त्यानें मूर्तिमंत केलें व त्यासाठीं लागणारें सामर्थ्यहि निर्माण केलें. मॅझिनीनें केलेलें कार्य तें हेंच! पण तेंच पुष्कळ आहे. काव्हूरच्या अंगीं जुनी इटालीयन राजनीतिज्ञता, मुत्सद्दीपणा व व्यवहारचातुर्य होतें. मॅझिनीनें प्रतिपादिलेल्या स्वातंत्र्य व एकता या ध्येयानें भारावून गेलेल्या इटालीच्या सेवेंत त्यानें तें अर्पण केलें. परंतु दुर्दैवानें इटालीचे हे दोन भक्त व मुक्तीदाते एकमेकांना कधींच समजूं शकले नाहींत. काव्हूर हा एक लबाड व चाणक्यनीतिवादी आहे असें समजून मॅझिनी नेहमीं त्याचा तिरस्कार करी, तर काव्हूर हा मॅझिनीला एक दुराग्रही व भयंकर आगलाव्या मानी. या दोघांमध्यें जन्मभर राहिलेल्या या गेरसमजाचीं वरवर दिसणारीं कारणें दाखविणें सोपें आहे. एका साम्राज्यवादी व प्रखर राजनीतिज्ञ माणसांत आणि एका स्वप्नद्रष्ट्या व लोकशाहीवादी माणसांत एकमेकांबद्दल गैरसमज असणें व त्यांनीं एकमेकांचा तिरस्कार करणें अगदीं स्वाभाविक आहे असेंच कोणालाहि वाटेल. परंतु याचें खरें कारण फार वेगळें व खोल आहे.

*　　*　　*

ज्या एका गोष्टीचा मॅझिनीला तिटकारा वाटत असे व ज्या गोष्टीपासून त्यानें इटाली-च्या तरुणांचीं मनें व कल्पनाशक्ति यांची मुक्तता करण्याची सारखी धडपड केली, ती गोष्ट म्हणजे ज्याला आपण चाणक्यनीति म्हणतो ती होय. चाणक्यनीतिज्ञ माणसाचा स्वभावधर्म असा असतो कीं, तो एक कल्पनाहीन असा पक्का बुद्धिवादी माणूस असतो. याचा अर्थ असा नाहीं कीं उदात्त ध्येयें, भावना यांचें त्याला वावडें असतें. . . . .या गोष्टींचें त्याला बौद्धिक आकर्षण तर असतेंच पण तेंच त्याचें ध्येय नसतें. या विषयाकडे पाहण्याची त्याची दृष्टि आत्यंतिक व्यवहारी असते. शिवाय आपला स्वार्थ साधण्यासाठीं या सर्व वस्तूंना राबवून घेतांना तो वाटेल ती लबाडी करण्यास अगदीं बिनदिक्कत तयार असतो.

मॅझिनीच्या आगमनापूर्वी इटालीयन देशभक्तीचें हें असेंच चाणक्यवादी स्वरूप होतें. इटलीच्या पुनरुज्जीवनाचा सर्वप्रथम आविष्कार अशी जी कारबोनरी चळवळ ती सुद्धां याच चाणक्यनीतीनें व्याप्त होती. या क्षुद्र व फलहीन अशा कूपमंडूकवृत्तींतून मॅझिनीनें आपल्या देशाला वर उचललें व त्याला अशा एका आंतरिक शक्तीचा साक्षात्कार घडविला कीं, जी एकमात्र शक्ति राष्ट्राचा पुनरुद्धार करण्यास समर्थ असते. या शक्तीमुळेंच तत्कालीन लाभ व अनुकूल परिस्थितीचा अव्हेर करण्याचें सामर्थ्य येतें. उदात्त ध्येयासाठीं वेड लावणारी प्रबळ भावना निर्माण होते. अविचल श्रद्धा ठेवून उद्दिष्टप्राप्तीसाठीं वाटेल तें कष्ट सहन करण्याची, शक्याशक्यतेच्या उठाठेवीची उपेक्षा करण्याची व सर्वस्वाला लाथ मारण्याची शक्ति प्राप्त होते. ही आंतरिक शक्ति, आध्यात्मिक शक्ति, नुसता उज्ज्वल भविष्यकाळ निर्माण करत नाहीं, तर त्यासाठीं लागणारीं सर्व साधनेंहि निर्माण करते. प्रसंगीं हातीं असणाऱ्या साधनांवर अथवा त्यांच्या योग्यतेवरहि ती अवलंबून नसते. निरुपयोगी व दुरू-पयोगी वस्तूंना सदुपयोगी बनविण्याची व उणीवेंतून विपुलता निर्माण करण्याची किमया ही या शक्तींत असते.

या महान् सत्याच्या तीव्र जाणिवेनें मझिनीला आधुनिक इटाली निर्माण करण्याची शक्ति दिली. त्याची दृष्टि सर्वदा देशाचें मन आणि अंतःकरण यांवर केन्द्रित झालेली असे. देशांतील अंतर्गत अथवा बाह्य परिस्थितीवर त्यानें कधींहि भर दिला नाहीं मॅझिनी हा कांहीं एक राजकारणी पुरुष नव्हता. परंतु एकाद्या राजकारणी पुरुषापेक्षांहि त्याला अधिक सूक्ष्मदृष्टि होती. त्यानें केलेल्या लहान लहान पण उग्र लढाया, विग्रह, सामान्य दृष्टीला अगदींच वेडपट दिसतात. एकाद्या व्यवहारी माणसाला तर त्याचे हे सर्व प्रयत्न म्हणजे त्याच्यांतील मुत्सद्दीपणाच्या अभावाचींच लक्षणें वाटतील. वेळोवेळीं खून व मारामाऱ्या करून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचीं स्वप्नें रंगविणें हें एकाद्या वेडपटाशिवाय कोणाच्या डोक्यांत येऊं शकेल ? परंतु मॅझिनीच्या या वरवर वेडसर दिसणाऱ्या कृत्यांमध्यें एक मूलभूत फरक आहे. आपण काय करीत आहों याची त्याला पूर्णपणें जाणीव होती. त्याची दृष्टि इटालीच्या हृदयावर होती आणि रोगग्रस्त झालेल्या इटालीला फक्त रोगमुक्त करणें एवढेंच नव्हे, तर कायमची निरोगी व बलवान् करणें व त्यासाठीं आवश्यक ती परिस्थिति निर्माण करणें हें त्याचें कर्तव्य होतें. मॅझिनीला एका गोष्टीची पूर्ण जाणीव होती कीं, अंतिम यश मिळविण्यासाठीं एका संघशक्तीचा प्रादुर्भाव होण्याची अत्यंत आवश्यकता आहे. शिवाय ही संघशक्ति यशस्वी होण्यासाठीं तिच्या पाठीमागें

जनतेची भरभक्कम आध्यात्मिक व नैतिक शक्ति असणें, दुर्दम्य अभीप्सा असणें आवश्यक आहे हेंहि तो जाणून होता. ही आध्यात्मिक व नैतिक शक्ति निर्माण करणें हेंच त्याचें कार्य. 'यंग इटली' या वृत्तपत्राद्वारें महान् व उत्थानकारी विचारधारा प्रसरित करून त्यानें ही आध्यात्मिक शक्ति निर्माण केली. परंतु उच्च विचार किंवा प्रभावी कल्पना यांच्यामुळें कांहीं नैतिक शक्ति उत्पन्न होत नाहीं. कर्मयज्ञाच्या अग्नींत तावूनसुलाखूनच नैतिक शक्तीचा जन्म होत असतो. इटलीच्या निश्चेष्ट हृदयामध्यें व सुस्त अवयवांमध्यें कर्म करण्याची संवय व शक्ति पुन्हां यावी; सामर्थ्य, हिंमत व पुढाकार घेण्याची शक्ति यावी यासाठीं त्याची सारखी खटपट चालू असे. शिवाय आत्मत्याग, आत्मबलिदान करण्याची वृत्ति, कठोर अडचणीकडे दुर्लक्ष करण्याची हिंमत राखणें, अशक्यप्राय वाटणाऱ्या गोष्टींची तमा न बाळगणें व पराभवाची क्षीति न वाटणें वगैरे विस्मृत झालेल्या रोमन स्वभावगुणांना सजीव करण्यावर मॅझिनीचें विशेष लक्ष असें: त्याचा हा उद्देश सफल होण्यासाठीं त्यानें वारंवार केलेल्या असफल लढाया त्याला इतर सहज व सोप्या कार्यापेक्षां जास्त उपयोगी होत्या. लोकांची गोष्ट तर जाऊं द्या पण कधीं कधीं त्याला स्वत:ला वाटे कीं, आपण निष्कारणच ह्या लहान लहान लढाया करून आपल्या तरूण व उमद्या सहकार्यांचे प्राण गमावीत आहोंत. परंतु त्याच्या हृदयांतील श्रद्धा, ज्ञान मॅझिनीला त्याच्या प्रत्येक प्रयत्नाची सार्थकता दाखवीत व त्याच्या निराश झालेल्या अंत:करणाला दिलासा देत. मॅझिनीजवळ हें अतिमानवी सामर्थ्य होतें म्हणूनच तो इटालीचा उद्धार करूं शकला. इटालीला लवकरच युरोपमधील एक महान् राष्ट्र बनविण्याची जर ईश्वराची इच्छा असती तर इटालीला स्वतंत्र करण्याचें श्रेय त्याला मिळालें असतें. अर्थात् त्याचा मार्ग काव्हूरहून भिन्न असता. त्याच्या हस्तें स्वातंत्र्य मिळविण्यास इटालीला बरास वेळ लागला असता. अनेक भीषण रक्तपात व मनुष्यहानी सहन करावी लागली असती. परंतु फ्रान्सला सावाय व नीरन या दोन गांवांची खंडणी देऊन इटालीचें स्वातंत्र विकत घेणें मॅझिनीला कधींच रुचलें नसतें. त्यानें स्वतंत्र केलेला इटाली अशा एका दिव्य आध्यात्मिक व नैतिक शक्तीनें युक्त झाला असता, कीं शतकानुशतकें त्याचें वैभव टिकलें असतें व इटालीला युरोपमधील आध्यात्मिक, बौद्धिक व राजनीतिक बाबतींत अग्रेसर करण्याचें त्याचें स्वप्न साकार झालें असतें.

*　　　*　　　*

हें कार्य काव्हूरवर सोंपविण्यांत आलें कारण कीं, तो मॅझिनीपेक्षां सामान्य दर्जाचा माणूस होता. मॅझिनीच्या दृष्टीनें काव्हूर हा, त्याचें सर्वनैतिक कार्य विफल करणारा एक आधुनिक चाणाक्य होता. मॅझिनीचें काव्हूरविषयीचें हें मत जरी चूक असलें तरी तें सर्वथा विपरीत नव्हतें. कारण कीं, काव्हूरचा स्वभाव व कार्यपद्धति ही निश्चित चाणाक्याच्या धर्तीची होती. इटालीयन प्रकृतींतील या गुणाची त्यानें जोपासना करून त्याचा यशस्वी आविष्कार केला. कारबोनरी चळवळचांप्रमाणें तो लष्करी परिस्थितीचें अचूक निदान करी. प्रत्यक्ष व्यवहारी गोष्टींना बरेंच महत्त्व देई. त्यानें असाध्य नव्हे, तरी बऱ्याच महान् गोष्टी साध्य केल्या व तसें करतांना निर्वाणीची जरी नव्हे तरी बेडर अशीं पावलें त्यानें टाकलीं. मुत्सद्देगिरीचा अवलंब केला व जरूर तेथें बरेच छक्के पंजे केले,

जें कारबोनरींना कधींच जमलें नसतें. शिवाय प्रसंगीं स्वार्थत्याग करण्यासहि तो कचरत नसे. कारबोनरींना जें करतां आलें नाहीं तें करण्यांत, म्हणजे इटालीला स्वातंत्र्य मिळविण्यांत काव्हूरला यश आलें याचें कारण, इटालीचें स्वातंत्र्य व तिची एकता ही भावना काव्हूरनें सतत उराशी बाळगली ती फक्त देशहिताकरितां म्हणून नव्हे, तर एक उदात्त ध्येय म्हणून. त्याच्या यशाचें हेंच एक गमक आहे. माणसाचें त्याच्या बायकामुलांवर जें प्रेम असतें त्यापेक्षांहि तीव्रतर अशी एक अभीप्सा त्यानें जागृत केली व 'स्वतंत्र देशांत धार्मिक स्वातंत्र्य' या आपल्या उदारमतवादी भावनोद्दीपक विचारानें त्यानें आपल्यांतील व शुद्ध चाणक्यवृत्तीच्या कारबोनरीमधील अंतर प्रत्यक्ष दाखवून दिलें. त्याच्या या वृत्तीमुळें त्याला महान् प्रयत्न करणें सहज शक्य झालें व आपलें सर्वस्व पणाला लावण्याची शक्तीहि त्याला मिळाली. अशारीतीनें काव्हूरलाहि मॅझिनीच्या शुभवर्तमानाची कांहीं अंशीं प्रेरणा झाली होती. शिवाय मॅझिनीनें निर्माण केलेल्या शक्तीचाहि काव्हूरनें चांगलाच फायदा घेतला. या शक्तीशिवाय काव्हूरला कांहींच करणें जमलें नसतें. इटालीचा तारणहार काव्हूर नव्हे, तर नवोदित इटालीची शक्ति काव्हूरद्वारां कार्य करीत होती.

इतिहास पुष्कळदां आपली दिशाभूल करतो. इटालीयन क्रांतीचा उत्तरार्ध सर्वस्वीं काव्हूरच्या नेतृत्वाखालीं होता अशी इतिहासानें नोंद केली आहे. परंतु आतां सर्वांना ठाऊक आहे कीं, पुष्कळदां अगदीं महत्त्वाच्या बाबतींतहि काव्हूरच्या बाबतींत पूर्वनियोजित योजनेपेक्षां दुसऱ्याच गोष्टी घडत. कारण कीं, नियतीची इच्छाच तशी असे. परंतु काव्हूर हुशार होता. एखाद्या मुरलेल्या राजकारणपटूप्रमाणें त्याला या गोष्टीची जाणीव होती कीं नियतीची गति अनाकलनीय आहे. प्रसंगीं, आपल्या योजना गुंडाळून ठेवून अनपेक्षितपणें आलेल्या प्रसंगांतून तो अधिकतर फायदा करून घेत असे. परिस्थिति पाहून पावलें टाकण्याची कला त्याला चांगलीच अवगत होती. ध्येयवादी व जिद्दखोर मॅझिनीला ही गोष्ट कधींच जमली नाहीं. दुर्दैवानें काव्हूरच्या यशामुळें इटालियन चारित्र्यांतील व राजकारणांतील देशाच्या दीर्घ गुलामगिरीमुळें उद्भवणारे कांहीं दुर्गुण तसेच राहिले, जे इटालीच्या आजच्या विपरित परिस्थितीला वेगावरोधाला व बद्धमूल विकाराला आणि तिला श्रेष्ठतेपासून दूर ठेवण्याला जबाबदार आहेत. मॅझिनीनें असें होऊं दिलें नसतें. त्याच्या श्रेष्ठतर दीर्घ दृष्टीनें आपल्या देशाचें अचूक रोगनिदान त्यानें केलें असतें व देशाला कायमचा रोगमुक्त करण्यासाठीं त्यानें आपल्या हातांतली सुरी अगदीं निर्दयपणें खूप आंत खुपसली असती. अर्थात् त्यामुळें इटालीला बराच काळ तीव्र वेदना सहन कराव्या लागल्या असत्या; पण कायमची रोगमुक्तता मात्र निश्चित झाली असती.

*   *   *

भारतांतील परिस्थिति निराळी आहे. इटालियन साधनांचा येथें मुळींच उपयोग होणार नाहीं. परंतु कुठल्याहि देशाचा उदय, महत्ता, अधोगति आणि पुनरुद्धार यांच्या पाठीमागें एकच सर्वसाधारण मनोवैज्ञानिक तत्त्व उभें असतें. भारताच्या स्वातंत्र्याची आमची कल्पना इटालीच्या स्वातंत्र्याहून भिन्न आहे. आमचे स्वातंत्र्यप्राप्तीचे मार्ग तर निश्चितच भिन्न आहेत. पण त्या सर्वांच्या मागील तत्त्व मात्र एकच आहे. १९ व्या शतकांतील

भारतीयांची देशभक्ति क्षुद्र, अत्याचारी व दुर्बल होती. आपापसांतील हेवेदावे लपवालपवी, सच्चाईचा अभाव व आपमतलबीपणा यांतच ते लोक गर्क असत. उदात्त ध्येयांचा त्यांच्याजवळ अभाव होता. मात्र उदात्त ध्येयाचीं दुरून दिसणारीं लोभनीय चित्रें व त्यांचा बौद्धिक हव्यास त्यांना असे. त्यांच्या देशभक्तींत स्फूर्ति, सत्य किंवा मुत्सद्दीपणा नव्हता. आज आमच्या देशांतील राष्ट्रीय चळवळीनें अंशतः मॅझिनीचें काम बजावलें आहे. या भावनेनें भारतांत एक अध्यात्मिक शक्ति निर्माण झाली आहे. देशाच्या नव्या पिढीला महान् ध्येयें, विशाल आकांक्षा व स्फूर्ति आणि दुर्दम्य उत्साह व नितांत श्रद्धा यांचें वरदान मिळालें आहे. मॅझिनीप्रमाणें राष्ट्रीयत्वाच्या या भावनेमुळें देशांतील नैतिकता उंचावली आहे. देशावर प्रेम करणें, देशासाठीं आत्मबलिदान करणें, पराभवांतहि अढळ राहणें, अथक व निर्भय चिकाटी, वैयक्तिक व सांघिक कार्याची संवय, आत्मनिर्भरता आणि अद्‌भुत साहस या आमच्यांतील सर्व गोष्टींमागें हीच एक राष्ट्रीयत्वाची भावना उभी आहे. पूर्वीच्या उद्रेकी हिंसकवृत्तीची जागा आज स्वावलंबन व सहनशील प्रतिकारानें घेतलेली आहे.

परंतु अद्याप हें कार्य पूर्ण झालेलें नाहीं. तें पूर्ण झाल्यानंतर देशांत अशा एका शक्तीचा संचार होईल कीं, कालच्या सत्ताधीशांनाहि मान्य करावें लागेल कीं हीच शक्ति भारताच्या भवितव्याची प्रतिनिधि आहे व तिच्या हातीं सर्व सत्ता देऊनच त्यांना हळू हळू येथून पाय काढावा लागेल. आम्हांला असा विश्वास आहे कीं, एकदां सुरु झालेलें हें कार्य असेंच चालू राहील. देशांतील ही राष्ट्रीयत्वाची भावना फक्त राजकारणापुरती मर्यादित रहाणार नाहीं, तर आमच्यांतील खोल रुतलेल्या सर्व रोगांचा पूर्ण नायनाट करेल व देशांतील अमोघ नैतिक व आध्यात्मिक शक्तीचें आवाहन करून, मॅझिनीलाहि जें इटालीकरितां करतां आलें नाहीं, त्याचा येथें साक्षात्कार घडवील. म्हणजेच भारत हें भावी नूतन जगांतील--ज्याच्या प्रसूतिवेदना जगाला नुकत्याच होऊं लागल्या आहेत--एक प्रभावी मार्गदर्शक व अग्रेसर राष्ट्र होईल.

--श्रीअरविंद

जेव्हां अडचणी तुम्हांस घेरतील तेव्हां निश्चित समजा, भगवत्कृपा तुमची साथी आहे.

--श्रीमाताजी.

★

दुसरे कां अयशस्वी झाले व त्यांच्यांत तसें काय होतें हें तुम्हांला ज्ञात नाहीं. तुमच्या स्वतःमध्यें काय आहे हें मात्र तुम्हांला ज्ञात आहे आणि म्हणून तें ओलांडण्यासाठीं तुम्हांमध्यें खरीखुरी, प्रामाणिक इच्छा पाहिजे. तसें तुम्हीं केलें तर, अंतिम साध्य होईपर्यंत तुम्ही प्रगत होत रहाल.

१५-७-३५ --श्रीअरविन्द

# प्रश्नावली

(आर्य १९१४ : १५ मधून)

**योगामध्यें ध्यान म्हणजे नेमकें काय? ध्यानाचें खरें उद्दिष्ट कोणतें?**

या बाबतींत निरनिराळ्या अधिकारी व्यक्तींनीं ध्यानाचा अर्थ आपापल्या परीनें वेगवेगळा लावला असल्यामुळें, वाचकांच्या मनांत याविषयीं शंका निर्माण होणें हें अगदीं साहजिकच आहे. कांहींच्या दृष्टीनें एकाच विषयावर मन पूर्णपणें एकत्रित करून, तत्संबंधीं एकापाठी-मागून एक अशी विचारमालिका गुंफणें म्हणजेच ध्यान होय. दुसऱ्या कांहींच्या दृष्टीनें एकाद्या प्रतिमेवर, वस्तूवर, अथवा शब्दावर मन अनन्यरीतीनें केन्द्रित करणें म्हणजे ध्यान होय. यांपैकीं आपण कोणता अर्थ घ्यावयाचा ही गोष्ट तुम्ही योगाकडे कोणत्या दृष्टीनें पाहतां यावर अवलंबून आहे. अर्थात् ध्यानाच्या याहून आणखीहि कांहीं दुसऱ्या पद्धती आहेत.

तसें पाहिलें तर, आपल्या आंतरिक अस्तित्वाची जाणीवपूर्वक संघटना करण्याचें मन हें एक साधन आहे. पण बऱ्याच लोकांच्या बाबतींत मनांतील विचार हे एकाद्या प्रवाहपतिता-प्रमाणें असतात. विचारांबरोबर कल्पना, संवेदना, संस्कार यांचाहि मिलाफ झालेला असतोच. पण हा मिलाफ पद्धतशीर नसून, तत्कालिक हेतु वा उपयुक्तता यांच्या अनुरोधानें झालेलें तें एक प्रकारचें संकलन असतें. अर्थात् प्रकृतीच्या सर्वसामान्य कार्यपद्धतीमध्यें बऱ्याच गोष्टींचा टाकाऊ मालाप्रमाणें उपयोग केला जातो व अगदीं थोडयाच गोष्टींना मूर्त व टिकाऊ स्वरूप येत असतें. भौतिक निसर्गाप्रमाणें येथेंहि सर्व विचारप्रक्रिया ही नियमबद्ध असते परंतु या विचारांचा उपयोग करण्याऐवजी किंवा त्यांच्यावर आपण नियंत्रण मिळवण्या-ऐवजीं त्यांनीं आपण त्रस्तच होऊन जातो.

ज्याप्रमाणें हठयोग हा श्वासोच्छ्वासाचें नियमन करून व निरनिराळीं आसनें करून शरीराच्या व प्राणाच्या व्यापारांचें नियंत्रण करतो, तद्वत् राजयोग हा मनाच्या व्यापारांवर नियंत्रण मिळवून त्याला आपणाला हवें तसें वळण देतां यावें यासाठीं विचारांची एकाग्रता हें साधन वापरतो.

विचारांच्या अवखळ हालचालींना काबूंत आणण्यासाठीं ध्यानाचा उपयोग होतो. एकादा खेळाडू अथवा मल्ल ज्याप्रमाणें आपल्या शक्तींचा अपव्यय होऊं न देतां एकाद्या विशिष्ट ध्येयावर त्या केन्द्रित करतो, त्याप्रमाणें ध्यानामध्यें आपण एकाद्या विशिष्ट ज्ञानप्राप्तीसाठीं अथवा आपल्या स्वतःला शिस्त लागावी म्हणून मनाच्या सर्व शक्तींचा काटकसरीनें पण जास्तींत जास्त उपयोग करण्यास शिकत असतो. तसें पाहिलें तर अगदीं व्यवहारांत सुद्धां आपण याचेंच अवलंबन करीत असतो. पण योगामध्यें निसर्गाच्या कृतींना आपण उच्च पातळीवर आणून, मनाच्या संपूर्ण शक्तींचा, सर्व संभाव्यतांचा आविष्कार करीत असतो. योग आणखी एका गोष्टीची दखल घेतो व ती म्हणजे जर आपण आपलें मन एकाद्या विषयावर ज्वलंत रीतीनें एकाग्र केलें, तर आपण त्यायोगें विश्वजाणीवेकडून त्यास प्रतिसाद

मिळवूं शकतो. या प्रतिसादानें एक गोष्ट साधली जाते ती म्हणजे मनांत ज्ञानाचे अवतरण होतें. त्या वस्तूचें तर ज्ञान होतेंच पण शिवाय त्याच्या अंतिम सत्याचा साक्षात्कार होतो; आणि अंतिमतः मन समाधान पावतें. त्यामुळें आपल्याला महान् शक्तींचेंहि प्रत्युत्तर मिळत जातें. ज्या गोष्टीवर आपण ध्यान लावतो, तिच्या सर्व कार्यावर व क्रियांवर आपण प्रभुत्व मिळविल्यामुळें ती गोष्ट आपल्यामध्यें निर्माण करणें किंवा क्रियाशील करणें शक्य होतें. उदाहरणार्थ आपण जर दिव्य प्रेम हा ध्यानाचा विषय घेतला, तर आपल्याला त्या दिव्य तत्त्वाचें, त्याच्या कार्याचें ज्ञान तर होतेंच पण शिवाय त्याबरोबर आपण त्याशीं एकरूप होऊन, तें आपल्यांत निर्माण करतां येतें व अखेर हृदय व इंद्रियें यांच्यावर त्या दिव्य प्रेमाची सत्ता प्रस्थापित करतां येते.

योगामध्यें एकाग्रतेलाहि एक विशिष्ट स्थान आहे. आपली जागृतावस्था ही आपल्या जाणिवेची अत्यंत मर्यादित आणि वरवरची अवस्था आहे. तिच्यामधून निघून समाधीच्या निरनिराळ्या अवस्थेंत जाण्यासाठीं एकाग्रतेचा उपयोग होतो. या अवस्थेंत एकाद्या विचार-मालिकेवर मन स्थिर करण्यापेक्षां एकाच वस्तूवर वा कल्पनेवर वा नांवावर मनाची एकाग्रता केल्यानें अधिक दृश्य फल मिळतें. पहिल्या प्रक्रियेमुळें सुद्धां अस्तित्वाच्या खोल अवस्थेंत जाणीव कायम ठेवून, संपूर्ण समाधीपर्यन्त अप्रत्यक्ष रीतीनें जातां येतें. या प्रकारांत एक फायदा आहे तो म्हणजे साकार होत असलेल्या विचारांचें ज्ञानपूर्ण कार्य पुरुषाच्या प्रभुत्वाखालीं आणलें जातें. त्यामुळें जाणिवेचा उरलेला भागहि उत्तरोत्तर उच्च व व्यापक कल्पनांनीं भरला जातो; त्यावर उच्च विचारांचें आधिपत्य येतें. त्यामुळें जाणीव अत्यंत जलद गतीनें बदलली जाऊन परिपूर्ण होऊं लागते. याहिपेक्षां दुसरे अनेक व महत्त्वाचे फायदे आहेत पण तें आत्मोन्नतीच्या पुढच्या प्रगतीवर अवलंबून राहतें.

भक्तियोगांत ध्यान व एकाग्रता या दोन्ही प्रकारांचा सारखाच उपयोग केला जातो. त्यांच्या साहाय्यानें अखिल अस्तित्व एकाग्र केलें जातें. आराध्य देवताविषयींचे विचार, तिचें रूप, तिचें सत्व, तिचे गुण, तसेंच तिच्या अर्चनेंतील व तिच्या एकरूपतेमधील आनंद यांनीं मनुष्याचें अखिल जीवन परिप्लुत केलें जातें. विचार हा मग भक्तीचा, प्रेमाचा दास बनतो; भावावस्थेचा दूत बनतो. ज्ञानयोगामध्येंहि सत्य व असत्य यांमध्यें विवेक करतां यावा म्हणून ध्यानाचा अवलंब करतात व वैयक्तिक जाणिवेचा ब्रह्मांत प्रवेश होऊन त्यांचा अखेर दिव्य संगम होण्यासाठीं एकाग्रतेचा उपयोग होतो.

पूर्णयोगांत या सर्व गोष्टींचा सुंदर समन्वय साधला गेला आहे. त्यांत विचार व मन यांजवर अधिकार प्राप्त करून घेण्यासाठीं दुसऱ्या मार्गांचाहि अवलंब केला जातो.

* * *

युरोपमधील एक जिज्ञासू लिहितात: "विश्वात्मभावांत राहणारी अथवा राहण्याच्या प्रयत्नांत असलेलीं कित्येक मंडळी माझ्या आयुष्यांत मीं पाहिलीं आहेत. पण माझ्या असें अवलोकनांत आलेलें आहे कीं, त्या भावनेमुळें परदुःखाविषयीं उत्तरोत्तर कमी दयाशील, मानवा-विषयीं कमी आत्मीयता बाळगणारे व परदुःखानें दुःखीन होण्याची सहसंवेदनक्षमता कमी

होत असलेले असे ते बनत चालले होते. जेव्हां स्वतःच्या दुःखाविषयीं प्रश्न असेल, तेव्हां कदाचित् व्यक्तिगत भान नसणें हें अधिक आवश्यक असेल. तें मी समजूं शकतो. पण जेव्हां दुसऱ्याच्या दुःखाबद्दल सक्रिय सहानुभूति दाखविण्याचा प्रसंग असेल, तेव्हां त्यासंबंधीं जागृत नसणें हें अनुचित आहे असें मला वाटतें. विश्वात्मभावनेंत रहाण्यापेक्षां वैयक्तिक चेतनेंत राहूनच, आपल्या मानवबंधूंच्या दुःखाविषयीं आपणास अधिक उत्कटतेनें आत्मीयता व सहानुभूति वाटेल असें माझें मत आहे. कदाचित् मी चुकत असेन. तरी आपण याविषयीं अधिक खुलासा करून माझें समाधान करावें म्हणून माझी ही अडचण मी आपणा-समोर मांडली आहे."

पृच्छकानें उल्लेखिलेलीं माणसें खरोखरीच विश्वात्मभावनेच्या पातळीवर होतीं काय हा प्रश्नच आहे; आणि समजा जर त्यांची विश्वात्मभूमिका खरी असेल, तर मग पुन्हां प्रश्न येतो कीं पृच्छक म्हणतात त्याप्रमाणें तीं खरोखरींच मानवी दुःखाविषयीं बेफिकीर व सहानुभूतिशून्य होतीं काय? किंवा सहानुभूति आणि अनुकंपा सामान्यतः ज्या स्वरूपांत व्यक्त होते, त्यापेक्षां त्यांच्या बाबतींत जरा वेगळ्या रूपांत ती कार्यकारी होत नसेल कशा-वरून?

एकादा मनुष्य या जगांत जर खरोखरीच दुसऱ्यांच्या अनुभवांविषयीं, दुःखांविषयी संवेदना-क्षम नसेल, तर वास्तविक तो पूर्णांशानें विश्वात्मभावनेंत रहात नाहीं असेंच म्हणावें लागेल. स्वात्मतुष्टी व आत्मशांति यांच्याच अनुभवांत त्यानें एकतर स्वतःस कोंडून घेतलें असेल, किंवा एकाद्या विश्वव्यापी निर्गुण निराकार तत्त्वाशीं युक्त होऊनच, विश्वांतील त्याच्या कार्यरूप स्वरूपाकडे दुर्लक्ष करून तो त्यामध्येंच लीन होऊन राहिला असेल किंवा या जगताच्या अस्तित्वापलीकडील कोणत्यातरी अस्तित्वाशीं युक्त राहून, स्वतःस या विश्वापासून विभक्त व दूर ठेवून, आंतरिक जीवन अनुभवीत असेल. आत्म्याच्या पूर्णत्वाच्या मार्गावर उत्तरोत्तर प्रगत होत असतांना या सर्वच अवस्था उपयुक्त असल्या, तरी खऱ्या अर्थानें त्या विश्वात्मभावनेच्या दर्शक अवस्था नव्हेत हें निश्चित.

जेव्हां एकादा साधक विश्वात्मभावांत असतो, तेव्हां या जगाचें अखिल जीवनच त्याच्या अंतरंगीं सामावलेलें असतें; असावें लागतें. व्यक्तिगत अहंकाराच्या मर्यादांतून वर उठण्याचा प्रयत्न करणाऱ्या या जगाविषयीं त्याच्या मनांत सहानुभूति व अनुकंपा असणें व प्रेम असणें व त्यास सहाय्य करण्याची भूमिका असणें अगत्याचें असतें. अनंत निरहंकार-मयतेंत लीन होणें, प्रविष्ट होणें म्हणजे वास्तविक अनंत अनुकंपेंत अवगाहन करणें होय असें बौद्धविचार मानतो. गीतेमध्यें व इतरहि अनेक भारतीय ग्रंथांतून जीवनमुक्त संन्यासी वर्णिलेला आहे, तोहि असाच 'सर्वभूत हिते रतः' असा आहे. अर्थात् या अनुकंपेचा आविष्कार नेहमीं बाह्य दृष्टीला दिसणाऱ्या भावनिक सहानुकंपा व दानधर्मादि कृत्यांच्या स्वरूपांतच झाला पाहिजे असें मात्र नाहीं. सर्वसाधारणपणें भावनात्मक सहानुभूति अथवा दानधर्मालाच आपण दया, कृपा अथवा कनवाळूपणा समजतो. जी गोष्ट आपणाला विशेष आकर्षक, सुंदर व उपकारक वाटते, तिला खरी सहानुभूति असें समजून, सर्वप्रकारच्या प्रकृति-स्वभावांना अथवा दिव्य चेतनेला एकाच पातळीवर आणण्याचा आपला प्रयत्न योग्य नव्हे. ज्याप्रमाणें त्वरित भावनावश होणाऱ्या वृत्तीहून उच्चतर अशी सहानुभूतिदायक

अवस्था आहे, त्याप्रमाणें वैयक्तिक हालअपेष्टांतून सोडवणूक करूं पाहणाऱ्या दयेहून उच्चतर कृपाहि अस्तित्वांत आहे.

भावनोद्रेकाच्या विस्तारामध्यें आपली अहंकारमय चेतना अनेक टप्प्यांतून जात असते. अगदीं प्रथमावस्थेंत ती स्वतःभोवतींच गुरफटलेली असते. त्यामुळें दुसऱ्यांच्या अनुभवांची ती फारशी पर्वा करीत नाहीं, कदर बाळगत नाहीं. त्यानंतरच्या अवस्थेंत ज्या व्यक्ती तिच्याशीं थोडयाफार समरस होतात, त्यांच्या बाबतींत ती व्यक्ति सहानुभूति बाळगते. जे तटस्थ असतात त्यांच्याशीं ती व्यक्ति तटस्थतेनें राहते व जे शत्रुत्व स्वीकारतात त्यांना विरोध करीत असते. पण जेव्हां ती व्यक्ति आपल्या वैयक्तिक कडयाबाहेर जाते, तेव्हां मात्र ती परोपकारी बनूं लागते.

तरीहि कित्येकदा दानधर्म किंवा परोपकार हे गुण अहंकाराच्या पोटींच निर्माण झाले असल्याचें दिसून येतें. दुसऱ्यांचें दुःख पाहवत नाहीं म्हणून किंवा दुसऱ्यांनीं आपल्या परोपकाराची प्रशंसा केल्यावर आपल्याला सुख वाटतें म्हणून किंवा आत्मस्तुति करण्यासाठीं किंवा सहानुभूति दाखविण्याची गरज असते म्हणून आपण दुसऱ्यावर दया करतो. घटकाभर असेंच म्हणाना कीं जर जगांत एकहि गरीबगुरीब व दुःखी राहिला नाहीं, तर कांहीं दयाळू कनवाळू माणसांना अगदीं चुकल्या चुकल्यासारखे होऊन जाईल.

आतां जेव्हां आपण खऱ्याखुऱ्या अर्थानें विश्वचेतनेंत शिरतो, तेव्हां वैयक्तिक हेतु अथवा गरज असो वा नसो केवळ अभिजात आत्मैक्यामुळें आपल्याला दुसऱ्याचें दुःख तें आपलें दुःख, त्याचें सुख तें आपलें सुख असें वाटतें. अर्थात् ही अखेरची परिणत अवस्था म्हणून समाधान मानून स्वस्थ बसणें योग्य नव्हे. कारण या नंतरहि असा एक काळ येतो, कीं जेव्हां हाल पाहवत नाहींत म्हणून नव्हे तर अगदीं सहज त्याची जाणीव होऊन, न कळतच आपला हात आपण मदतीसाठीं पुढें करीत असतो; आणि अखेर याहिनंतर अशी एक अवस्था येते, कीं त्याचें दुःख पाहून आपल्याला दुःख होत नाहीं. कारण आपण सदैव शांतिसागरांत डुंबत असतो. पण म्हणून प्रेम अथवा कनवाळूपणा यांना आपण पारखे होत नाहीं. एकाद्या मातेप्रमाणें आपली स्थिति होते. मुलाला दुःख झालें किंवा तें रडूं लागलें तर माता रडूं लागत नाहीं. तिला रडण्याचें कारण नीट ठाऊक असतें; आणि म्हणूनच ती तें दुःख दूर करूं शकते व त्याचें सांत्वन करूं शकते.

शिवाय दुःखावर तात्पुरती मलमपट्टी लावून व त्याला दोन सहानुभूतियुक्त शब्द सांगून, दुःखाचें मूळ नाहींसें होत नाहीं. मानवीं दुःखें हीं वृक्षाच्या फांद्यांप्रमाणें असतात. फांद्या तोडून टाकल्या, तर त्या दुप्पट जोरानें फोफावतात; आणि म्हणूनच तो दुःखाचा वृक्ष मुळासह उपटून टाकण्याला मदत करणें हीच खरी मदत. तिलाच दिव्य मदत म्हणतां येईल. दया दाखविणें किंवा सहानुभूति दाखविणें यापेक्षां मनुष्यास चिरंतन आनंद, शांति व पूर्णता यांचा ठेवा देणें यासारखी बहुमोल देणगी नाहीं. हें जर आपणाला साधावयाचें असेल, तर विश्वचेतनेंत जाऊन इतरांबरोबर आंतरिक एकता साधतां आली पाहिजे; किंवा त्याचाच हा परिपाक आहे.

—श्रीअरविन्द.

अनुवादकः वसंत के.दोंदे.

# अडचणी आणि प्रगति

**प्रश्न**:––साधनेंत किती कालपर्यंत अडचणी, विघ्नें रहातात ?

**उत्तर**:––तें साधकावर अवलंबून असतें.

**प्रश्न**:––साधकावर अवलंबून असतें म्हणजे कोणत्या अर्थानें ?

त्याचा अर्थ असा कां, कीं साधकांना जितका वेळ एकादी अडचण रहावी असें वाटतें, तितका वेळ ती रहाते ?

**उत्तर**:––होय; किंवा जोपर्यंत त्यांच्यामधील कांहीतरी त्या अडचणींचें समर्थन करीत असतें तोपर्यंत.

**प्रश्न**:––जितक्या अधिक तत्परतेनें आपल्या स्वभावांतील अडचणींना तोंड देण्याचा व त्यांचें निराकरण करण्याचा प्रयत्न करावा, तितक्या अशा अडचणी अधिक वाढण्याकडे प्रवृत्ति दिसते हें कसें ?

**उत्तर**:––साधना यशस्वी होत गेल्यानें मानवावरील आपला ताबा सुटून जाईल अशा भीतीनें विरोधी शक्ती अशा वेळीं उलट दिशेनें हल्ला चढवीत असतात.

**प्रश्न**:––ज्यावेळीं माझी आंतरिक स्थिति चांगली असते आणि ज्यावेळीं मजकडून प्रगतीसाठीं तत्परतेनें प्रयत्न होत असतो, तेव्हां अडचणी वाढत जाण्याचीच प्रवृत्ति दिसून येते. असें कां घडून यावें ?

**उत्तर**:––केवळ तुलाच एकटयाला असें वाटतें असें नव्हे, प्रत्येक साधकाचा हाच अनुभव आहे.

**प्रश्न**:––योगसाधना करण्याचे बाबतींत मी असमर्थ आहे असें यावरून सिद्ध होतें काय?

**उत्तर**:––तसें म्हटलें तर, प्रत्येकजणच असमर्थ असल्याचें सिद्ध होईल––कारण प्रत्येक साधकाचाच अनुभव तसा आहे.

**प्रश्न**:––साधनेंत कोणत्याच प्रकारें प्रगति करणें अवघड होऊन बसलें आहे आणि पुनः-पुनः अडचणी दत्त म्हणून उभ्या रहात आहेत, असें जर साधकास आढळून आलें, तर तो आश्रमांत कसा काय राहूं शकेल ?

**उत्तर**:––मला हा प्रश्नच समजत नाहीं. ज्यांची रहावयाची इच्छा आहे आणि ज्यांना तळमळीनें व मनःपूर्वक साधना करावयाची आहे, त्यांना कितीहि अडचणी आल्या तरी नेहमी रहातां येईलच.

**प्रश्न**:––साधकांना आपल्या प्रकृतींतील दोषांचें जोंवर निर्मूलन करतां आलें नाहीं, तोंवर भगवंताकडून घेतल्या जाणाऱ्या कसोटयांना साधकांना तोंड द्यावें लागतें असें असतें काय ?

**उत्तर**:––कसोटी नव्हे, तर तो एक निसर्गनियमच आहे कीं, योगाचें ध्येय सिद्ध होण्यापूर्वीं आपल्या प्रकृतींतील दोषांचें निर्मूलन साधकांना करावेंच लागणार.

**प्रश्नः**—विरोधी शक्तींचे हल्ले होतात आणि साधनेंत व्यत्यय निर्माण होतात, ते साधकाचें बळ पारखण्यासाठीं असतात हें खरें काय?

**उत्तरः**—साधकांवर हल्ला करणें आणि त्यांच्या साधनेंत व्यत्यय निर्माण करणें हें विरोधी शक्तींनीं आपलें विशिष्ट असें कार्यच ठरवून टाकलें आहे. साधकांच्या ठिकाणीं जर कसल्याच अयोग्य क्रियाप्रतिक्रिया, कसल्याच अपूर्णता व दुर्बलता नसतील, तर साधनेंत कोणताच व्यत्यय येणार नाहीं.

**प्रश्नः**—साधनेंत आणि माझ्या स्वभावाच्या रूपांतरांत, श्रीमाताजींची शक्ति आणि कृपा यानुसार माझी प्रगति होत आहे कीं नाहीं हें मला कसें समजूं शकेल?

**उत्तरः**—तशी प्रगति होत असेल तर तुला त्याची जाणीव होईलच.

**प्रश्नः**—आश्रमांतील कांहीं साधकांचें म्हणणें असें कीं, ते साधनेंत प्रगति तरी करीत आहेत कीं नाहीं हेंच त्यांना कळत नाहीं; कारण प्रगतिदर्शक अशी कांहीं भावनाहि त्यांना वाटत नाहीं. याला कारण काय?

**उत्तरः**—यावरून केवळ एकच गोष्ट दिसून येते, कीं ते पुरेसें जागृत नाहींत.

**प्रश्नः**—प्रगतीची कोणत्याहि प्रकारें जाणीव नसतांनाहि, वास्तविकरीत्या प्रगति चालू आहे असें म्हणतां येईल काय?

**उत्तरः**—आध्यात्मिक अनुभूतींचा अर्थ पूर्णपणें न समजतांहि आध्यात्मिक अनुभूति मिळतीलहि; पण प्रगतिसूचक अशी कसलीच भावना मुळींच वाटत नसेल, तर त्यांची प्रगति चालली आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं.

**प्रश्नः**—अनुभव येऊं लागलें म्हणजे असें समजावें काय कीं साधकाची प्रगति चालू आहे?

**उत्तरः**—प्रगति चालली असल्याचें तें सूचक आहे.

**प्रश्नः**—स्वतःच्या दुबळेपणाचें पुनः पुनः चिंतन करीत बसल्यानें आणि असुखी राहिल्यानें प्रगतींत व्यत्यय येतो काय?

**उत्तरः**—होय. साधकानें भगवंताचें चिंतन अधिक व स्वतःसंबंधीचा विचार कमी कमी केला पाहिजे.

**प्रश्नः**—अलीकडे अलीकडे माझ्या गतकालीन जीवनातील सर्व प्रकारच्या स्मृतींचें दडपण माझ्या मनावर पडत आहे. त्यास कारण काय?

**उत्तरः**—प्रकृतीच्या अर्धजागृत भागांतून त्या उफाळून वर येत असाव्यात; एवढ्याच करितां कीं त्यांतून मुक्त होतां यावें.

**प्रश्नः**—अशा प्रकारच्या स्मृतींच्या दडपणापासून मुक्त होण्याचा मार्ग काय?

**उत्तरः**—त्या उफाळून वर येतांच त्यांना दूर सारून टाकावयाचें. स्वतःच्या प्रकृतींतील कोठल्याहि अंशानें यापुढें त्या स्वीकारावयाच्या नाहींत किंवा त्यांसंबंधीं कसल्याहि प्रकारची गोडी वाटूं द्यावयाची नाहीं.

**प्रश्नः**—माझ्या संकुचित आणि अविकसित मनामुळें माझ्या साधनेंतील बहुतेक अडचणी आणि निरुत्साही मनःस्थिति उत्पन्न होते. हा दोष काढून टाकण्याचा सर्वोत्तम उपाय कोणता?

**उत्तरः**—आंतरात्म्याच्या साह्यानें योगमार्गावर प्रगति होत असते. मन ही कांहीं महत्त्वाची वस्तु नव्हे.

**प्रश्नः**—संकुचित आणि अविकसित मनामुळेंच अडचणी व निरुत्साही मनःस्थिति उत्पन्न होते हें खरें नव्हे काय ?

**उत्तर**—त्यापेक्षाहि प्राणिक (Vital) असंतोष किंवा शरीरनिष्ठ भान (The Physical consciousness) आणि त्याचें अज्ञान व तमोमयता (जडत्व) यांमुळें अडचणी आणि निरुत्साही मनःस्थिति उत्पन्न होते.

**प्रश्न**—शरीरांतील सर्व भागांतून जडत्व काढून टाकण्याचा सर्वांत जलद आणि परिणामकारक उपाय कोणता ?

**उत्तर**—ज्या भागांत जडत्व असेल तेथें कार्य करण्याकरितां भगवच्छक्तीस आवाहन करणें हा.

**प्रश्न**—माझ्या देहाच्या ठिकाणीं एवढें जडत्व आणि मान्द्य असल्यासारखें मला कां वाटतें ?

**उत्तर**—शरीर हें प्राणप्रेरणांशीं सुसंवादित्व कितपत राखतें यावर ही बाब अवलंबून असते. देहस्वभाव हा तामसिक असून प्राणप्रेरणेमुळेंच देहाचें चलनवलन असतें. प्राणच देहास साधन म्हणून वापरतो. प्राण जर ज्ञानवान् (enlightened) असेल तर भगवच्छक्ति सर्व देहभर कार्य करूं शकते.

**प्रश्न**—प्राण ज्ञानवान् आहे असें केव्हां म्हणतां येईल ?

**उत्तर**—प्राणानें निम्न प्रकृतीच्या क्रियाप्रतिक्रियाच केवळ स्वीकारावयाच्या नाहींत असें नाहीं, तर अवतरत असलेल्या दिव्य प्रकाशासाठीं स्वतःस खुलें ठेवून त्याचा स्वीकार करावयाचा. म्हणजे त्यायोगें भगवदिच्छा आणि तिच्या प्रेरणा स्वीकारतां येतील; त्या जाणून घेतां येतील. मग म्हणतां येईल कीं, प्राण हा ज्ञानवान् झाला आहे.

**प्रश्न**—श्रीमाताजींच्या 'conversations' या ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं, खरी प्राणिक क्रिया ही अति सुंदर आणि उत्कृष्ट असते. ही खरी प्राणिक क्रिया कोणती ?

**उत्तर**—मूळ दिव्य स्वरूपाची क्रिया ही खरी प्राणिक क्रिया. माणसाच्या ठिकाणीं सर्वसाधारणपणें दिसून येणारी अहंकारग्रस्त, स्वार्थी विकारान्ध आणि वासनापूर्ण अशी क्रिया नव्हे.

**प्रश्न**—कर्म करतांना, तसेंच दुसऱ्यांशीं वागतांना ज्या अडचणी मला येतात त्या पासून मला कसें मुक्त होता येईल ?

**उत्तर**—अहंकार आणि वासना यांचा त्याग करून आणि केवळ भगवत्प्रीत्यर्थ कर्म करून.

**प्रश्न**—उच्चतर जाणीवेची पातळी प्राप्त करून घेण्याच्या प्रयत्नांत असतांना कडेच्या परिस्थितींतून खालीं पाय ओढणारे जे परिणाम घडून येत असतात त्यांना थोपवून कसें धरावयाचें ?

**उत्तर**—कडेच्या परिस्थितीबद्दल तटस्थ राहून आणि उच्चस्थित अशा भगवतत्त्वावर एकाग्र होऊन.

**प्रश्न**—आपलें दुसऱ्या विषयींचें सद्विचार किंवा दुर्विचार त्यांच्यावर कांहीं परिणाम करतात काय ?

**उत्तर**—होय, त्यांचा कांहीं परिणाम असतो.

**प्रश्न**——एका व्यक्तीच्या वासना, संशय इत्यादि दुसऱ्या व्यक्तीमध्यें जाऊं शकतात काय ?

**उत्तर**——एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे कांहींहि जाऊं शकतें. या जगांत सर्वत्र सर्वकाळ अशाच घटना घडून राहिल्या आहेत.

**प्रश्न**——एकाद्या व्यक्तींत वाटणारी वासना अथवा संशय हा मुळांत त्या व्यक्तीचा नसून दुसरीकडून आला आहे हें कसें समजावें ?

**उत्तर**——त्यासाठीं जागृत राहतां आलें पाहिजे.

**प्रश्न**——दुसऱ्यांचे दोष पाहणें आणि त्यांवर टीका करणें हें अपायकारक नाहीं काय ? ही संवय म्हणजे साधनेच्या प्रगतीस मोठा अडथळा होऊन बसत नाहीं काय ?

**उत्तर**——होय. तें सारें खरें आहे. दुसऱ्याचे दोष काढण्यांत अशुद्ध प्राण हा एक प्रकारचें क्षुद्र आणि हीन असें सुख घेत असतो. पण त्यायोगें साधक स्वतःच्या आणि ज्याचे दोष काढले जातात त्याच्या साधनेंत अडथळा आणीत असतो.

**प्रश्न**——गप्पा मारणें हें साधनेंत एक विघ्न आहे काय ?

**उत्तर**——तें विघ्न होऊं शकतें आणि अनेकदां तें असतेंहि. गप्पा मारण्याची वृत्ति ही नेहमींच व्यत्यय आणणारी आहे.

**प्रश्न**——येथें आश्रमांत एखाद्या साधकानें स्वतःच्या अंतर्गत मनःस्थितीस अथवा बाह्य आचरणांत जर एखादी अयोग्य गोष्ट केली, तर आश्रमांतील इतरांना त्याचा त्रास होतो हें खरें काय ?

**उत्तर**——तशा अयोग्य गोष्टीनें आश्रमांतील वातावरणावर अयोग्य परिणाम दिसून येतो आणि तद्वारां अदिव्य शक्तींना द्वारें खुलीं होतात.

**प्रश्न**——ज्यावेळीं साधकांना अस्वस्थता किंवा त्रास जाणवू लागतो, त्यावेळीं त्यांच्याकडून भगवदिच्छेच्या विरुद्ध वर्तणुक झाल्यामुळें तसें जाणवतें काय ?

**उत्तर**——तेंहि कारण असतें किंवा त्या त्या साधकांच्या प्रकृतींतील अपूर्णतांमुळेंहि तसें घडून येतें.

**प्रश्न**——साऱ्या अडचणी आणि विघ्नें यांचें निराकरण करून झाल्यावर साधक या जगापासून दूर कां होत नाहींत ?

**उत्तर**——त्यांनीं तसें दूर काय म्हणून व्हावें ? साधकांनीं साऱ्या अडचणींचें खरोखरी निराकरण केलें असेल, तर त्यावेळीं पृथ्वीवरील वातावरणांत उच्चतर जाणिवेचें भान अंशतः प्रस्थापित केलें जातें; पण राहिलेल्या जगाचें आणि त्याच्या अपूर्ण राहिलेल्या विकासाचें मग काय होणार ?

**प्रश्न**——रोगाच्या उपद्रवापासून साधक मुक्त कसा होऊं शकेल ?

**उत्तर**——जड प्रकृतीवर विजय मिळविल्यानेंच रोगांचें आक्रमण कायमचें थांबेल.

**प्रश्न**——या ना त्या कारणाचें जर साधकास आजारीपण आलें, तर तें दुखणें त्याला झट्कन् कसें फेंकून देतां येईल ?

**उत्तर**——श्रद्धा आणि दिव्य शक्तीस आवाहन या दोहोंच्या साह्यानें बहुतेक आजार बहुधा झट्कन् फेंकून देतां येतात. अंगीं दीर्घकाल मुरलेलीं दुखणीं फेंकून देणें अधिक बिकट, पण याच दोन उपायांचा सतत चिकाटीनें अंगीकार करून त्यांचेंहि निराकरण होऊं शकतें.

**प्रश्न**––साधकास आजार झाल्यावर औषधांसारख्या जड द्रव्यांचा उपयोग करून दुखणें हटविलें, तर चालतें काय?

**उत्तर**––आवश्यक तेव्हां भौतिक साधनांचा उपयोग करण्यास हरकत नाहीं. तथापि अशा भौतिक साधनांच्या मागें भगवच्छक्ति असलीच पाहिजे. जड द्रव्याचा उपयोग करतांना सारासार विचार करूनच आणि तेंहि आवश्यक असेल तरच करावा.

**प्रश्न**––साधकाच्या ठिकाणीं भगवन्तावरील श्रद्धेचा अभाव असल्यामुळें साधकाला आजार येतो हें खरें काय?

**उत्तर**––विविध आजारांचीं विविध कारणें असतात. वरील प्रश्नांत ज्या अभावाचा निर्देश आहे त्यायोगें, आजार येण्यास मदत होते आणि आजारांचें निर्मूलन करण्यास असा अभाव आड येतो.

––श्रीअरविंद

# विद्यार्थी विभाग

## शिकंदर-पुरु

**शिकंदर**: पुरु तुझ्याच हांतून प्रथम माझा पराभव झाला.* इतिहास कांहींहि म्हणो, दांभिकतेला वश होऊनच मी सुद्धां कांहींहि म्हणत असलो, तरी आज मी त्या गोष्टीचा स्वीकार करीत आहे. त्या भयंकर रात्रीचा देखावा आजहि मी विसरूं शकत नाही. तो घनघोर अंधःकार, मुसळधार पाऊस, ढगांची मोठी गर्जना, उफाळणाऱ्या शतद्रु नदीचा अजस्त्र कलकलाट करणारा प्रवाह, हत्ती, घोडे, रथ आणि माणसें यांचा प्रलय करणारा भयंकर संग्राम यांची आठवण होऊन, आजहि माझें अंतःकरण कंप पावतें. शिवाय भल्यामोठ्या हत्तीच्या पाठीवरील तुझे बलवान् व धिप्पाड शरीर, त्याच्यापुढें घोड्यांतील श्रेष्ठ अशा बूकेफाल घोड्यावर स्वार झालेला शिकंदरसुद्धां त्यादिवशीं लहान दिसला असेल. रानटी व असंस्कृत देशांत येऊन असा कांहीं परिणाम होईल अशी माझी अपेक्षासुद्धां नव्हती.

**पुरू** : तुला वाटले असेल कीं कदाचित् सिंधूपलीकडील देशांत तक्षशिला नगरीप्रमाणें सर्वच सखलोलूप व निर्जीव लोक वस्ती करून राहिले आहेत व ते तुझा मार्ग सोडून दूर होतील; तुझे स्वागत करून तुझ्या चरणांना स्वदेशाची भेट अर्पण करण्यांत मोठा गौरव मानतील.

**शिकंदर** : जर तसे झाले असते तर त्यांत कांहींच वाईट झाले असते असें मला वाटत नाहीं. शिकंदर या देशांत केवळ तलवार घेऊन आलेला नव्हता. शिकंदरानें आपल्या बरोबर ग्रीसचा प्रकाशहि आणलेला होता. पाश्चिमात्यांच्या प्रतिभेच्या जोरावरच मी तुझ्या या अखंड भारतवर्षालाच नाहीं, तर सबंध पृथ्वीलाच एक केलें असतें. मानवजाती एक होऊन समृद्ध झाली असती. माझ्या त्या आदर्शाच्या मार्गांत तूं अडथळा आणलास. पण आज तर तूं पाहूं शकतोसच कीं माझा आदर्श चूक नव्हता. त्याच्यांत किती सत्य होतें आणि कसा जीवनदायी होता तो. पुरू, तूं माझ्या शरीराला हटविलेस पण माझ्या इच्छेला कांहीं तूं हटवूं शकला नाहींस.

**पुरू** : हेंच दुःख माझ्या मनांत सतत सलत राहिलेलें आहे. भारताच्या छातीचा पिंजराहि मोडून जो मार्ग तूं बनविला आहेस, तो मार्ग मी तुला हटवूनहि बंद करू शकलो नाहीं. त्याच मार्गानें शक, हूण, तार्तरी, मोंगल इ. सर्वच घुसले आणि त्यांनी सोन्याच्या देशाचा देह प्राण आणि मन यांना खिन्न आणि आसन्न करून टाकले. आज या देशाची स्थिति काय झाली आहे पहा. परकीयांचे हात धरल्याशिवाय त्याला चालतां येत नाहीं. धर्मकृत्यें, शिक्षण, मार्गदर्शन या बाबतींत आणि सर्वसामान्य जीवनांत सुद्धां त्याचें स्वतःचें

---

* या संवादांत प्रचलित इतिहासापेक्षां कांहीं थोडा बदल केला आहे. त्या बाबतींत अनुकूल-प्रतिकूल मत इतिहासज्ञच प्रदर्शित करूं शकतील. ——लेखक.

असें कांहींहि उरलेलें नाहीं. केवळ दुसऱ्याचा एक क्षीण प्रतिध्वनि! भारतवर्ष आतां आर्यांचा राहिलेला नाहीं. मरणपंथास लागलेला, वर्णसंकर झालेल्या जातीचा तो बनला आहे.

**सिकंदर**: मला तर वाटतें कीं, तुझा हा देश इतके दिवस जगला आहे त्याला कारण मीच झालेलों आहे. मीच त्याच्या देहांत नवीन रक्त घालण्यास सुरुवात केली होती आणि मीच त्याच्या मनाला बाहेरून नवीन नवीन भाव आणून विकसित होण्याचा मार्ग दाखविला होता. जर शिकंदरनें धक्का देऊन त्याला जागें केलें नसतें, तर पश्चिमेकडील प्रकाश आणि जीवन यांचा प्रवेश त्याच्या शरीरांत आणि प्राणांत केला नसता, तर तुझी ही विशुद्ध आर्य जाति आपल्या विशुद्ध आर्य संस्कारांसह केव्हांच नष्ट होऊन गेली असती.

**पुरू**: शिकंदर, नव्या पाश्चात्त्यांची ही केवळ दांभिकता आहे. भूतकाळांत दूर दूर पहा. विदेशीयांचा, विधर्मियांचा व विजातीयांचा कठोर हात जोंवर आमच्या जीवनावर आमच्या शिक्षे-दीक्षेवर पडला नव्हता, तोंवर सुधारणेची आदिजननी भारतमाता किती गौरवपूर्ण होती! ज्या दिवसापासून तिला दुसऱ्याचा हस्तस्पर्श झाला, ती परक्याकडे पाहून स्वधर्माला विसरली, त्या दिवसापासून स्वतःच्या आंतरात्म्याला गमावून ती मृत्यूच्या पंथास लागली. जर तिला स्वतःला, स्वतःच्या धर्माला आणि स्वातंत्र्याला जिवंत ठेवतां आले असते, व भयावह परधर्म तिच्या आंतरात्म्यावर स्वार झाला नसता, तर तुला दिसली असती भारताची शोभा आणि गौरव; भारताची संपत्ति आणि भारताचा महिमा. भारत स्वतःला विशुद्ध राखूं शकला नाहीं, बाहेरून हजारों प्रकारच्या विषारी शक्तींनीं येऊन त्याला जर्जर केले, त्याच्या खऱ्या जीवनविकासक्षमतेला पंगु केले. कुठें तो वैदिक ऋषींचा भारत आणि कुठें इंग्रजांची नक्कल करणारा आजचा भारत!

**शिकंदर**: पुरु, तुम्ही लोकसुद्धां कांहीं कमी मिथ्याभिमानी नाहीं. वैदिक काळाच्या भारता-विषयींच्या गोष्टी कशाला सांगतोस. भारताच्या एका कोपऱ्यांत कांहीं छोटीं छोटीं राज्यें किंवा नगरें होतीं. त्यांचे लहान लहान राजे होते. लोकांचे जीवन साधेसुधें होतें. अपरिपक्व आदिवासी यांच्या समाजामध्यें दोन चार ज्ञानी लोक——ज्यांना तुम्ही ऋषी म्हणतां—— असें सर्व कांहीं होतें. तुमच्या रामायण-महाभारतकाळांतहि तुम्ही लोक यापेक्षां पुढें गेलेले नव्हता. साऱ्या भारताला एका शासनसूत्रांत गोंवून एक राष्ट्र बनविण्याचें स्वप्न प्रथम कोणी पाहिले? कुणी त्याची प्रथम स्थापना केली? मुसलमान व इंग्रज यांच्या राज्यव्यवस्थे-च्या मागें असलेला सांगाडा मूळचा अजूनहि दिसत आहे, तो कोणी तयार केला? तुला त्या बालकाविषयीं आठवण आहे? ज्याचें राजश्रीमंडित मुख दाखवून मी भविष्य केलें होतें कीं, हें बालक माझ्या सारखेंच होईल? तोच चंद्रगुप्त मौर्य तुमच्या आधुनिक भारताचा संस्थापक आहे; आणि चंद्रगुप्ताचा आदर्श आणि प्रेरणा तरी कोणती होती? शिकंदरच ना? चंद्रगुप्तानंतर एकामागून एक विदेशी आणि स्वदेशी बादशहांनी भारताची उन्नती, पोषण, आणि एकीकरण केलें. येथील शिक्षा-दीक्षा आणि शिल्पकला ही पहा . . . सर्व कांहीं माझ्या नंतर झालें. त्याच्या अंगाप्रत्यंगांवर ग्रीसचाच प्रभाव पडलेला आहे. ग्रीसनेंच या सर्वांना जागृत करून, त्यांना तुझ्या देशांत फैलावून दिलें. त्यानंतर ग्रीसच्याच मार्गानें इराणी, मोंगल व इंग्रज आले . . . विदेशी लोक आपल्या ऐश्वर्यानें तुमचें भांडार भरीत होते, म्हणूनच तुम्हांला कालिदास, अजंठा आणि ताजमहाल याचा लाभ होऊं शकला.

**पुरू** : शिकंदरा, तुमच्या प्रौढीचें हें पुराण आतां पुरें झालें. भारतवर्ष पूर्वी कसा होता हें समजून घेण्याची क्षमता जर तुझ्यांत असती, तर तुझ्या हांतून एकाददुसऱ्याहि ज्ञानी अथवा साधकाचे प्राण हरण केले गेले नसते. मी देखील ती गोष्ट सांगत नाहीं. पण मला इतकेंच म्हणावयाचें आहे कीं, विदेशी लोकांच्या शस्त्रघातानंतरहि जर कधींकाळीं भारताच्या जीवनशक्तीचा प्रभाव दिसला असला, तर तुम्हां लोकांना त्याचें श्रेय मुळींच नाहीं. तुमच्यामुळेंच नव्हे तर तुमच्यावांचूनहि भारताची प्रतिभा फुलली. पाषाणाच्या एवढ्या ओझ्याच्या दडपणाच्या आंतूनहि अग्नीचे स्फुलिंग बाहेर पडतांना पाहून तुम्ही आश्चर्यचकित झाला. पण जर भारताच्या छातीवर हा भार नसता, तर तुम्हांला दिसलें असतें कीं, भारताची मूर्ति किती अनुपम आहे! भारताचा अमर आंतरात्मा आजहि कोठेंतरी लपून बसला आहे. योग्य वेळ येतांच तो प्रगट होईलच.

**सिकंदर**: पुरू, हाच तुझा भ्रम आहे. कोणीहि मानव किंवा राष्ट्र कितीहि महान् किंवा शक्तिशाली असेना कां, निःसंग राहून किंवा एकटे राहून आपल्या आपल्यांतच पूर्ण होऊन तें पृथ्वीवर टिकूं शकत नाहीं. ह्या जगांत कोणतीहि वस्तु अमिश्र अशी नाहीं. सर्वांची घडण देवीघेवीच्याच द्वारें होते. ज्याच्यांत ही देवघेव नाहीं, तो मृत किंवा मरणासन्नच होय. मोठा लहानाला देतो, लहानहि मोठ्याकडून तें घेतो. लहानाजवळहि जर कांहीं देण्याजोगें असेल तर, तो लहान देखील मोठ्याला देऊं शकतों आणि मोठाहि तें घेतो. फार पूर्वीपासून असेंच होत आलेलें आहे. यांत अडथळा आणणें ही मोठी चूक आहे. हल्लींच्या जगाकडे जरा डोळे उघडून तर बघा, म्हणजे सहज समजून येईल कीं मानवजाति ही एकाच प्रकारचें शिक्षण व एकाच प्रकारच्या भावना, एवढेंच नव्हे, तर समाजरचना आणि राष्ट्रीय भावना यांमध्येंहि बरेंचसें साम्य राखूनच पुढें पुढें प्रगत होत आहे.

**पुरू**: असेंच मला वाटत होतें खरें. पण त्याबरोबरच एक भ्रमहि दूर होऊन कळलें कीं, एकत्व याचा अर्थ एकरूप होणें नव्हे. स्वत्वाचे रक्षण केलेंच पाहिजे. प्रत्येकाला स्वातंत्र्य असलेंच पाहिजे. प्रत्येकानें स्वधर्म शोधून काढला पाहिजे. कर्तृत्वाचा बळी देऊन कोठल्या तरी मोठ्या यंत्राचा आणि ते सुद्धां दुसऱ्यानें बनविलेल्या यंत्राचा--भाग बनणें यांत कांहीच सार्थकता नाहीं. जो मनुष्य जगांतील वैचित्र्य नष्ट करण्याचा प्रयत्न करील, तो जगाला केवळ एक जड, अचल पदार्थ बनवून टाकील.

**सिकंदर**: आणि वैचित्र्य याचा अर्थ जर असा असेल कीं, आपण आपलें श्रेष्ठत्व कायम ठेवणें आपण स्वतःला शुद्ध राखण्यासाठी कूपमंडूक बनणें, स्वधर्माच्या ऱ्हासाच्या भीतीनें आपल्या सभोंवार चीनसारखी भिंत उभी करणें . . . . तर मग असें लहान लहान जीव, ते लहान लहान समाज जिवंतपणें पृथ्वीवर फार काळ टिकणार नाहींत.

**पुरू**: मी तर म्हणतो . . . स्वधर्मे निधनं श्रेयः। दुसऱ्यांच्या बरोबर मिळण्यामिसळण्यापूर्वी 'स्व' ला प्राप्त करून घेतलें पाहिजे. 'स्व' स्वरूपाची प्राप्ति होण्यासाठीं दुसऱ्यांचा सहवास जरी एकदम सोडावा लागला, तरीसुद्धां तें योग्यच आहे. आपलें छोटेसें 'स्वत्व' हें फार मोठ्या परत्वापेक्षां जास्त मोलाचें आहे. मी साम्राज्यसाधक नाहीं. माझी साधना आहे स्वराज्यासाठींच.

अनुवादकः श्री. ज. ना. वेलिंगकर. श्री. नलिनीकांत गुप्त.

# प्रेरक पत्रें

(३)

'योग' ही काय वस्तु आहे, हें सोप्या भाषेंत सांगा असें तूं लिहतोस. तूं म्हणतोस मोठमोठे शब्द, उच्च तत्त्वें सर्व सोडून, सामान्य मनुष्याला समजेल अशा रीतीनें मुख्य कोणती बाब आहे, हें स्पष्ट, सुलभ अशा एकदोन शब्दांत समजावून सांगा. होय ना ? यथाशक्ति मी प्रयत्न करेन. पण त्यापूर्वी दोन गोष्टी तुला सांगतो. साधी गोष्ट जशी साध्या व सोप्यारीतीनें सागतां येते, तशी कठीण गोष्ट सोप्यारीतीनें सांगणें शक्य नसतें. स्वभावतः जी गोष्ट असाधारण आहे, तिला ओढून ताणून सामान्य पातळीवर आणणें कठीण आहे; आणि तसें करणें नेहमी योग्य असतेंच असें नाहीं. पुष्कळांना हें समजत नाहीं कीं, अशा सोप्या पद्धतीनें त्यांच्या आळसालाच उत्तेजन मिळत असतें. कष्ट करायची, बुद्धि चालविण्याची जरूरी आहे व त्यायोगें फळहि चांगलें मिळतें ही गोष्ट पुष्कळांना सांगूनहि समजत नाहीं. माझ्या मतें असाधारणाला साधारण पातळीवर आणण्यापेक्षां, साधारणला जबरदस्तीनें सुद्धां असाधारणाच्या पातळीवर खेंचण्याचा प्रयत्न एकवेळ अधिक चांगला. पण हें खरें आहे कीं, त्यासाठीं विनाकारण व्याप वाढवून मुद्दाम कष्ट करावयास लावणें हेंहि योग्य नाहीं. अनेकवेळां असाधारण विषयाला लोक अधिक असाधारण, अनधिगम्य, गूढतम असें रूप देतात. विशेषतः तूं सांगतोस तसें, 'योग' या विषयाला तसा गूढपणा फार आलेला आहे.

योग म्हणजे एक मोठें गूढ आहे, चमत्कारिक वस्तु आहे असें वाटतें, याचें कारण योगाशीं ज्याचा वास्तविक संबंध नाहीं असे कित्येक गूढ, अतर्क्य, गुंतागुंतीचे कुटिल क्रियाकलाप म्हणजे योगाचे अभिन्न अंग आहे असें पुष्कळवेळां सांगितलें जातें. पण नीटपणें पाहिले तर योग ही गोष्ट पुष्कळच साधी व स्वाभाविक आहे. येवढेंच नव्हे तर सर्वजणच योगसाधना करीत असतात. मग त्यांना तें समजो अथवा न समजो जें अज्ञात आहे, गुप्त नदीप्रमाणें जें आतून लपून स्रवत राहिलें आहे, त्याला फुलविणें याला म्हणावयाचें साधना.

थोडक्यांत योग म्हणजे जीवनाच्या एका नवीन नियमाचा आविष्कार आहे, शोध आहे. सर्व जीवनाचे परिचालकत्व त्याला देणें आहे. हाच दिव्यजीवनाचा धर्म. मानवामध्यें द्विविध स्तर, दुहेरी वृत्ति, दोन प्रकारचे धर्म आहेत. एक ऊर्ध्व नेणारा व एक खालच्या थरावरील. नदीच्या दोन तीराप्रमाणें एक एका बाजूकडील व दुसरा दुसऱ्या बाजूकडील. खालच्या स्तरावरील म्हणजे देह प्राण आणि मन या तीनांचा जो धर्म, नियम, बंधन, मर्यादा, यांमध्येंच मनुष्य साधारणतः फिरत असतो, व्यवहार करीत असतो. परंतु मन प्राण देह यांच्यावर आणखी एक जागा आहे. तेथें मनुष्याचें ज्ञान हें स्थूल इन्द्रियानुभूतीवर अवलंबून नाहीं. बुद्धि, विचार, तर्क यांवरहि नाहीं. तें ज्ञान आहे स्वयंप्रकाश, अखंड अव्यर्थ अमोघ. तीच दिव्यदृष्टि होय. प्राणाचा जो चंचल, उन्मत्त, मलिन, अंध कर्मावेग व भोगवासनेचा जो विक्षोभ त्यांची उच्चतर स्तरावर प्रशांत तपःशक्तींत व विशुद्ध आनंदांत परिणति होते.

त्या ज्ञानाची एक सत्ता आहे. पण त्यामध्यें देहगत सत्तेचे दोष रोग, जरा व मृत्यु यांचा वास नाहीं. त्या सत्तेंत पूर्ण स्वास्थ्य, पूर्ण सौंदर्य आहे व ती सत्ता अमृतत्त्वानें परिप्लुत आहे. देह प्राण मन यांच्या धर्माला ओलांडून या तुरीय वा दिव्य प्रकृतीच्या धर्मात चढून जाणें हाच योग. पण यावरून अशी समजूत करून घेऊं नकोस कीं हा दिव्य स्वभाव मिळविण्यासाठीं देह प्राण मन, हें जग, ही पार्थिव लीला या सर्वांचा नाश केला पाहिजे. तसें मुळींच नाहीं. देह प्राण मनांत राहूनहि त्या उच्च लोकाचा साक्षात्कार मिळूं शकतो; व या देह प्राण मनांतच त्याला ओतून भरतां येतो. खालच्या प्रकृतीला या उच्चतर प्रकृतीच्या प्रभावानें, त्या दिव्य गुणधर्मांनीं युक्त अशी बनवितां येते. येथें पृथ्वीवर राहून, या पृथ्वीवरील सर्व व्यवहाराला त्या दिव्य लोकाच्या सत्तेनें आणि प्रेरणेनें परिचालित करतां येते.

हें आहे कठीण उद्दिष्ट. तरीपण तें अशक्य मात्र नाहीं. किंवा फार दूरचें आहे असेंहि नाहीं. तें असंभवनीय आहे असें जेव्हां वाटतें, तेव्हां आपली दृष्टि फक्त आपणाकडे असते. आपण म्हणतो "मी एक क्षुद्र प्राणी. प्रकृतीच्या या महान् काळाच्या प्रचंड गतिमान् धारेला उलटून टाकेल अशी माझी शक्ति कुठे आहे? शंभर जन्म घेतले तरी मला तसें करतां येईल कां?"तथापि स्वतःला सोडून विश्वाकडे जरा नजर टाकली, तर त्यांत उत्साह देणारे, आशा देणारे कांहींच नाहीं असें नाहीं. 'सर्वकांहीं बदलणारें आहे' या पाश्चात्यांच्या विचार-पद्धतीवर आपण सर्व विश्वास टाकून आहों. पण हेंच उत्क्रांतितत्त्व म्हणतें कीं, पृथ्वीच्या प्रथमावस्थेंत सर्व जड होतें. नंतर आले पाणी आणि शेवटीं उत्पन्न झाला प्राणी. अर्थात् पाश्चात्यांनी अधोभागाच्या प्रकृतींतील उत्क्रांति पाहिली. प्रथम देह नंतर प्राण व नंतर मन. परंतु मनयुक्त मानव उत्पन्न करून, तेथें उत्क्रान्ति थांबली असें समजणें हें अगदीं तर्क-विरोधी आहे. योग हेंच सांगतो कीं, मनाच्या पलीकडची पायरी म्हणजे विज्ञान. म्हणजे तुरीय. देव. म्हणजेच अतिमानव.

हेंच अतिमानस तत्त्व अथवा अतिमानव जन्मास घालण्यासाठीं प्रकृति झटत आहे. तूं, मी व दुसरे सर्वच अजाणतां हाच प्रयत्न करीत आहोंत. या प्रयत्नांमागें जी शक्ति आहे, ती अखिल ब्रह्मांडामधील अक्षय शक्ति असून, ती प्रत्येक मनुष्यामध्यें दिव्य विभूतीचा प्रकाश, मानवजातींत स्वर्गराज्याची प्रतिष्ठा व सत्ययुगाचे अवतरण घडविण्यासाठीं सर्वांस आवाहन करत आहे. ती शक्ति जेव्हां तुझ्या-माझ्यांत जागृत होते व आपण जेव्हां तिला ओळखून जाणून तिच्या अनुभवांत राहून तिच्या उद्दिष्टाच्या प्राप्तीसाठीं यत्नपूर्वक व्यवहार करूं लागतो, तेव्हां तिला आपण योगशक्ति असें नांव देतो. ही विश्वशक्तीच आहे. हिला असंभाव्य, अशक्य असें काय असणार? असो.

तुझा,

. . . . . . .

लेखक: श्री. नलीनीकांत गुप्त.
अनुवादक: श्री.ज.ना.बेलिंगकर.

# आरोग्य रक्षणासाठीं

पहा जमलें तर :—

## स्वच्छताविषयक

१ शाळेंत येतांना हात आणि तोंड स्वच्छ करून व कपडे नीटनेटके घालून येत जा.

२ रोज एकदां तरी अंघोळ कराच. दोनदां केली तर अधिकच चांगलें.

३ सकाळीं शाळेंत येण्याचे आधीं आणि रात्रीं झोंपीं जाण्यापूर्वी दांत स्वच्छ घासा.

४ जेवण्यास प्रारंभ करण्यापूर्वी हात स्वच्छ धुवा.

५ जेवण झाल्यावर तोंड खुळखुळून स्वच्छ करा.

६ साबण वगैरे वापरून झाल्यावर हात पुन्हां स्वच्छ धुवा.

७ विनाकारण नाकांत व तोंडांत बोटें घालूं नका.

८ वापरण्याचा रूमाल नेहमीं स्वच्छ ठेवा.

९ पाणी पिण्याचा नळ आरोग्याचे दृष्टीनें वापरा.

१० सर्वांकरितां वापरण्याच्या साबण, हातरूमाल इत्यादि वस्तु विशेष स्वच्छ ठेवण्याचा यत्न असूं द्या.

## खाणें-पिणें

१ शाळेंत येण्यापूर्वी शरीरास पोषक अशा पदार्थांची न्याहरी करत जा.

२ दुसऱ्यानें उष्टे केलेलें अन्न खाऊं नका.

३ खाण्याचा पदार्थ चुकून जमीनीवर पडला, तर तो उचलून पुन्हां खाऊं नका.

४ काय खायचें तें नीटपणें खालीं बसून व तोण्ड मिटलेलें ठेऊनच चांगलें चावून खा.

५ प्रत्येक जेवणामध्यें थोडेंतरी दूध पीत जा.

६ चहा किंवा कॉफी अजिबात पिऊं नका.

७ जेवतांना फार प्रमाणांत पाणी पिऊं नका.

८ सबंध दिवसांत निदान चार भांडी तरी पाणी प्याच.

९ मधल्या विश्रांतीच्या सुट्टीमध्यें थोडेसें पाणी प्या.

१० रोज थोडीशी तरी फळें खात जा.

११ नेहमींच्या खाण्यांत पिष्टमय पदार्थांच्या जोडीला रोज एकादी तरी भाजी असूं द्या.

१२ धान्याचा बनविलेला कठीण असा एकादा तरी भाकरीसारखा पदार्थ जेवणांत असूं द्या.

१३ दोन्ही जेवणांच्या दरम्यान कोणतीहि मिठाई खाऊं नका.

## झोंप

१ अंधार असेल अशाच खोलींत झोंपा.

२ रोज पुरेसा वेळ झोंप घ्या.

३ झोंपण्याच्या खोलीच्या खिडक्या उघडया ठेवा.
४ डोक्याखालीं छोटीशी उशी असूं द्या.
५ अधिक जड अन्नाचें जेवण झाले असतांना, लगेच झोपीं जाऊं नका.

## विश्रांति

१ कोणी विश्रांति घेत असतील, तर त्यांना कधींहि त्रास देऊं नका.
२ विश्रांतिकाळामध्यें शरीरांतील सर्वच्या सर्व स्नायूंना पूर्ण विश्रांत होऊं द्या.

## घराबाहेरील खेळ, सूर्यप्रकाश व मोकळी स्वच्छ हवा

१ दिवसांतील कांहीं वेळ नियमितपणें घराबाहेर मोकळ्या हवेंत खेळत जा.
२ खेळ खेळतांना तो मनापासून व सचोटीनें खेळा.

## मलविसर्जन

१ दररोज ठराविक वेळेला नियमितपणें पोटांतील मळ काढून टाकीत जा.
२ शौचास व लघवीस लागतां क्षणींच तिकडे प्रथम लक्ष देत जा.

## डोळ्यांची काळजी

१ चांगला उजेड असेल अशाच ठिकाणीं बसून वाचन करीत जा.
२ वाचनाचें पुस्तक अथवा कागद डोळ्यापासून निदान १४ इंच तरी दूर धरून वाचीत जा.

## नाक व घसा यांची काळजी

१ खोकतांना किंवा शिंक देतांना तोंड व नाक रुमालानें झांकून घेत जा.
२ नाक स्वच्छ ठेवा आणि श्वासोच्छ्वास करतांना तोंड बंद ठेवा.

## उठणें बसणें चालणें इत्यादि

१ चालतांना वा उभे राहतांना पायाचे अंगठे समोर सरळ राहतील असे करा.
२ चालतांना मान सरळ व ताठ ठेवा.
३ ताठ बसा व सरळ उभे रहा.
४ आपणास पुरेल अशा आकाराची खर्वी असूं द्या.

## कपडे लत्ते वगैरे

१ हवामान लक्षांत घेऊनच कपडे वापरीत जा.
२ घरांत वावरत असतांना पादत्राणें घालूं नका.

## सुरक्षितता

१ दारांतून जातायेतांना, जिन्यावरून चढताउतरतांना, रस्त्यानें चालतांना व रस्ता ओलांडतांना डाव्या बाजूनें जात जा.

२ रस्त्यामध्यें खेळ खेळूं नका.

३ वाहनांची ये जा नीटपणें न्याहाळून मगच मोकळी वाट होतांक्षणींच रस्ता ओलांडा.

## आनंदीवृत्ति

१ कोठेंहि काम करतांना अथवा घरीं खेळत असतांना, शाळेंत वा क्रीडाङ्गणावर नेहमीं आनंदी रहा व दुसऱ्यास नेहमीं मदत करण्यास तत्पर असा.

—आश्रमाच्या शारीरिक विभागातर्फे प्रकाशित

---

प्रकृति अथवा स्वभावच सर्वकांहीं करवीत आहे. भगवंत लोकांना कोणतीहि कृति करावयास भाग पाडीत नाहीं. अर्थात् भगवंताच्या सान्निध्यावांचून व आधारावांचून कांहींच घटना घडणें शक्य नाहीं. होय, स्वभाव अथवा प्रकृति म्हणजे भगवंताचीच शक्ति आहे; आणि ही शक्तीच सर्व कांहीं घडवून आणते; पण ती जें घडवून आणते, ते प्रत्येक माणसाचा अज्ञानपूर्ण स्वभाव आणि विचार अथवा इच्छासंकल्प यांच्या अनुरोधानेंच—आणि जोंवर माणूस भगवंताकडे वळला नाहीं, त्याविषयीं त्याला जाणीव झाली नाहीं आणि त्याच्याशीं तो एकरूप झाला नाहीं तोंवर हें असेंच चालणार. हें झालें म्हणजेच केवळ म्हणतां येईल कीं, त्या माणसामध्यें व त्याच्या हांतून जें घडतें, तें सर्व परमेश्वराच्या प्रत्यक्ष इच्छेनें घडण्यास प्रारंभ होतो.

१५-५-३५.　　　　　　　　　　　　　　　　—श्रीअरविन्द

★

अजाण व मूर्ख लोक कांहीहि समजू देत, तुमच्या आंतरिक जीवनांतील स्पंदनेंच तुमच्या बाह्य जीवनांतील घटनांस जबाबदार असतात.

१-१०-९४　　　　　　　　　　　　　　　　—श्रीमाताजी

# साहित्य-सत्कार

## कायासिद्धि अथवा शारीरिक पूर्णत्व

('कायाकल्प'—स्वामीशिवानंद. योगवेदांत फॉरेस्ट अँकॅडमी, ऋषीकेश. पा० ४८ किं. ५० न.पै. वरील अभिप्रायलेख)

म्हैसूरच्या एका कायदातज्ज्ञानें लिहिलेलें एक चरित्र वाचण्याचा योग नुकतांच आला. पतियाळा संस्थानमध्यें सन १७७० सालीं जन्मलेल्या व १८५ वर्षें जगलेल्या एका योगिराजांचें तें चरित्र होतें. त्यांचें नांव होतें तपस्वीजी. त्यांचा जन्म एका राजघराण्यांत झाला होता. पतियाळा राजघराण्यांतील ही व्यक्ति मोगलांचा शेवटचा बादशहा बहादुरशहा याच्या दरबारास उपस्थित होती. आंतरिक जीवनांतील प्रगतीच्या ओढीनें त्यांनी वयाच्या ५५ व्या वर्षी संन्यासदीक्षा घेतली. अतिशय थोर अशा तपश्चर्येचें जीवन सुरू झालें. गुहावास, कधीं घनदाट अरण्यवास, तर कधी एकाद्या पर्वतावर निवास, तर कधीं हिमालयांतील पर्वतराजींत एकांतवास करीत करीत त्यांचें जीवन खडतर मार्गावरून चाललें होतें. या काळांत त्यांना अनेक साधुसंतांच्या व योग्यांच्या गांठी पडल्या. नाना अनुभवांनी त्यांचें जीवन समृद्ध झालें. तरीपण खडतर तपस्येनें कष्टलेलें त्यांचें शरीर—वयाच्या साधारण सतराव्या वर्षी असेल—अत्यंत गलितगात्र झालें असतां त्यांची एका सिद्ध योग्याशी गांठ पडली. साधनेविषयींची त्यांची आस्था पाहून त्या योग्याचें मन द्रवलें व त्यांनीं साधनेसाठीं त्यांचें शरीर पुन्हां नवतारुण्यानें भरण्यासाठी त्यांच्यावर प्रयोग करण्याची आपली तयारी दर्शविली. तपस्वीजींना हा मोठा अनुग्रहच वाटून त्यांनी आपलीहि संमति दिली. एकांतांतील एका अंधाऱ्या खोलींत सात आठवडे तपस्वीजींना ठेवून योगिराजांनीं त्यांच्यावर कांहीं वनस्पतींच्या औषधींचा प्रयोग केला. या प्रयोगकालांत त्यांच्या शेजारीं एकसारखें कोणीतरी असण्याची फार आवश्यकता होती. तें काम स्वतः योगिराजांनीं अत्यंत कष्ट घेऊन केलें. औषधीप्रयोग चालू असतां हळूहळू त्यांचे पहिले दांत, केस, नखें सर्वकांहीं गळून गेले. नंतर पुन्हां दांत नखें केस वगैरे सर्वकांहीं नवे आले. प्रयोगाचा काल संपतांना त्यांचें पूर्वीचें शरीर जाऊन, जणु त्या जागीं नवीनच देह त्यांना मिळाला. पुन्हां नवतारुण्यानें त्यांचें शरीर मुसमुसून गेलें. ही एवढी मोठी कृपा झाल्यावर तपस्वीजींना कळेना, कीं हें ऋण कसें फेडावयाचें? त्यांनीं तसें विचारल्यावर योगिराजांनी सांगितलें, कीं तू माझ्या शरीरावर हाच प्रयोग करून मलाहि नवीन देहाचा लाभ करून दे. तपस्वीजींना आनंद झाला. गुरुजींच्या सर्व सूचना अनुसरून व पडतील ते सर्व कष्ट घेऊन तपस्विजींनी कायाकल्पाचा हा योग पूर्णतेस नेला. तपस्वीजींनी हा प्रयोग स्वतःवर एकंदर दोन वेळां करून घेतला व वयाच्या १८५ वर्षांपर्यंत आपली साधना व तपस्या करून, शेवटीं त्यांनी सन १९५५ मध्यें देह ठेवला. १९३८ मध्यें पंडित मदनमोहन मालवीय यांच्यावर कायाकल्पाचा प्रयोग करणारे योगी ते हेंच श्रीतपस्विजी, हें येथें मुद्दाम

उल्लेखिले पाहिजे. अर्थात् इतर अनेक कारणांमुळें त्यांच्यावरील हा प्रयोग तितकासा यशस्वी झाला नाहीं.

कायाकल्प म्हणजे काय ? तो कशासाठीं करावयाचा ? या कायाकल्पानें शरीर पुन्हां तरुण कसें बनतें ? इत्यादि प्रश्न जिज्ञासू मनांत येणें अगदीं साहजिक आहे. अर्थात् या-विषयींची अधिकृत व प्रत्यक्ष अनुभवसिद्ध अशी माहिती आज मिळणें दुरापास्त आहे. कारण ही माहिती रसशास्त्रावरील प्राचीन आयुर्वेदीय ग्रंथांतच फक्त उपलब्ध असून, सिद्धवैद्यका-मध्येंहि त्याचा उल्लेख आहे हें खरें. परंतु या विषयावरील कांहीं उद्‌बोधक माहिती स्वामी शिवानंदांनी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या 'कायाकल्प' या पुस्तकांत वाचावयास मिळत आहे हे विशेष.

लेखक लिहितात, आरोग्य रक्षणार्थ व आयुष्य वर्धनार्थ भारतीय शास्त्रांत तीन मार्ग सांगितलेले आहेत. ते तीन मार्ग म्हणजे योग, मंत्र व औषधीः या पुस्तकामध्यें फक्त औषधी प्रयोगासंबंधीं विवेचन केलेलें आहे. या औषधी चिकित्सेचें मूळतत्त्व हें आहे. . . . आपलें शरीर हें असंख्य पेशींचे बनलेलें आहे. या पेशी एकसारख्या नष्ट होत आहेत व त्याजागीं दुसऱ्या नवीन पेशी उत्पन्न होत आहेत. जेव्हां या नवीन पेशी जुन्यांच्या जागीं येण्याचें काम मंदावूं लागतें, तेव्हांच मनुष्य वृद्ध होऊं लागतो. शरीरशास्त्रवेत्ते म्हणत कीं मानवी देहांतील पूर्वींच्या सर्व पेशी जाऊन, सर्व नव्या पेशी येऊन, एकप्रकारें नवदेह प्राप्त होण्यास सुमारें नऊ वर्षांचा काळ जातो. आतां तर हा काळ केवळ दीड वर्षाचाच आहे असें शास्त्रज्ञ म्हणूं लागले आहेत. पेशीच्या मरणाच्या क्रियेपेक्षां जर पेशीच्या पुन-र्जननाची क्रिया अधिक वेगवान् राहील, तर शरीर सुस्थितींत नेहमींच राहील. म्हणजेच पर्यायानें शरीरास मरणाधीन होण्याचेंहि कारण उरणार नाहीं. पेशींना पुनर्जननाची शक्ति देण्याचेंच कार्य आयुर्वेदीय रसायनप्रयोगानें साध्य होत असतें. निम्बबीज, हरीतकी, आंवळा, दूध, ताक, गंधक व पारा इत्यादि औषधींचा उपयोग या रसायनप्रयोगामध्यें केलेला असतो. यांतील मुख्य द्रव्य पारा हें सर्वांत श्रेष्ठ रसायन प्रत्यक्ष शिवबीज अथवा महारसायन म्हणून रसशास्त्रांत सर्वमान्य आहे. पारा शुद्ध करण्यासाठीं त्यावर एकंदर अठरा संस्कार करावे लागतात. या संस्कारानंतर त्याच्या अंगीं अद्‌भुत गुण निर्माण होतात. या रसायन-प्रयोगानें पेशींची पुनर्जननक्रिया जोरदार होते, रक्त शुद्ध होतें, मज्जातंतूव्यूह सतत जागृत व तजेलदार रहातो. अशारीतीनें शरीराचा प्रत्येक अवयव पुन्हां तरूण बनून जातो. साहजिकच आयुर्मानहि वाढतेच.

हा कायाकल्पाचा प्रयोग करण्याच्या दोन पद्धती आहेत. 'कुटिप्रवेशिका' व 'वाततापिका'. एक कुटीमध्यें राहून व दुसरी बाहेर राहून. एकामध्यें एक अशा तीन कुटिका बांधाव्या, समोरासमोर पुरेशा खिडक्या असाव्या. ज्या व्यक्तीवर प्रयोग करावयाचा, त्याच्या हाताच्या मापाच्या त्या असाव्या. कुटीला लांकूड कोणत्या ओषधिगुणांनी युक्त असें वापरावें वगैरे सर्वकांहीं शास्त्रांत तपशिलवार सांगितलेलें आहे. एकांतवासांतील या प्रयोगास प्रारंभ करण्यापूर्वी कांहीं धार्मिक विधीहि करावयाचे असतात. त्या माणसाच्या ग्रहयोगाचा विचार करून, चांगला मुहूर्त पाहून, प्रारंभ करावयाचा असतो. प्राणायाम, ब्रह्मचर्यपालन व अशीच कांहीं पथ्यें पाळावयाची असतात.

प्रयोगाच्या अधिक तपशिलांत जाण्याची येथें आपणांस आवश्यकता नाहीं. एकंदरींत

मानव-जीवनाचा पाया असलेलें मानवाचें शरीर भौतिक साधनांनीं बलवान् व दीर्घजीवि करण्याचा हा प्रयत्न आहे इतकें सांगितलें म्हणजे पुरें. अर्थात् हा प्रयोग तरूण वयांत अथवा मध्यम वयांतच करावयाचा असतो. तो उतारवयांत अथवा म्हातारपणांत केला तर यशस्वी होणार नाहीं असेंहि शास्त्रकारांनी सांगून ठेवलेलें आहे. शिवाय हा प्रयोग जरी तरूणवयांत केला, तरी त्याचा परिणाम कांहीं कायम स्वरूपाचा होतो असें नाहीं. कालांतरानें पुन्हां वार्धक्याचा शिरकाव होतोच. म्हणूनच वर आम्ही उल्लेखिलेल्या योगिराजांना सुद्धां हा प्रयोग स्वतःवर एकंदर तीनदां करावा लागला. शिवाय हेंहि पाहण्याजोगें आहे कीं, प्रत्येक वेळीं प्रयोगाचा होणारा परिणाम पहिल्यापेक्षां कमी टिकाऊ असा होता. सारांश काय तर या प्रयोगानें फक्त थकल्याभागल्या जीवाला कांहीं वर्षांपुरती उत्तेजना फारतर मिळतें असें म्हणतां येईल. बाहेरून उत्तेजना देऊन, शक्ति वाढवून देहाकडून अधिक काम घेतल्याचा असा परिणाम होतो कीं, उत्तरोत्तर शरीर अधिक वेगानें वार्धक्याप्रत जाऊं लागतें. अर्थात् या प्रयोगाची ही मर्यादा लक्षांत घेतां असें म्हणतां येईल कीं, तरूण वयांत ज्याप्रमाणें शरीरस्थ पेशी आपणहून पुनरुज्जीवित होतात, तशा त्या म्हातारपणांतहि होऊं शकल्या, तें गूढ जर उकललें तर मात्र मानवी आयुष्य कल्पनातीत कालपर्यन्त वाढवितां येणें सहज शक्य होईल.

केवळ औषधी प्रयोगांतील हें वैगुण्य दूर करण्यासाठीं त्या प्रयोगास धार्मिक, योगिक वा अध्यात्मिक साधनांची जोड देऊन कायासिद्धी यशस्वी करण्याचा प्रयत्न कांहीं परंपरांमध्यें झालेला दिसून येतो. उदाहरणार्थ उत्तरेकडील नाथ व रसेश्वर सिद्धांचा आणि दक्षिणेंतील महेश्वर व ज्ञानसिद्धांचा सांप्रदाय. या सांप्रदायांतील साधक मृत्यूस जिंकून इच्छामरणी होण्याच्या उद्देशानें कायासिद्धीच्या प्रयोगांत योगिक व भौतिक दोन्हीं उपायांचा अवलंब करतात. हें साधण्यासाठीं दोन रीती असतात. एक म्हणजे शरीराची घटनाच अशा धोरणानें बदलावयाची कीं ज्यायोगें बाहेरील वातावरणाशीं वा परिस्थितीशीं शरीर नेहमीं सुसंवाद राखण्यास समर्थ राहील. दुसरी रीत म्हणजे शरीरांतील भौतिक पेशींना बदलून, त्या जागीं अतिभौतिक अणूंच्या पेशी उत्पन्न करून, शरीरास एकदम दिव्यता प्राप्त करून द्यावयाची.

या सांप्रदायाच्या शिकवणीनुसार, मानव-शरीर हें अशुद्ध मायेचें बनलेलें असतें. नियमितपणें गुरुदर्शित मार्गानें तपस्या करून, ही शारीर अशुद्धि घालवून सावकाश सावकाशपणें शरीरास शुद्ध मायेच्या पातळीवर आणलें जातें. अर्थात् अशुद्ध मायेपासून ही सुटका होण्यास गुरुकृपा मुख्यतः आवश्यक असते हें सांगावयास नकोच. अशा मायामुक्त शरीराला प्रणवतनु अथवा मंत्रतनु अशी संज्ञा आहे. अशी तनु फक्त जीवनमुक्तालाच प्राप्त होतें हें सरळच आहे. तरीपण या मायामुक्त देहाचा त्याच्या सभोंवतालच्या मायामय जगाशीं एकसारखा संबंध येत राहिल्यानें त्या देहावर त्याचा तितक्या प्रमाणांत परिणाम होतो. म्हणून ह्या मार्गांतील योगी यानंतर बाहेरच्या मायामय जगताचा संबंध तोडून पाशमुक्त होण्याच्या मार्गास लागतो. यावेळीं त्याच्या प्रणवतनूचें ज्ञानतनूंत रूपांतर होऊन जातें. अशारीतीनें हें शुद्धमायेचें शरीर महामायेचें शरीर बनतें. शुद्ध वा अशुद्ध कोणत्याच प्रकारच्या मायेशीं या शरीराचा आतां संबंध उरलेला नसतो.

एकंदरींत असें दिसतें कीं, या पद्धतींत शरीराच्या रूपांतराकरितां प्रार्थना, मंत्र, विशिष्ट आहार व पारा आणि अभ्रक यांच्या रसायनाचें सेवन इत्यादींचा आधार घेतला जातो. शिवाय असें कांहीं व्यायामप्रकार नियोजित केलेले असतात कीं, ज्यांयोगें शरीरांतील कांहीं अवयवांची क्रिया थांबते वा त्यांत कल्पनातीत बदल होऊन जातो. कांहीं अवयवांचा उपयोग अजिबातच थांबविण्यांत येतो आणि शेवटीं शरीरांत इतका बदल होऊन जातो, कीं त्याचें भौतिकत्व नष्ट होऊन तें अतिभौतिक बनून जातें. या अतिभौतिक शरीराचें पोषण वैश्विक शक्तींच्या द्वारां होत रहातें. हा सर्व बदल वरून लक्षांत येण्याजोगा नसतो. फक्त ज्या-वेळीं योगी जीवनयुक्त अवस्थेंतून परामुक्तीच्या अवस्थेंत जातो, त्यावेळीं त्याची प्रणवतनु एकाएकीं क्षणार्धांत अदृष्य होऊन, त्याजागीं दैदिप्यमान असें दिव्यशरीर दिसूं लागतें. राम-लिंग स्वामींच्या देहावसानाचें वर्णन असेंच केलेलें आढळतें. सर्वांचे डोळे दिपले व त्यांचें शरीर अदृष्य झालें असें सांगतात, त्याचा अर्थ हाच.

नाथसिद्धांच्या मार्गांत औषधींचा उपयोग न करतां, देहसिद्धी प्राप्त करून घेतली जाते. त्यांच्या तत्त्वाप्रमाणें शारीरिक अमरत्वाचें बीज मानव देहामध्येंच आहे. मेन्दूमधील सह-स्त्रार कमलाच्या किंचित् खालच्या बाजूस विश्वप्रकृतींतील नवनिर्माणशक्तीचे प्रतिनिधिक स्वरूप असलेल्या चंद्राचें अस्तित्व आहे. त्यामुळें तें स्थान अमृतरसानें परिपूर्ण आहे. आपल्या या शरीरामध्यें अमृतनिर्मितीचें कार्य सतत दर क्षणीं चाललेलें असून, थेंबाथेबानें तें अमृत या स्थानीं सांचत राहिलेलें असतें. या अमृतरसास सोम असें नांव आहे. हा सोमरस एकसारखा खालीं पाझरत असतो. पण तो शरीरांतील कालाग्नीकडून फस्त केला जातो. हा अग्नि जठराच्या मध्यभागीं सतत धगधगत राहिलेला असतो. अग्नीच्या या विध्वंसनाचें कार्य इतकें वाढतें कीं, त्यामानानें सोमरसाचा पुरवठा कमी पडून, शेवटीं कमजोरी, वार्धक्य आणि अखेरीस मृत्यू यांच्या भक्ष्यस्थानीं शरीर पडतें. अग्नीकडून हें जें सोमभक्षणाचें विध्वंसनकार्य चालतें, तें थोपविण्यासाठीं नाथ सांप्रदायांतील योगी तंत्र-शास्त्रांत सांगितलेल्या कांहीं योगिक प्रक्रियांचा उपयोग करतात.

शरीरस्थित कुंडलिनी शक्तीला जागृत करून, तिला पृष्ठवंशाच्या नलिकेंत वर चढवीत या चंद्रापर्यन्त पोचविण्यानें, योगी सोमरसाच्या वा अमृताच्या मूळ स्रोताशीं जागृत रीतीनें आपला संबंध प्रस्थापित करूं शकतो; आणि मग सोमरसाचा एकसारखा वर्षाव सुरु होतो. ज्या नलिकेच्याद्वारें हा सोमरस खालीं येतो, तिचें नांव शंखिनी. ही नलिका सर्पाकार असून तिचें एक टोंक चंद्रास व दुसरें टोंक जिभेच्या मागल्या बाजूस जोडलेलें असतें. अर्थात् हें सर्व ठीक झालें, तरी पाझरणारा सोमरस खालच्या कालाग्नीकडून भक्षण केला जाणार नाहीं हें पहावेंच लागतें. हें साधण्यासाठींच एक क्रिया अवलंबिलीं जाते. ती म्हणजे जीभ उलटी वळवून तिनें त्या नलिकेचें खालचें द्वार बंद करून टाकावयाचें. यामुळें पाझरणारा अमृतरस साधकास प्राशन करण्यास मिळून त्यायोगें हळूं हळू त्याच्या शरीरावर अमृतपानाचा परिणाम होऊं लागून तें उत्तरोत्तर बलवान्, तेजस्वी व दीर्घजीवि होतें व पुढें तर त्यामध्यें रूपांतर होऊं लागून शेवटीं शरीराची भौतिकता, जडता जाऊन तें अतिभौतिक द्रव्यमय बनून जाऊन त्यावर कोणत्याहि नैसर्गिक शक्तीचे परिणाम होऊं शकत नाहींत. तें दिव्य अणूंचें असें एक दिव्यशरीर बनून जातें.

या संदर्भात जातां जातां हाहि एक उल्लेख जरूर केला जातो पाहिजे कीं, वैष्णव सांप्रदायांतहि चिन्मय देहाची कल्पना आहे. या तेजोमय चिन्मय देहामध्यें वैष्णव-भक्त आपल्या आराध्य देवतेशीं सततच्या संयुक्त स्थितींत वैकुंठलोकीं वास करतो, अशी त्यांची श्रद्धा असते. या सर्व सांप्रदायांचा एकच उद्देश दिसतो की, अशाप्रकारचा देह मिळवावयाचा कीं ज्यामध्यें राहून जागृतपणें साधकास या विश्वांतील अतिभौतिक जगतांमध्यें निरंतरचा वास करतां यावा. अर्थात् प्रत्येक सांप्रदायानें दाखविलेलें उपाय भिन्न भिन्न आहेत हें खरें. हें स्पष्ट आहे कीं, कोणताहि उपाय केला तरी, जर साधकास अभौतिक अथवा अतिभौतिक देहाची प्राप्ति व्हावी असें वाटत असेल, तर त्याच्या भौतिक जड देहामधील अणूपरमाणूंचें संपूर्ण रूपांतर घडून आलेंच पाहिजे व तेंहि जलदरीतीनें.

तरीपण हा एक प्रश्न पुढें उभा राहतो कीं, ज्याला कायासिद्धी म्हणतात ती हीच कीं आणखी कांहीं वेगळें ? देहाचें पूर्णत्व म्हणजे निदान इतके तरी त्यांत साधलें पाहिजे, कीं या भौतिक देहांत ज्या ज्या कांहीं सुप्त क्षमता दडलेल्या आहेत, त्यांचा सर्वांगपूर्ण विकास या लोकांत साधून शिवाय हा देह विश्वांतील कोणत्याहि भौतिक शक्तींच्या आघातांमुळें बलहीनता वार्धक्य आणि मृत्यू यांच्या आहारीं जातां कामा नये. ह्या देहाचें जें वास्तविक असें अधिकारक्षेत्र जी पृथ्वी, तीवर राहून ही कायासिद्धी त्याला उपभोगतां आली पाहिजे. ज्या-प्रमाणें आपला मनोमय कोश मनोमय जगतामध्यें व वासनामय देह वासनामय प्राणिक जगतां-मध्यें चिरकाल नांदूं शकतो, त्याचप्रमाणें हा पूर्णत्व पावलेला दिव्यदेह या भौतिक जगांत, देहीच्या इच्छेनुसार पाहिजे तितका काळ राहूं शकला पाहिजे. हीच खरीखुरी अमरत्वाची प्राप्ति. श्रीअरविन्दानीं प्रतिपादिलेल्या पूर्णयोगाला जी अमरत्वसिद्धि अभिप्रेत आहे ती हीच होय. त्या योगाच्या अनेक उद्दिष्टांपैकीं तें एक उद्दिष्ट आहे असें नसून, ती सिद्धी म्हणजे एक पाया-भूत गोष्ट ठरलेली आहे. या खऱ्याखुऱ्या अमरत्वसिद्धीविषयीं पुढील लेखांकांत विवेचन करूं.

-मा.पु.पंडित.

★

साधना फॉर ऑल : स्वामी शिवानंद. प्रकाशक : योग वेदांत फॉरेस्ट ॲकॅडेमी. ऋषिकेश. पृ. ५५. किं. ५० न. पै.

ऋषिकेशच्या स्वामी शिवानंदांचें वाङमय इतकें मोठें व बहुशाखी आहे, कीं त्यांनीं कोणता एक विषय हाताळला नाहीं असें सांगणें मोठें कठीण वाटेल. त्यांच्या वाङमयांतून साधनाविषयक विचारांचा हा संग्रह वाचनीय झाला आहे. मानवत्वांतून वर उठून देवत्वाप्रत पोंचण्याच्या मार्गावरील शिदोरीच एकप्रकारें संग्रहकर्त्यानें साधकाच्या हातीं दिली आहे. शरीरमाद्यम् खलु धर्मसाधनम्। या तत्त्वानुसारें तन्दुरूस्तीचें महत्त्व लक्षांत घेऊन प्रथम त्याबाबतींत साधकांनें आसनांचा आश्रय घ्यावा असें सुचविलेलें आहे. कारण शरीरस्वास्थ्यानंतरची पुढची पायरी म्हणजे मनःस्वास्थ्य, त्याचाहि समावेश आपोआपच आसनांच्या व्यायामांत होतो. प्राणायामाच्या अभ्यासानें प्रथम श्वासोच्छ्वासावर व नंतर पर्यायानें मनाच्या एकंदरच सर्व क्रियांवर संयम प्राप्त होऊन शेवटीं साध-काचें मन पूर्ण निष्पंद स्थितींत पोचतें व ब्रह्मसाक्षात्कारास तो अधिकारी होतो.

साधना प्रगतीच्या मार्गावर असतां साधकाला साहाय्यकारी ठरणाऱ्या अनेक गोष्टी असतात. मार्गावर प्रार्थना, जप, भक्ति, कर्म वगैरे गोष्टी निरनिराळ्या भूमिकांमध्यें उपयुक्त ठरतात. त्यांचाहि या पुस्तकांत चांगला विचार केलेला आहे. साधकाचें घ्येय एकच असतें; तें म्हणजे देवाशीं ऐक्य. हा देव केवळ देवळांत, गुहेंत वा स्वर्गातच नसून तो साधकाच्या हृदयांतहि वसत असतो हें लेखकानें विशेष उल्लेखून सांगितलेलें आहे. लेखक सांगतात : "त्या परमेश्वरास प्रथम तुमच्याच हृदयीं शोधा; म्हणजे तो सर्वत्रच वसत असल्याचा साक्षात्कार तुम्हांस होईल."

एकंदरींत पुस्तक मनोरंजक तर आहेच; पण त्याशिवाय तें मार्गदर्शकहि झालेलें आहे. साधनेसारखा गंभीर विषय सांगत असतांहि मधून मधून किंचित् विनोदाच्या तुषारांनीं हें विवेचन मोठें रुचकर केलेलें आहे. उदा. झोंपेविषयीं विशेष नियम सांगतांना स्वामी म्हणतात 'शहाणे सांगतात, पुरूष झोंप घेतो सहा तासः स्त्रीला पुरते झोंप सात तास आणि आठ तास झोंप पुरत नाहीं मूर्खास.'

साधना करूं इच्छिणाऱ्या व्यक्तींनीं एकदां तरी हें पुस्तक अवश्य वाचावे असें खास आहे.

——मा. पु. पंडित

सर्वप्रकारची शक्ति, सामर्थ्य भगवंताकडूनच प्राप्त होतें पण त्याचा उपयोग अध्यात्म-भूमिकेवरून अथवा योग्यरीतीनें करण्यापेक्षां सामान्यतः अधिकवेळां त्याचा दुरुपयोग केला जात असतो.

——श्रीअरविन्द.

★

. . . .जीवनाचा आधार म्हणून आध्यात्मिक सत्य आम्ही आमचें लक्ष्य केलें आहे.शरणगति, भगवंताशीं ऐक्य आणि अहंकार ओलांडणें हा त्याचा ओनामा आहे.

जोंवर तो आधार सुस्थापित झाला नाहीं, तोंवर साधक म्हणजे निम्न प्रकृतीतील अनिष्टांविरुद्ध संघर्ष करीत राहिलेला एक अजाण व दोषपूर्ण मानवप्राणी आहे. ७-९-३५

——श्रीअरविन्द.

# आश्रम-वृत्त

**शैक्षणिक :**

मद्रास विद्यापीठाचे डॉ० श्री. वेंकटरमण : यांची उच्च गणितशास्त्रावरील व श्री. जूल रासेन्द्रन् यांची आंतरराष्ट्रीय कायद्यावरील व्याख्यानें पूर्ववत् चालूंच आहेत. फेब्रुवारी महिन्याच्या दि. २ व ३ या दिवशीं श्री. जे. स्मिथ व श्री. अनिल मुकर्जी यांनीं 'वर्ल्ड युनिअन' आंदोलनविषयक आफ्रिकेंतील दौऱ्याचा अहवाल जाहीररीतीनें निवेदन केला.

फेब्रुवारी १६ व मार्च ८ या दोन दिवशीं अनुक्रमें 'आजचा जर्मनी' व 'आजचा इस्राइल' या विषयावर (हेडेनबर्ग विद्यापीठाचे) मि. हेन्स् केप्स् यांचीं व्याख्यानें झालीं.

मि. रट्लेज बी टॉपकिन्स यू. एस्. नेव्ही. रिअर ॲडमिरल यांनी दि. ४ मार्च रोजी 'आधुनिक राष्ट्रांवर युद्धाचे परिणाम' या विषयावर व्याख्यान दिलें. तसेंच मार्च महिन्याच्या प्रारंभीं मि. डी. पी. सोनी यांनी 'आधुनिक युद्धामधील वैमानिक बल' या विषयावर एक व्याख्यान दिलें.

मार्च ६ : श्री. नलिनीकांत गुप्त याचें निबंधवाचन झालें. विषय होता रशियन लेखक 'बोरिस पास्टरनॅक'.

मार्च २२ व २९ : पाश्चात्य संगीत व पाश्चात्य गीतरचनाकार या विषयावर मि. विलफोर्ड हारवुड यांनीं भाषण केलें.

मार्च १२ : विद्याकेंद्राच्या इमारतींत आणखी एक नवीन सभागृह बांधण्यांत आलें. त्याचा अनावरण समारंभ होऊन त्यानिमित्त वेदमंत्र गायन, वाद्यवादन, गीतगान व पाठांतर इत्यादि कार्यक्रम झाला. या सभागृहामध्यें यापुढें बहिःशाल व विशेष अभ्यासपूर्ण व्याख्यानें होतील व इतरहि समारंभ याचठिकाणीं होत जातील.

**शारीरिक शिक्षण :**

या वेळचे खेळांचे सामने पूर्वीप्रमाणेंच परंतु प्रगतीस अनुसरून आवश्यक तेवढी सुधारणा करून घेण्यांत आले. बहुतेक सर्व गटांतील सर्व खेळाडूंनी सामन्यांत मोठ्या हौसेनें भाग घेतला होता. व्यक्तिगत क्षमता लक्षांत घेऊनच खेळांडूचे संघ बनवून, सर्वांकरितां खुले असलेले सामने घेण्यांत आले. टेनिस व हॅंड बॉल हे मात्र सर्वांकरितां खुले नव्हते.

देशी विदेशी सर्व खेळांमध्यें मिळून एकंदर २१२ खेळाडूंनी भाग घेतला होता. एका व्यक्तीनें अधिकांत अधिक १० खेळांत भाग घेतला तरी चालेल असा नियम होता. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे अशारीतीनें १० खेळांत भाग घेणारे एकंदर १२ खेळाडू निघाले. चढाओढीसाठीं नांव दाखल केल्यानंतर खेळाच्या तयारीसाठीं असा एक महिन्याचा अवधि होता. हे सामने दि. २१ जानेवारी ते २६ फेब्रुवारी पर्यंत चालले. लहान मुलांच्या बाबतींत एका खेळाडूस एकावेळीं ५ खेळांत चढाओढीसाठीं भाग घेतां येईल असा दंडक होता. चढाओढींत भाग घेतलेल्या खेळाडूंची संख्या एकंदर १७९ होती. दि. १३ रोजीं श्रीमाताजींनी स्वहस्तें सर्व यशस्वी खेळाडूंना बक्षिसपत्रकें दिलीं.

**आश्रमीय इतर विशेष :**

श्रीमाताजींचा ८२ वा वाढदिवस : दि. २१ फेब्रुवारी : सकाळीं श्रीमाताजींनी सर्वांना आशीर्वाद दिले. सायंकाळीं वॅग्नरचे संगीत ब्रास बँडवर वाजविण्यांत आले. तसेंच मानवी आत्म्याच्या ज्ञानविषयक अभीप्सेचें दर्शन घडविण्याऱ्या कठोपनिषदांतील नचिकेताच्या गोष्टीवर आधारलेली एक फ्रेंच नाटिका लहान मुलांनीं करून दाखविली.

२९ फेब्रुवारी हा दिवस या वर्षी आश्रमामध्यें विशेषरीतीनें साजरा करण्यांत आला. १९५६ सालीं याचदिवशीं अतिमानस शक्तीचा या पृथ्वीवर प्रथम आविष्कार झाला. त्याचा या वर्षी प्रथम वाढदिवस असल्याकारणाने यादिवशीं सर्वत्र सुवर्णरंगांत आरास करून व शृंगारून सर्व वातावरण आनंदमय करून टाकण्यांत आलें होतें. २९ तारीख अशारीतीनें दर चार वर्षांनीं येते. यापुढें दर चार वर्षांनीं हा दिवस भगवंताचा दिन म्हणून साजरा करण्यांत येणार आहे. अतिमानसाचा वर्ण सुवर्णसदृश असल्यामुळें या रंगाचेच सगळीकडे आधिक्य दिसत होतें. ध्यानमंदिरांत चकचकीत पृष्ठभागाचा घुमट तयार करण्यांत आला होता. मध्यावर श्रीमाताजींना बसण्यासाठीं जरतारी कापडानें आच्छादिलेलें आसन ठेवलें होतें. सर्वत्र दिव्यांची आरास करण्यांत आली होती. या दिवशीं सकाळीं नित्याप्रमाणें श्रीमाताजींचें सज्जांतील दर्शन झालें व नंतर १० वाजतां नुकत्याच अमेरिकेहून भेट म्हणून आलेल्या इलेक्ट्रिक ऑर्गनवर श्रीमाताजींनी अत्यंत सुंदर असें उत्स्फूर्त संगीतवादन केलें.

या प्रसंगाकरितां मुद्दाम बनवून घेतलेलें, सुवर्णाचा मुलामा दिलेलें पदक व छापील संदेश यांचें वितरण श्रीमाताजींनी स्वहस्तें सर्वांना केलें. या प्रसंगीं भारतांतील व बाहेरच्या देशांतीलहि फारच मोठ्या संख्येनें मंडळी उपस्थित राहिली होती.

यापुढें हा दिवस भगवन्ताचा दिवस म्हणून साजरा होत जाईल, असें श्रीमाताजींनी जाहीर केलें. (Barrington Speciosa) या नवीन फुलाला श्रीमाताजींनी 'अतिमानसाची क्रिया' असें नांव दिलें.

**नवीन प्रकाशनें :**

दिव्यजीवन या ग्रंथाच्या मराठी अनुवादाच्या प्रथम खंडाचें प्रकाशन श्रीमाताजींच्या हस्तें दि. १ : ३ : ६० रोजीं झालें. त्याप्रसंगीं या ग्रंथाचे अनुवादक सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय कार्यकर्ते सेनापति श्री. पां. म. बापट हे स्वतः हजर होते. त्यांनीच स्वहस्तें एक प्रत श्रीमाताजींना अर्पण केली व श्रीमाताजींनीहि त्यांना एक प्रत आशीर्वाद म्हणून दिली. या ग्रंथाचे एकंदर तीन खंड व्हावयाचे असून ते यथावकाश बाहेर पडतीलच. सेनापतींनी श्रीअरविंदांच्या इतरहि कांहीं महत्त्वाच्या ग्रंथांचे अनुवाद पूर्ण केलेले असून, अजूनहि त्यांचें हें अनुवादकार्य अखंडपणें चालू आहे.

दि हाय वेज ऑफ गॉड : श्री. मा. पुं. पंडित.––किं. ५ रु.
दि बुक ऑफ व्हाईट लाईट : श्री. कपालीशास्त्री.––किं. ७ रु.
दि गॉस्पेल ऑफ दि गीता : श्री कपालीशास्त्री.––किं. २ रु.

## महत्त्वाचा बदल

यापुढें संजीवन १५ सप्टेंबर, १५ डिसेंबर, १५ मार्च व  १५ जून
या तारखांस प्रसिद्ध होत जाईल.

--संपादक

## मराठी प्रकाशनें


१ श्रीअरविंद-दर्शन (वार्षिक मुंबई सर्कल) किं २ रु.
२ योग व त्याचे उद्देश - श्रीअरविंद किं.१२ आणे
३ कारागृहांत श्रीकृष्ण दर्शन (उत्तरपारा भाषण) - श्रीअरविंद किं.४ आणे
४ 'वंदेमातरम्' (लेखसंग्रह) - श्रीअरविंद किं. ४ आणे
५ परम शोध - श्रीमाताजी किं. ६ आणे
६ चार तपस्या व चार मुक्ती - श्रीमाताजी किं. १२ आणे
७ महान् रहस्य (नाटिका) - श्रीमाताजी किं.१ रु.
८ श्रीअरविंदांचा संदेश व आश्रम कि.१२ आणे
९ बाळ गंगाधर टिळक - श्रीअरविंद किं. ८ आणे
१० खेडीं हा स्वराज्याचा पाया (व्याख्यान) - श्रीअरविंद किं. ४ आणे
११ दिव्य जीवन (संकलित वेचें) - श्रीअरविंद किं. २५ न.पै.
१२ सत्यगिरीचें आरोहण (नाटिका) - श्रीमाताजी किं. ५० न.पै.

ट.ख.वेगळा

श्रीअरविंद सर्कल ३९१ सदाशिव पुणे २.
'संजीवन कार्यालय' श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी